# घटक - १

# ग्रामीण विकासाची संकल्पना

- डॉ. स्मिता भोईर

**पाठाची रचना :**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ ग्रामीण विकासाची व्याख्या
१.३ ग्रामीण विकासाची संकल्पना
१.४ ग्रामीण विकासाचे स्वरूप आणि व्याप्ती
१.५ ग्रामीण विकासाची ओळख
१.६ ग्रामीण विकासाचे महत्त्व
१.७ ग्रामीण विकासाची उद्दिष्ट्ये
१.८ सारांश
१.९ स्वाध्याय
१.१० संदर्भसूची

## १.० उद्दिष्ट्ये

१) ग्रामीण विकासाचा अभ्यास करता येईल.
२) ग्रामीण विकासाचा संकल्पना समजावून घेता येईल.
३) ग्रामीण विकासाची स्वरुप आणि व्याप्ती लक्षात घेता येईल.
४) ग्रामीण विकासाची ओळख होईल.
५) ग्रामीण विकासाचे महत्त्व लक्षात येईल.
६) ग्रामीण विकासाच्या विविध कार्यक्रमांची माहिती होईल.

## १.१ प्रस्तावना :-

भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण विकासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेवर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मोठा पगडा आहे. ग्रामीण भागात दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता यांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाला आर्थिक विकास मानले जाते. ग्रामीण विकास म्हणजे देशातील ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्याची प्रक्रिया होय. ग्रामीण विकास हा एक कृती कार्यक्रम आहे. त्याचबरोबर ग्रामीण समुदाय आणि

त्यांच्या समस्यांचा अभ्यास करणारे एक सामाजिक शास्त्र आहे. इतर सामाजिक शास्त्रांची व्याप्ती सामाजिक जीवनाच्या विशिष्ट पैलूंपुरती मर्यादीत आहे. तर ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्राची व्याप्ती अतिशय व्यापक स्वरुपाची आहे. ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक पैलूंचा या विषयात समावेश केला जातो.

भारतीय सामाजिक जीवनात ग्रामीण जीवनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतात जवळपास ६,२७,००० खेडी आहेत. भारत हा खेड्यांचा देश समजला जातो. एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ७० टक्के लोक ग्रामीण भागात वास्तव्य करतात. खेडी आकारमानाने लहान-मोठी आहेत. काही खेडी शहरांपासून लांब डोंगर दऱ्यांमध्ये वसलेली आहेत. देशाच्या भौगोलिक भिन्नतेनुसार वाळवंटी भागात हिमालयाच्या पर्वत रांगांमध्ये, सागरी किनारी भागात विखुरलेली आहेत. त्यांचा इतर भागांशी संपर्क ही होऊ शकत नाही. अशा सर्व खेडेगावांचे सामाजिक जीवन अतिशय कष्टमय व मागास स्वरुपाचे आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे झाली असली तरी किमान मुलभूत गरजा ग्रामीण समाजाला प्राप्त झालेल्या नाहीत. ग्रामीण जनतेला किमान प्राथमिक गरजांची सोय उपलब्ध करुन देणे. यामध्ये किमान पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शिक्षण, आरोग्य, पुरेसा निवारा व्यवस्था, आहारातील मुलभूत घटक इत्यादी दैनंदिन जीवनावश्यक गोष्टी उपलब्ध होतील या दृष्टीने प्रयत्न करणे म्हणजे ग्रामीण विकास होय. खेडी म्हणजे भारताचा आत्मा आहे. गुरूदेव रविंद्रनाथ टागोरांचे मत असे होते की, खेडे टिकविणे म्हणजे मानवी वंश संगोपन करणे. महात्मा गांधीजींच्या मते खेडेगावाचा नाश झाला तर भारताचा नाश होईल. म्हणून ग्रामीण भागातील सुप्त साधन सामग्रीचा शोध घेऊन ती विकसित करणे, ग्रामीण विकासात अपेक्षीत आहे.

## १.२ ग्रामीण विकासाची व्याख्या :-

ग्रामीण विकासाच्या संदर्भात निश्चित अशा व्याख्या आढळत नसल्या तरी ढोबळ मनाने खालीलप्रमाणे काही व्याख्या करता येण्यासारख्या आहेत :-

१) ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता व रोगराई हे चार शत्रु नष्ट करुन त्यांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे आणि त्याकरिता ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासावर भर देणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

२) ग्रामीण विकास ही परिवर्तनाची प्रक्रिया आहे. हे परिवर्तन ग्रामीण समाजाच्या पारंपारिक मार्गातून राहणीमानाच्या प्रागतिक मार्गामध्ये करण्याची प्रक्रिया आहे. हे परिवर्तन होण्यासाठी ग्रामीण जनतेला स्वतःच्या क्षमतेने व संसाधनांनी स्वतःच्या विकास करण्यासाठी साहाय्य करावयाचे आहे. ग्रामीण विकास हा ग्रामीण जनतेच्या कल्याणाशी संबंधीत अशा क्षेत्रातील काही उपक्रमांच्या पूर्ततेचा कार्यक्रम आहे.

३) सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, शेती आणि चळवळ या स्वरुपात ग्रामीण समाजामध्ये वेगवेगळे बदल घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

४) ग्रामीण जनतेला किमान प्राथमिक गरजांची सोय सहजासहजी उपलब्ध करुन दैनंदिन जीवनावश्यक गोष्टी उपलब्ध होतील या दृष्टीने प्रयत्न करणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

munotes.in

५) ग्रामीण जनतेने स्वतः उपक्रमशील राहून शक्यतो स्वावलंबी जीवन जगण्याचा प्रयत्न करणे, ग्रामीण जनतेच्या या प्रयत्नांकरिता तांत्रिक व इतर सेवा यांची तरतुद करणे आणि आपल्यामध्ये परिवर्तन घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

**आपली प्रगती तपासा.**

**प्रश्न ग्रामीण विकासाच्या विविध व्याख्या सांगा.**

## १.३ ग्रामीण विकास संकल्पना :-

ग्रामीण विकासाची निश्चित अशी संकल्पना आढळत नसली तरी विचारवंतांनी ढोबळ मनाने अनेक संकल्पना केल्या आहेत. परंतु ग्रामीण विकास ही संकल्पना समजावून घेण्यापूर्वी ग्रामीण व विकास या दोन शब्दांचा अर्थ समजावून घेणे आवश्यक आहे.

**ग्रामीण :** ग्रामीण हा शब्द ग्रामीण समुदायाशी निगडीत आहे. भौगोलिकदृष्ट्या विशिष्ट स्वरुपाची वैशिष्ट्ये असणाऱ्या समुदायास ग्रामीण भाग असे संबोधले जाते. काही समाजशास्त्रज्ञांच्या मते जे शहर नाही ते गाव होय. त्यालाच खेडे देखील संबोधले जाते. जो जमिन कसतो त्याला खेडूत असे म्हणतात आणि अशा खेडूतांच्या समुदायास खेडे असे म्हणतात. ज्या प्रादेशिक क्षेत्रातील समुदायाचा प्रमुख व्यवसाय आणि उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे तो ग्रामीण समुदाय होय. ज्या भौगोलिक क्षेत्रातील पन्नास टक्क्याहून अधिक लोकसंख्या शेती या प्रमुख व्यवसायावर अवलंबून आहे त्या क्षेत्राला 'ग्रामीण' समजले जाते.

**विकास :** विकास हा शब्द अर्थशास्त्रात अधिक प्रचलित आहे. ग्रामीण विकासाच्या संदर्भात विकास या शब्दात तीन घटकांचा समावेश करता येतो. यामध्ये कृषी विकास, आर्थिक विकास व ग्रामीण समुदायाचा सर्वांगीण विकास हे घटक महत्त्वाचे मानले जातात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करणे म्हणजे विकास होय.

**ग्रामीण विकास :-**

१) ग्रामीण भागातील दुर्बल घटक म्हणजे छोटे शेतकरी, भूमीहीन शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांच्या विकासावर भर देऊन ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

**श्री. रॉबर्ट मॅकनामारा**

२) ग्रामीण भागातील दुर्बल घटकांना सक्षम करण्याची प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय.

**डॉ. स्वामीनाथन**

munotes.in

३) ग्रामीण विकास फक्त शेती विकासापुरता मर्यादीत नसून लघुउद्योग, शाळा, प्रशिक्षण केंद्र, प्रगत दळणवळण, खेड्यातील विद्युत पुरवठा, सार्वजनिक आरोग्य, लोकसंख्या नियंत्रण केंद्र यांची वृद्धी करणे आणि ग्रामीण संस्कृतीला उत्तेजन देणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

**चेस्टर बोल्स**

४) ग्रामीण जनतेने स्वतः उपक्रमशील राहुन स्वावलंबी जीवन जगण्याचा प्रयत्न करणे, ग्रामीण जनतेच्या या प्रयत्नांकरिता तांत्रिक व इतर सेवा यांची तरतुद करणे आणि आपल्यामध्ये परिवर्तन घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

५) ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षरता व आरोग्य या चार समस्या सोडवून त्यांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासावर भर देणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

६) ग्रामीण भागातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य व पर्याप्त वापर करुन गरिबातील गरिब अशा दुर्बल घटकांचा विकास साधणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

वरील संकल्पनांवरुन असे स्पष्ट होते की, ग्रामीण विकास ही ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा विकास करण्याची प्रक्रिया आहे. यासाठी दारिद्र्य निर्मूलन आणि रोजगार निर्मीतीचे कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर किमान गरजांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील समाज बनविण्याची गरज आहे. ग्रामीण जीवन, ग्रामीण लोकसमुदाय, ग्रामीण भागाच्या समस्या व यांचे निराकरण आणि ग्रामीण विकास प्रक्रियेचा अभ्यास करुन विकासाचे मार्ग शोधून काढणे व त्याचा अवलंब करण्यास ग्रामीण समाजाला प्रवृत्त करणे अभिप्रेत आहे.

ग्रामीण विकासाची संकल्पना अधिक विस्ताराने स्पष्ट करण्याच्या दृष्टिने त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश करणे आवश्यक आहे.

१) प्राथमिक गरजांची पूर्तता करणे. यामध्ये शुद्ध पिण्याचे पाणी प्रत्येक गावात उपलब्ध करुन देणे, चांगल्या प्रतीचे व पुरेसे धान्य योग्य किंमतीत उपलब्ध करुन देणे, निवारा व्यवस्था, ग्रामीण विद्युतीकरण, शैक्षणिक सुविधा, आरोग्य विषयक सुविधा इत्यादी सोयी निर्माण करणे.

२) शेतीवर आधारित उद्योगांची गावपातळीवर निर्मिती करणे, उद्योगांसाठी मुलभूत सुविधा निर्माण करणे, किमान कौशल्याच्या सुविधा निर्माण करणे, वाहतूक, दळणवळण बाजारव्यवस्था निर्माण करणे.

३) गावपातळीवर किंवा गावाच्या परिसरात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व त्या माध्यमातून कायमस्वरूपी व उत्पादक मालमत्ता निर्माण करणे.

४) गाव, वाडी, पाडा या ठिकाणी प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे, गावांच्या मध्यवर्ती ठिकाणी माध्यमिक शाळा शक्य तिथे कनिष्ठ महाविद्यालयांची सोय करणे आणि त्याद्वारे ग्रामीण जनतेचा शैक्षणिक दर्जा सुधारणे.

५) समाज परिवर्तनासाठी व सांस्कृतिक विकासासाठी गाव पातळीवर वाचनालये, दुरदर्शन संच, कृषी विस्तार केंद्र इत्यादी सोयी उपलब्ध करुन देणे.

munotes.in

६) मानवी संपत्तीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व विकास कार्यात पुरेपुर वापर करुन घेण्यासाठी आरोग्य केंद्राची – निर्मिती करणे, मोफत किंवा सवलतीच्या दरात आरोग्य सेवांचा पुरवठा करणे, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम राबविणे.

७) स्वावलंबन, सहकार्य व नेतृत्त्व गुणांचा विकास साधून स्वतःच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची शिकवण देणे.

८) ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे निर्माण करणे. कच्च्या रस्त्यांचे पक्क्या रस्त्यात रुपांतर करणे, वाहतुक साधनांचा विकास साधणे व ग्रामीण भागातील उत्पादने शहरी भागातील मोठ्या बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी सुविधा निर्माण करणे.

९) नैसर्गिक साधन संपत्तीचा विकास साधणे, सुप्त अवस्थेत असलेल्या साधनसंपत्तीचा आर्थिक विकासासाठी उपयोग करुन घेणे, आवश्यक त्या घटकांची पुनःनिर्मिती करणे.

१०) शेती, शेतीपुरक व जोडव्यवसायांचा विकास साधणे यासाठी आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे, पुरेसे अर्थसहाय्य करणे.

**आपली प्रगती तपासा.**

**१) ग्रामीण विकासाची संकल्पना स्पष्ट करा.**

## १.४ ग्रामीण विकासाचे स्वरूप :-

ग्रामीण विकासाचे स्वरूप स्पष्ट करताना ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्राचे स्वरूप व ग्रामीण विकास प्रक्रियेचे स्वरूप स्वतंत्रपणे समजावून घेणे अधिक संयुक्तिक ठरेल.

**ग्रामीण विकास एक सामाजिक शास्त्र :-**

**१) ग्रामीण समुदाय व त्यांच्या समस्यांचा अभ्यास :**

ग्रामीण विकास या विद्याशाखेत ग्रामीण पर्यावरण व त्यातील लोकसमुदाय यांच्यातील आंतरक्रियेचा अभ्यास करण्यात येतो. ग्रामीण पर्यावरणात ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक, राजकिय व सांस्कृतिक परिस्थितीचा समावेश होत असतो. ग्रामीण समुदायात दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धा, अनारोग्य, गतिशीलतेचा अभाव, दैववादी वृत्ती, सामाजिक परिवर्तनास होणारा विरोध किंवा त्याबाबत असलेली अनुत्सुकता या समस्या दिसून येतात. ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्रात वर दिलेल्या समस्यांचे विवेचन करण्यात येते.

munotes.in

**२) आदर्शवाद :-**

ग्रामीण समुदाय व त्यांच्या समस्यांचा अभ्यास करत असताना या समस्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे याचे ही विवेचन करण्यात येते. ग्रामीण विकासासाठी ग्रामीण विविधीकरण, ग्रामीण बेरोजगारी निर्मुलनासाठी स्वयंरोजगार निर्मिती, ग्रामसभेच्या माध्यमातुन ग्रामस्तरावरील नियोजन प्रक्रियेत ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग, स्वयंसेवी संघटनांद्वारा जनजागृती, सहकारांच्या माध्यमातुन दुर्बल घटकांचा विकास इत्यादी प्रकारच्या उपाययोजना सुचविल्या जातात. महात्मा गांधीजींची ग्राम-स्वराज्याची संकल्पना, बलवंतराय मेहता यांची लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना या ग्रामीण समाजासाठी आदर्श संकल्पना आहेत. सदय परिस्थिती बदलणे आणि आदर्शवाद परिस्थिती निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन करणे ही जबाबदारी ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्रात पार पाडली जाते.

**३) सैद्धांतिक आणि उपयोजित पैलू :**

ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्रातील उपयोजित पैलू अधिक महत्त्वपूर्ण आहेत कारण ग्रामीण विकास हे एक कृतीशील सामाजिक शास्त्र आहे. ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्राचा जन्मच ग्रामीण समुदायाच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देश्याने झाला आहे. त्यामुळे ग्रामीण विकासासाठी हाती घेतल्या जाणाऱ्या विविध शासकिय व बिगर शासकिय उपक्रमांचा अभ्यास या सामाजिक शास्त्रात करण्यात येतो.

**४) आंतर विद्याशास्त्रीय :**

ग्रामीण विकास हे एक सामाजिक शास्त्र असले तरी वास्तव अर्थाने या शास्त्राचे पैलू भौतिक, जैविक व सामाजिक शास्त्रीय आहेत. शेती आणि ग्रामीण अर्थशास्त्र, जैविक अभियांत्रिकी आणि परिसर अभियांत्रिकी असे या आंतरविद्याशास्त्रीय शास्त्रांचे विविध पैलू आहेत. त्याचे स्वरुप सर्वसमावेशक आहे.

**१.४.१ ग्रामीण विकास एक प्रक्रिया :-**

ग्रामीण विकास ही ग्रामीण समुदायात सर्वांगीण परिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

**१) लोकचळवळ :**

सामुहिक विकास कार्यक्रम ग्रामीण विकासाच्या उद्देशाने सुरु करण्यात आला. कालांतराने सामुहिक विकास कार्यक्रम एक लोकचळवळ झाली. कारण ग्रामीण विकास हा लोकांचा, लोकांसाठी आणि लोकांद्वारे राबविला जाणारा कार्यक्रम आहे. ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत लोकसमुदायात विकासाची आकांक्षा असणे आणि त्या आकांक्षेच्या पूर्तीसाठी विकास प्रक्रियेत लोकांचा उस्फुर्त आणि सक्रिय सहभाग मिळविण्याच्या उद्देशाने बलवंतराय मेहता यांनी लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना मांडली आणि त्रिस्तरीय पंचायती राज व्यवस्थेची शिफारस केली. त्यानुसार त्रिस्तरीय यंत्रणा अस्तित्वात आली. ग्रामीण विकासासाठी स्वयंसेवी संघटना पुढे आल्या. सहकाराच्या माध्यमातून विकास प्रक्रिया गतिमान होत गेली आणि ग्रामीण विकासाचे स्वरुप सर्व समावेशक झाले.

munotes.in

**२) व्यापक उद्दीष्ट्ये :**

ग्रामीण विकासाची उद्दीष्ट्ये व्यापक स्वरुपाची आणि ग्रामीण जीवनाच्या सर्व पैलूंचा समावेश करणारी आहेत. कृषी विकास, जलसाधनांचा विकास, संरचनात्मक सोयींचा विकास, मानवी साधनसंपत्तीचा विकास, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन व पर्याप्त वापर, आर्थिक विकास, सामाजिक परिवर्तन इत्यादी सर्वसमावेशक उद्दीष्ट्ये ठेवण्यात आली आहेत. या उद्दीष्ट्यांच्या पूर्तीसाठी कार्यक्रम, योजना, उपक्रम व प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. म्हणून ग्रामीण विकासाचे स्वरुप व्यापक होत आहे.

**३) प्रक्रिया उद्योग :**

ग्रामीण भागात शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग विकसित करुन ग्रामीण औद्योगीकरणाला चालना देणे, सहकारी तत्त्वावर उद्योग प्रस्थापित करुन उत्पादनाचे अधिक फायदे सर्वसामान्य शेतकऱ्याला मिळवून देणे.

**४) संरचनात्मक सोयी सुविधा :**

ग्रामीण वाहतूक व दळणवळणाची साधने उपलब्ध करुन देणे, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा निर्माण करणे, ग्रामीण विद्युतीकरण करणे, शैक्षणिक सुविधांचा विकास साधणे, आरोग्याच्या सोयी उपलब्ध करुन देणे आणि एकंदरीत मानवी संपत्तीच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण करणे.

**आपली प्रगती तपासा :**

**१) ग्रामीण विकासाचे स्वरुप स्पष्ट करा.**

___

___

___

___

___

**१.४.२ ग्रामीण विकासाची व्याप्ती :-**

भारत हा आकारमानाने विशाल देश आहे, देशाचे क्षेत्रफळ ३२,८७,२६३ चौ.कि. आहे. देशाची एकूण लोकसंख्या १२० कोटीच्या वर असुन ग्रामीण भागात वास्तव्य करणारी लोकसंख्या जवळजवळ ७०% आहे. ग्रामीण भागातील भौगोलिक परिस्थिती भिन्न-भिन्न स्वरुपाची आहे. हवामान, पर्जन्यमान, जमिनीचा दर्जा, नैसर्गिक साधन संपत्ती व ग्रामीण भागात केले जाणारे व्यवसाय यामध्ये मोठ्या प्रमाणात भिन्नता आहे. ग्रामीण भागात वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या समस्या आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक प्रयत्न होऊनही समस्या पूर्णपणे सुटलेल्या नाहीत. म्हणून या समस्या सोडविण्याच्या दृष्टिने ग्रामीण विकासाला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाची व्याप्ती मोठी आहे. ही ग्रामीण विकासाची व्याप्ती आपल्याला खालील मुद्द्यावरून स्पष्ट करता येईल.

munotes.in

**१) ग्रामीण व्यवसायांचा विकास :**

शेती हा ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय आहे. देशातील एकूण लोकसंख्येपैकी ६४.५% लोकसंख्या प्रत्यक्ष शेती व्यवसायात गुंतलेली आहे. परंतु बहुतांशी शेतकरी अल्प व अत्यल्प भू-धारक असल्यामुळे परंपरागत पद्धतीने शेती करतात. त्यामुळे शेती व्यवसायाचा विकास झालेला नाही. आर्थिक परिस्थितीमुळे या कुटुंबाना शेतीत भांडवली गुंतवणूक करुन शेतीचा विकास साधता येत नाही, म्हणून शेती व्यवसायाला भांडवल पुरवठा, पाणी पुरवठ्याच्या सोयी व आदानांचा पुरवठा करुन शेती बरोबरच जोड व पुरक उद्योगांचा विकास महत्त्वाचा आहे. या उद्योगांमधून ग्रामीण कुटुंबांना नियमित उत्पन्न मिळण्यासाठी त्यांचा विकास साधणे आवश्यक आहे. म्हणून ग्रामीण भागातील व्यवसायांचा विकास साधण्याच्या दृष्टिने ग्रामीण विकासाची व्याप्ती मोठी आहे.

**२) मुलभूत सुविधा :**

ग्रामीण विकासाला पोषक वातावरण निर्माण होण्यासाठी ग्रामीण भागात मुलभूत सुविधांची आवश्यकता आहे. यामध्ये वाहतूक, दळणवळण, बाजारपेठा, विद्युतपुरवठा, पाणी पुरवठ्यांच्या सुविधांचा पुरेश्या प्रमाणात विकास साधण्याच्या दृष्टिने ग्रामीण विकासाची व्याप्ती वाढली आहे.

**३) औद्योगिक विकास :**

ग्रामीण भागात केले जाणारे सर्व व्यवसाय प्राथमिक स्वरुपाचे आहेत. या व्यवसायांमधून कच्च्या मालाची निर्मीती केली जाते. मात्र कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग शहरी भागात अधिक प्रमाणात आहेत. त्यामुळे उत्पादनाचे अधिक फायदे शहरी भागातील व्यापारी वर्गाला मिळतात, परिणामी ग्रामीण भागाचा आर्थिक विकास होत नाही, म्हणून ग्रामीण भागात उत्पादीत होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागात सुरु करुन ग्रामीण औद्योगीकरण करण्यासाठी मोठी संधी आहे.

**४) सामाजिक विकास :**

ग्रामीण भागात अनेक जाती – धर्माचे लोक वास्तव्य करीत असून परंपरेने चालत आलेल्या अनेक अनिष्ट प्रथा ग्रामीण समाजात आढळून येतात. त्यामुळे त्यांच्या विकासावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. ग्रामीण समाज विखुरलेल्या स्वरुपात असुन दुर्गम भागात वास्तव्य करणाऱ्या अतिमागास समाजात अनेक समस्या आहेत. या संपूर्ण समाजाचा विकास साधण्यासाठी त्यांना विकास प्रक्रियेत सामावून घेण्याची आवश्यकता आहे. म्हणून या समाजाच्या मुलभूत समस्या सोडविण्यासाठी व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी ग्रामीण विकासाची व्याप्ती वाढली आहे.

**५) मानवी संपत्तीचा विकास :**

ग्रामीण मानवी साधन संपत्तीचा विकास प्रक्रियेत पुरेपुर वापर करुन घेण्यासाठी प्रथम मानवी साधन संपत्तीचा विकास साधणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करुन उच्च शिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. मानवी साधन संपत्तीमध्ये कौशल्य निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण सुविधांची आवश्यकता आहे. मानवी कार्यक्षमता वाढविण्यासाठी व कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आरोग्य सुविधांची आवश्यकता असते. तरच मानवी शक्तीचा

पुरेपुर वापर विकास कार्यात करुन घेता येतो. म्हणून ग्रामीण मानवी साधनसंपत्तीचा विकास साधून आर्थिक विकासाला गती प्राप्त करुन देण्यासाठी ग्रामीण विकासाची व्याप्ती अधिक आहे.

**६) नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास :**

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहे. परंतु या नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपुर विकास न साधल्यामुळे ही साधनसंपत्ती सुप्त अवस्थेत पडून आहे. अशा साधनसंपत्तीचा विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता आहे. तरच या साधनसंपत्तीचा आर्थिक विकासासाठी उपयोग करुन घेता येतो. म्हणून भूसंपत्ती, जलसंपत्ती, खनिज संपत्ती, पशुसंपत्ती, सागरी संपत्ती इत्यादी घटकांचा योग्य प्रमाणात विकास साधण्यासाठी व आर्थिक विकासात उपयोग करुन घेण्यासाठी ग्रामीण विकासाची व्याप्ती वाढली आहे.

**७) लोकसंख्या नियंत्रण :**

ग्रामीण भागातील जलद गतीने वाढणारी लोकसंख्या हा ग्रामीण विकासातील महत्त्वाचा अडसर आहे. लोकसंख्या वाढीचा वेग तसाच ठेऊन आर्थिक विकासाचे कितीही प्रयत्न केले, तरी ते अपुरे पडणारे आहेत. लोकसंख्या नियंत्रण हा महत्त्वाचा घटक असल्यामुळे ग्रामीण विकासाची व्याप्ती अधिक आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) ग्रामीण विकासाची व्याप्ती स्पष्ट करा.

## १.५ ग्रामीण विकासाची ओळख :-

सामाजिक शास्त्रांमध्ये समाविष्ट करण्यात येणारा ग्रामीण विकास हा आंतर विद्याशास्त्रीय विषय आहे. नैसर्गिक (भौतिक) शास्त्रे, जैविक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे यामधील काही बाबी ग्रामीण समुदाय आणि त्यांच्या विकासाशी निगडीत आहेत. त्यांचा अभ्यास या विषयात करण्यात येतो. शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदु आहे. शेतीचा संबंध जमीन, मृदा, रासायनिक खते, जलसिंचन, अवजारे या अभौतिक बाबींशी येत असल्यामुळे भूसवंर्धन, जलसंवर्धन, जल-व्यवस्थापन, कृषी अभियांत्रिकी या नैसर्गिक किंवा भौतिक शास्त्रातील बाबी या विषयात समाविष्ट आहेत. त्याचप्रमाणे शेतीचा संबंध विविध पिकांशी येत असल्याने, पिक शास्त्र, किटक शास्त्र, जैविक अभियांत्रिकी या जैविक शास्त्रातील बाबींचाही अभ्यास ग्रामीण विकास या विषयात करण्यात येतो. ग्रामीण समाज, ग्रामीण अर्थव्यवस्था, ग्रामीण शासन आणि प्रशासन या बाबी समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि लोकप्रशासनाशी निगडीत बाबींचा अभ्यास 'ग्रामीण विकास' या विषयात करण्यात येतो.

ग्रामीण विकास या विषयाचे वैशिष्ट्य म्हणजे हे सामाजिक शास्त्र केवळ सैद्धांतिक शास्त्र नसुन ते उपयोजित शास्त्र आहे. या विषयाचे ज्ञान हे ग्रामीण जीवनातील प्रत्यक्ष व्यवहारांवर आधारित असल्यामुळे शैतकरी तसेच स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींना मार्गदर्शक ठरु शकेल. या विषयाच्या अभ्यासाद्वारे आपणास देशातील ग्रामीण समुदाय, त्यांची जीवनपद्धती आणि त्यांच्या समस्या यांची जाणीव होईल.

भारत हा खेड्यांचा देश आहे, जोपर्यंत भारतातील खेड्यांचा विकास होऊ शकत नाही तोपर्यंत आपल्या देशाचा विकास होऊ शकत नाही असे स्वर्गीय महात्मा गांधींनी म्हणाले आहेत. भारतीय सामाजिक जीवनात ग्रामीण समाजाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. भारतातील अनेक खेडी आकाराने लहान आहेत. काही खेडी डोंगरदऱ्यांमध्ये वसलेली आहेत. तर काही खेडी वाळवंटी भागात, काही हिमाच्छादित पर्वतांच्या रांगांमध्ये आहेत. समुद्रकिनारी भागात असणारी खेडी खाड्यांनी विभागलेली आहेत. अशा सर्व खेडेगावांचे जीवन खडतर आहे अशा खेड्यांचा विकास करणे आवश्यक आहे.

पारंपारिक भारतीय समाज स्वयंपूर्ण, स्वायत्त व बलशाली होता. गावगाडा स्वयंशासित होत. स्वयंपूर्ण शेती अर्थव्यवस्था प्रचलित होती. संयुक्त कुटुंब, जातीव्यवस्था, प्राचीन ग्रामपंचायती यांचे समाजजीवनावर प्रभावी नियंत्रण होते. पारंपारिक ग्रामीण समाजाचा भूतकाळ म्हणजे सुवर्णकाळ म्हणून संबोधला गेला आहे. इ. स. १८व्या शतकापर्यंत भारतीय ग्रामीण समाजाचे वेगळे चित्र आपणांस पाहावयास मिळत होते. ब्रिटीश काळात हे चित्र बदलत गेले.

इ. सन १८७५ ते १९०१ या काळात भारतात अनेक दुष्काळ पडले. त्यामुळे ब्रिटीश सरकारला देखील ग्रामीण भागाच्या प्रांताकडे लक्ष देणे भाग पडले. त्यावेळी सरकारने ग्रामीण भागाच्या विकासासाठी काही योजना हाती घेतल्या परंतु स्थानिक गरजा, त्या-त्या विभागांच्या नेमक्या समस्या व उपलब्ध साधन संपत्ती या घटकांचा पुरेसा विचार न करता आखलेले कार्यक्रम, तसेच नियोजनाचा अभाव व स्थानिक जनतेच्या सहकार्याविषयी दाखवलेली उदासिनता यामुळे सरकारने आखलेल्या या कार्यक्रमांचा फायदा ग्रामीण जनतेला फारसा मिळू शकला नाही.

भारतातील काही स्वयंसेवी संस्थानीही ग्रामीण जनतेच्या कल्याणासाठी व ग्रामीण भागात सुधारणा घडवून आणण्यासाठी काही उपक्रम हाती घेतले होते. पुणे येथील ‘सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी’ या संस्थेने शेती व घरगुती उद्योगधंदे यासंबंधी प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र सुरु केली होती. ख्रिस्ती धर्म धर्मप्रसारकांनी देखील येथील ग्रामीण जनतेच्या हितासाठी शिक्षण, आरोग्य, शेती विकास इत्यादी क्षेत्रात अतिशय उपयुक्त कामे ठिकठिकाणी केली होती. सन १९५२ पूर्वी बिनसरकारी पातळीवर ग्रामीण पुनर्रचनेसाठी आणखी काही प्रयोग करण्यात आले होत. यामध्ये रविंद्रनाथ टागोर यांचे शांतीनिकेतन, गुरगाव येथील प्रयोग, इटावा पायलट प्रोजेक्ट, निलोखेरी येथील प्रयोग, फिरता विकास प्रकल्प इत्यादी सारख्या विविध प्रकल्पांचा उल्लेख करता येईल.

या प्रकल्पांमुळे ग्रामीण समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक, क्षेत्रामध्ये विविध प्रकारचे बदल घडून येण्यास थोडीफार मदत झाली. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण विकासाला जी चालना मिळाली त्याचे श्रेय वरील प्रयोगांना दिले जाते. स्वातंत्र्योत्तर

कालावधीमध्ये ग्रामीण विकासाच्या संदर्भात सामुहिक विकास योजनेपासुन ते रोजगार हमी योजना, जवाहर ग्रामसमृद्धी योजना, स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना अशी कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यात आली. यामागील मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागाचा व समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा. महात्मा गांधींचे ग्रामीण विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात साकार व्हावे.

महाराष्ट्रामध्ये स्थानिक पुढाकारातुन तसेच शासनाच्या सहाय्याने ग्रामीण विकासाचे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. जलसंधारण, मृदासंधारण, जंगलांचे संरक्षण, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, सेंद्रीय शेती, नेत्रदान, महात्मा गांधी तंटामुक्त गाव यासारखे महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले त्यातील महत्त्वाची व प्रातिनिधिक प्रारुपे पुढीलप्रमाणे :-

**१) राळेगणसिद्धी, अहमदनगर :**

महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात राळेगणसिद्धी हे छोटे खेडेगाव आहे. आदर्श गाव असा नावलौकिक या गावाने मिळविला आहे. १९७५ मध्ये हे गाव दारिद्र्य व व्यसनाधिनतेमध्ये गुरफटलेले होते. अण्णा हजारेंनी या गावाच्या परिवर्तनास सुरुवात केली. आज हे गाव देशाच्या विविध विकासकार्यापैकी एक महत्त्वाचे उदाहरण आहे. दारुबंदी, कुऱ्हाडबंदी व नसबंदी या गावात करण्यात आली. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा उपक्रम राबवून पाणी टंचाईवर मात करण्यात आली. युवक मंडळांनी हुंडाबंदी, जातीभेद आणि अस्पृश्यता नष्ट करणे ही कार्ये हाती घेतली. आर्थिक, सामाजिक व राजकिय दृष्टिने या गावाचा सर्वांगीण विकास झालेला दिसतो. आज या गावात पाण्याची विपुलता आहे. राळेगणसिद्धीमधील शेते जोमदार पिकांनी बहरली आहेत. राळेगणसिद्धी हे देशातील स्वयंपूर्ण एक वेगळे प्रतिक आहे.

**२) हिवरे बाजार, अहमदनगर :**

अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार हे गाव एक विशेष प्रतिक म्हणून ओळखले जाते. १९८९ पासुन परिवर्तनाची आस धरलेल्या गावामागील प्रेरणा पोपटराव पवार हे आहेत. जलसंवर्धन व मृदासंधारण या संकल्पनेतुन ग्रामीण विकास केला आहे. अन्नधान्य उत्पादनाबरोबरच फलोत्पादन, फुलशेती, दुग्ध व्यवसाय इत्यादी उत्पादनात गाव आघाडीवर आहे. सामुदायिक शेतीसाठी हे गाव प्रचलित आहे. आदर्श गाव असणाऱ्या हिवरे बाजारने दुर्मिळ वनस्पतींच्या संरक्षण व संवर्धनासाठी जमिनीचा काही भाग राखीव ठेवला आहे.

**३) खुदावाडी, उस्मानाबाद :**

खुदावाडी हे उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापुर तालुक्यात आहे. गावकऱ्यांनी सांडपण्याचे नियोजन करुन त्याचा वापर भाजीपाला घेण्यासाठी केला. गांडूळखत निर्मिती केली. स्वच्छतेच्या बाबतीत हे गाव अग्रस्थानी असुन संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामध्ये पुरस्कार प्राप्त केला आहे.

**४) गोर्धा, अकोला – जलस्वराज्य :**

गावात लोकांच्या सहभागातून ग्रामविकासाची कामे केली जातात. गावकऱ्यांमध्ये एकी असल्यामुळे संघर्ष निर्माण होत नाहीत. ग्रामस्वच्छता अभियानात गावाने विभागात पहिला क्रमांक मिळविला आहे. गावातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी जलस्वराज्य प्रकल्प राबविले जातात.

munotes.in

**५) दारफळ – सोलापुर – लोकसहकार्यातुन धान्य बँक :**

दारफळ हे गाव अवर्षण प्रवण क्षेत्रात येते. परिणामी गावामध्ये सतत धान्य टंचाईची परिस्थिती होती यावर उपाय म्हणजे धान्य बँक हे लोकांच्या लक्षात आले व धान्य बँकेची स्थापना करण्यात आली. त्यामुळे गावातील धान्य टंचाईवर मात करता आली व संस्थात्मक कार्याची सुरुवात झाली.

महाराष्ट्रातील अशी अनेक गावे इतर गावांना प्रेरणादायी ठरली आहेत. त्यांच्या या कामामुळे गावांचा सर्वांगीण विकास होऊ शकला.

**आपली प्रगती तपासा :**

**१) ग्रामीण विकासाची ओळख यावर भाष्य करा.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १.६ ग्रामीण विकासाचे महत्त्व :-

ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी ग्रामीण समाजाचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. या माध्यमातुन ग्रामीण समाजाच्या सर्व समस्या जाणून घेता येतील आणि समस्या सोडविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करता येतील.

ग्रामीण विकासाच्या संदर्भात महात्मा गांधीजींनी व्यक्त केलेले विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. भारत हा खेड्यांचा देश आहे आणि जोपर्यंत खेड्यांचा पर्यायाने ग्रामीण भागाचा विकास होत नाही तोपर्यंत देशाचा खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येणार नाही. देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ८० टक्केहून अधिक क्षेत्र ग्रामीण स्वरुपाचे आहे. म्हणजेच अधिक लोकसंख्या आणि सर्वाधिक भौगोलिक क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास झाला असे म्हणता येणार नाही. भारताच्या संविधानात न्याय आणि समतेची उद्दीष्टे स्वीकारलेली आहेत. या उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी ग्रामीण भागातील लोक समुदायाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या किमान गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागात बहुसंख्य लोकसमुदायाने दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणे आणि शहरी भागात वाढणारी समृद्धी ही विषमता दुर करण्यासाठी ग्रामीण विकासास अग्रक्रम देणे गरजेचे आहे याची जाणीव योजनाकार आणि राज्यकर्त्यांना झाली आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून ग्रामीण विकासासाठी अधिक आर्थिक तरतुद करण्यात आली आणि ग्रामीण विकासाचे व्यापक

कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली. त्यामुळे ग्रामीण विकास प्रक्रियेला चालना मिळाली. तरीदेखील ग्रामीण समाजाच्या संपूर्ण समस्यांचे निर्मुलन झाले नाही.

ग्रामीण भाग सर्व अर्थाने स्वयंपूर्ण झाला, तरच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास होईल. ग्रामीण भागात राहणाऱ्या सर्वसामान्य जनतेचा विकास होईल आणि देशांच्या आर्थिक विकासाला चालना मिळू शकेल म्हणून ग्रामीण विकास महत्त्वाचा आहे.

## १.७ ग्रामीण विकासाची उद्दीष्टे :-

ब्रिटीश राजवटीत भारतातील स्वयंपूर्ण खेड्यांचा ऱ्हास झाला, आणि अनेक समस्या ग्रामीण भागात निर्माण झाल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने नियोजनाचा स्वीकार करुन ग्रामीण विकास कार्यक्रमांवर विशेष भर दिला. कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यापूर्वी ग्रामीण विकासाची काही उद्दीष्टे ठरविण्यात आली ती उद्दीष्टे पुढीलप्रमाणे :-

### १) कृषी उत्पादनात वाढ करणे :

देशातील एकूण लोकसंख्येपैकी ६४.५% लोकसंख्या प्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहे. मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेतीचा विकास साधून कृषी उत्पादनात वाढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतीच्या सुधारित तंत्राचा वापर करणे, शेतीसाठी कर्ज उपलब्ध करुन एकरी उत्पादकता वाढविणे हे ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे उद्दीष्ट आहे.

### २) संशोधन व प्रशिक्षण सुविधा :

कृषी विकासासाठी शेतकी संशोधन केंद्र, कृषी विद्यापीठ, कृषी महाविद्यालये यांची स्थापना करणे, संशोधनाच्या माध्यमांतून अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जाती शोधून काढणे व त्याची माहिती ग्रामीण भागात प्रसारीत करण्यासाठी प्रशिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे, कृषी विस्तार सेवा विकसित करणे व त्याच बरोबर शेती पुरक व जोड व्यवसाय विकसित करण्याच्या दृष्टिने सतत प्रयत्न करणे, नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे व त्याचा अवलंब करण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट्य आहे.

### ३) प्रक्रिया उद्योगांचा विकास :

शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग हे बहुतांशी शहरी भागात विकसित झाले आहेत. ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग नसल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादित कच्चा माल कमी किंमतीत विकावा लागतो. अशा कच्च्या मालाला योग्य किंमत मिळत नाही त्यामुळे शेतकऱ्यांना आपली आर्थिक परिस्थिती सुधारता येत नाही. म्हणून शेतमालाला योग्य किंमती मिळवून देण्यासाठी, ग्रामीण भागात अधिक रोजगार निर्मीती करण्यासाठी ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योगांचा विकास करण्याचे उद्दीष्ट ग्रामीण विकासात ठेवण्यात आले आहे.

### ४) जोड व्यवसायांचा विकास :

देशातील एकूण शेत जमिनीपैकी ७७% क्षेत्र कोरडवाहू स्वरुपाचे आहे. त्यामुळे वर्षातील आठ महिने ग्रामीण भागात पुरेसा रोजगार उपलब्ध होत नाही. म्हणून शेतीशी निगडीत

जोड व पुरक व्यवसायांच्या विकासाचे उद्दीष्ट ठेवून त्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगार निर्मीती करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

**५) सहकाराच्या माध्यमातुन दुर्बल घटकांचा विकास :**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे संघटन करणे, छोटे शेतकरी, सीमांत शेतकरी, छोटे व्यावसायिक, श्रमिक यांचे शोषण थांबविण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करणे, आधुनिक तंत्राचे फायदे मिळविण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून उद्योगांचा विकास साधणे, सहकारी पतसंस्थांची स्थापना करुन सावकारांकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबविणे, सहकाराच्या माध्यमातुन दुर्बल घटकांचे सबलीकरण करण्याचे उद्दीष्ट ग्रामीण विकासात ठेवण्यात आले आहे.

**६) मुलभूत गरजांची पूर्तता :**

ग्रामीण जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी किमान गरजांची पूर्तता करता यावी म्हणून अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, शुद्ध पिण्याचे पाणी, ग्रामीण विद्युतीकरण इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देऊन मानवी संपत्तीच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण करणे.

**७) ग्रामीण जनतेच्या उन्नतीसाठी स्वयंरोजगाराच्या योजना राबविणे, ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगार :**

प्रशिक्षण सुविधा निर्माण करणे, दुर्बल घटकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना विकास प्रक्रियेत सामावून घेणे व त्यांचे दारिद्र्य निर्मुलन करणे.

८) ग्रामीण जनतेच्या मनामध्ये देशभक्ती, समानता, ऐक्य, बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मकता निर्माण करणे, जातीभेद, धार्मिक भेद, प्रांत-वाद या गोष्टींना दुर ठेवण्याच्या दृष्टिने समाजात जनजागृती करणे.

९) ग्रामीण जनता व नागरी जनता यांच्यातील अंतर कमी करणे. ग्रामीण आणि शहरी संस्कृतीची सांगड घालण्याचा प्रयत्न करणे. ग्रामीण औद्योगिकीकरणावर भर देणे.

**१०)** ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावणे, त्यांचा राहणीमानाचा दर्जा सुधारणे यासाठी उत्पन्नाची साधने देणे, घरगुती स्वरुपाच्या साधन सामग्रीमध्ये विकास घडवून आणणे.

**११)** ग्रामीण जनतेमधील अंधश्रद्धा दुर करुन त्यांना विज्ञाननिष्ठ दृष्टी प्राप्त करुन देणे. स्वकर्तृत्त्वाने आपला विकास घडवून आणण्याची जाणीव करुन देणे. अनिष्ट प्रथा, परंपरा यांच्यापासुन ग्रामीण समाजाला दुर ठेवणे.

**१२)** स्थानिक पातळीवर रोजगार निर्मीतीचे कार्यक्रम राबविणे आणि रोजगार निर्मीतीतून उत्पादक स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे.

munotes.in

## १.८ सारांश :

बहुतांशी ग्रामीण समाज आर्थिक विकासापासुन वंचित आहे. म्हणून ग्रामीण विकासाचा अर्थ, ग्रामीण विकासाचे स्वरुप, व्याप्ती, ग्रामीण विकासाचे महत्त्व, ओळख इत्यादी घटकांचा आढावा या प्रकरणात घेतला आहे. ग्रामीण समाजाच्या समस्या जाणून घेऊन त्या दृष्टिने विविध कार्यक्रमांची आखणी करणे आवश्यक आहे.

भारताच्या आर्थिक विकासात ग्रामीण विकासाला महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण विकास म्हणजे खऱ्या अर्थाने देशाचा विकास होय. ब्रिटीश राजवटीपूर्वी ग्रामीण समाज स्वयंपूर्ण व स्वायत्त होता. गावाचा कारभार, गावचे अनुभवी पंच चालवत होते. ब्रिटीश राजवटीत स्वयंपूर्ण खेड्यांची अर्थव्यवस्था संपुष्टात आली आणि ग्रामीण भागात अनेक समस्या निर्माण झाल्या. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण विकासाचे प्रयत्न सुरु झाले. ग्रामीण विकासाची उद्दीष्ट्ये निश्चित करण्यासाठी ग्रामीण विकासाची संकल्पना, ग्रामीण विकासाचे स्वरुप, ग्रामीण विकासाची व्याप्ती इ. घटक लक्षात घेऊन उद्दीष्टये मांडण्यात आली आहेत. ग्रामीण विकासासाठी आर्थिक विकास यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## १.९ स्वाध्याय

१) ग्रामीण विकासाची व्याख्या सांगून संकल्पना स्पष्ट करा.
२) ग्रामीण विकासाचे स्वरुप व व्याप्ती विशद करा.
३) 'ग्रामीण विकासाची ओळख' यावर टिपण करा.
४) ग्रामीण विकासाचे महत्त्व यावर चर्चा करा.
५) ग्रामीण विकासाची उद्दीष्टये सांगा.

## १.१० संदर्भ सूची

१) आगलावे प्रदिप : ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन – नागपुर
२) नाडगोंडे गुरुनाथ : ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टीनेन्टल प्रकाशन – पुणे
३) चाफेकर विलास : रचनात्मक कार्याच्या दिशा, विपुल प्रकाशन – पुणे
४) रिबेलो क्लेमेंटाईन : बचतगट, गौरव बुक हाऊस – नाशिक
५) कुरुळकर र. पु. : विकासाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन – नागपुर

❖❖❖❖

# घटक -२

## ग्रामीण विकासाचे कार्यक्रम

**- डॉ. स्मिता भोईर**

**पाठाची रचना :**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ ग्रामीण पुनर्रचना
२.३ भारतातील पंचवार्षिक योजना
२.४ ग्रामीण विकासाचे कार्यक्रम
२.५ सारांश
२.६ स्वाध्याय
२.७ संदर्भसूची

### २.० उद्दिष्ट्ये :-

१) ग्रामीण विकासाचे महत्त्व जाणून घेणे.
२) ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांची आवश्यकता अभ्यासणे.
३) ग्रामीण विकासाचे कार्यक्रम अभ्यासणे.

### २.१ प्रस्तावना :-

प्राचीन ग्रामीण समाजाचे चित्र उत्साहवर्धक होते. स्वायत्त, स्वयंपूर्ण व स्वतंत्र असा ग्रामीण समाज सर्वार्थाने समृद्ध होता. ब्रिटीश कालखंडात स्वयंपूर्ण ग्रामीण समाजाचे चित्र पालटले आणि सर्व सामाजिक संस्था निस्तेज झाल्या. आर्थिक विषमता वाढत गेली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारला आर्थिक विषमता दुर करण्यासाठी उपाययोजना करणे अपरिहार्य ठरले. सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय सामान्यातील सामान्य माणसांना मिळवून देणे हे स्वतंत्र भारताचे ध्येय ठरले. त्या दृष्टिकोनातून विविध कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी सुरु झाली.

ब्रिटीश काळात स्वयंपूर्ण ग्रामीण समाजाचे अस्तित्व नष्ट झाले. देशातील ८० टक्के जनता ही ग्रामीण भागात वास्तव्य करीत होती. त्यांच्या समस्यांना अग्रक्रम देणे आवश्यक होते. कारण भारताचा आत्मा हा खेड्यातच राहतो. त्यासाठी त्यांच्या विकासाकरिता विविध कार्यक्रम आखण्यात आले. ग्रामीण पुनर्रचना त्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण राहिली.

munotes.in

ग्रामीण समाजाची आर्थिक, सामाजिक व राजकिय प्रगती होण्यासाठी विकास कार्यक्रम हे महत्त्वाचे ठरतात. आर्थिक व सामाजिक जीवनात स्वयंपूर्ण होणे, गरिबी हटाव मोहिम सुरु करणे, शेती व कुटीरोद्द्योगांचा विकास करणे, भूमिहीनांना काम देणे, वाहतूकीची सोय करणे, जमीन सुधार, शिक्षण प्रसार, आरोग्य विषयक सुविधांचा विस्तार करणे व जनतेला विकासासाठी जागृत करणे यामागील हे मुख्य उद्दिष्ट यामागील आहे.

## २.२ ग्रामीण पुनर्रचना :-

पुनर्रचना याचा अर्थ एखाद्या गोष्टीची पुन्हा नव्याने मांडणी करणे होय. ग्रामीण पुनर्रचना या शब्दामध्ये ब्रिटीश राजवटीत ग्रामीण समाजाची जी दुर्दशा झाली होती ती थांबवून या समाजाला पुन्हा एकदा समर्थ पायावर उभे करणे होय. थोडक्यात ग्रामीण समाजाची सर्वांगीण प्रगती घडवून आणणे आणि ग्रामीण समाजाच्या समस्या सोडविणे म्हणजे ग्रामीण पुनर्रचना होय.

भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या सर्वांगीण विकासासाठी पंचवार्षिक योजना हाती घेतल्या. पचंवार्षिक योजनांची यशस्वी वाटचाल ही सर्वस्वी ग्रामीण विकासावरच अवलंबून आहे. याची जाणीव राज्यकर्त्यांना झाली. त्यानुसार त्यांनी ग्रामीण पुनर्रचनेचे विविध कार्यक्रम तयार केले. ग्रामीण जनतेच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व अन्य प्रकारच्या समस्या सोडवून चांगल्या जीवनमानाचा दर्जा प्राप्त करुन देता यावा याकरिता आज ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमावर अधिक भर देण्यात येत आहे. ग्रामीण पुनर्रचनेमध्ये पुढील बाबींना प्राधान्य देण्यात येते.

१) ग्रामीण समाजातील दारिद्र्य दुर करण्याचा प्रयत्न करणे.
२) शेती विकासाकडे लक्ष पुरविणे.
३) ग्रामोद्द्योग व कुटीरोद्द्योगांना प्रोत्साहन देणे.
४) ग्रामीण जनतेमध्ये समुदाय भावना वाढीस लावणे.
५) ग्रामीण भागात शिक्षण प्रसाराला चालना देणे.
६) ग्रामीण जनतेमध्ये कुटुंब नियोजन व कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार करणे.
७) ग्रामीण भागात गृहबांधणी कार्याला चालना देणे.

ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमाच्या आधारेच महात्मा गांधींना अभिप्रेत असलेली सुखी, समृद्ध व स्वयंपूर्ण अशी ग्रामीण स्वराज्याची संकल्पना साकार होऊ शकेल. ग्रामीण समाजाला नव्याने विकासाच्या मार्गावर आणणे व ग्रामीण जनतेचे जीवन सुखी व संपन्न बनविणे हेच ग्रामीण पुनर्रचनेचे खरे ध्येय आहे.

देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर देशाचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टिकोनातुन २ ऑक्टोबर १९५२ पासुन सामुहिक विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली.

सामुहिक विकास म्हणजे समाजाचा क्रियाशील सहभाग असणारी व समाजाच्या उपक्रमशीलतेने चालणारी व अखिल समाजाचे जीवन उन्नत करणारी चळवळ होय.

munotes.in

ग्रामीण क्षेत्राचा परिपुर्ण विकास करणे व ग्रामीण समाजाचे जीवनमान उंचावणे हा प्रमुख उद्देश या कार्यक्रमामागे होता. आरोग्य, शिक्षण व इतर सामाजिक कल्याणाच्या उपक्रमांमध्ये वाढ करणे यावर अधिक भर देण्यात आला.

**आपली प्रगती तपासा :**

१) ग्रामीण पुनर्रचनेची माहिती द्या.

___

___

___

___

___

### २.२.१ सामुहिक विकास कार्यक्रम :-

ग्रामीण जनतेचा विकास व्हावा या दृष्टिकोनातुन सामुहिक विकास कार्यक्रमांमध्ये पुढील उपक्रम राबविण्यात आले. शेती, पाणीपुरवठा, दळणवळण, शिक्षण, आरोग्य इत्यादी घटकांना प्राधान्य देण्यात आले.

१) कृषी उत्पादनाच्या विकासाचा समावेश कार्यक्रमात करण्यात आला. त्या विकासासाठी ग्रामीण पातळीवरच्या कामगारांचा समुह असणारा प्रत्येक विकास गट आणि शेतीतील तांत्रिकी विशेषज्ञांचा संघ, पशुपालन, सहकार व ग्रामीण उद्योग यांचा समावेश करण्यात आला.

२) जलसिंचन सोयींचा पूर्ण वापर, सामुहिक जलसिंचन कामांच्या दुरुस्त्या व देखभाल, क्षेत्रीय कालवे, पाणी वापरातील बचत यांचा समावेश विकास कार्यक्रमात करण्यात आला.

३) बहुविध पिकांच्या क्षेत्राची वाढ करण्यात आली.

४) सुधारीत बी-बियाण्यांची संख्या वाढविण्यात आली व त्यांचे वितरण सर्व शेतकऱ्यांना करण्यात आले.

५) उत्सव, मेळावे भरविण्यात आले.

६) लहान शेतकरी, शेतमजुर यांच्याकरिता विशेष श्रमयोजना राबविण्यात आल्या.

### २.२.२ सामुहिक विकास योजनेची वैशिष्ट्ये :-

समाज विकास कार्यक्रम २ ऑक्टोबर १९५२ पासुन सुरु करण्यात आला. त्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

१) सर्वस्पर्शी ग्रामीण भागाच्या सर्व समस्यांचा विचार अलगपणे न करता एकत्रितपणेच या योजनेत करण्यात आला. याचाच अर्थ ग्रामीण भागाचे सर्वच जीवन उन्नत करण्यावर या योजनेचा भर होता.

२) ग्रामीण भागाच्या आर्थिक पुनर्रचनेला या योजनेत प्राधान्य देण्यात आले.

३) लोकांचा स्वप्रयत्नावरील विश्वास वाढविणे व त्यांना विकासाची कामे करण्यास प्रवृत्त करणे या योजनेत अपेक्षित होते.

सामुहिक विकास कार्यक्रम हा केंद्रीय स्तर, राज्य स्तर, जिल्हा व ग्राम स्तर अशा विविध स्तरांवर राबविण्यात आला. यामध्ये २७,३८८ खेडी व १.६४ कोटी लोकांचा समावेश करण्यात आला. प्रत्येक प्रकल्प ३०० खेड्यांसाठी होता. प्रत्येक प्रकल्पाचे तीन विकास गट तयार करण्यात आले. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये ९० कोटी रुपये गुंतविण्यात आले. १९५३ मध्ये ६६ हजार लोकवस्ती असणारा खेड्यांचा गट तयार करण्यात आला व सामुहिक विकास गटाची स्थापना करण्यात आली. १९५३ मध्ये अन्य जमातीसाठी विशेष प्रकल्प सुरु झाले. सामुहिक विकास कार्यक्रमांचा मुलभूत उद्देश ग्रामीण लोकांनी स्वतःच्या नव निर्वाचित प्रतिनिधींमार्फत विकास कार्यक्रमातील योजना व गट यांचा कार्यक्रमात सहभागी होणे हा होता.

**आपली प्रगती तपासा :-**

१) सामुहिक विकास कार्यक्रमाची माहिती द्या.

___

___

___

___

___

### २.२.३ ग्रामीण विकासासाठी नियोजन :-

ग्रामीण जनतेचा आर्थिक विकास व ग्रामीण जनतेचा सामाजिक विकास ही ग्रामीण विकासाची महत्त्वाची दोन अंगे आहेत. आर्थिक विकास यामध्ये विकेंद्रीत नियोजन, जमिन सुधारणा कायद्याची अंमलबजावणी, उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा, कर्जाच्या सोयी, उत्पादित मालासाठी बाजारपेठा इत्यादी गोष्टींचा समावेश केला जातो.

सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत सार्वजनिक व वैयक्तिक आरोग्याच्या सोयी, शिक्षण सुविधा, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा, सार्वजनिक स्वच्छता, रस्ते व दळणवळण सुविधा, घरबांधणी इ. गोष्टींचा समावेश आढळतो.

ग्रामीण जनतेचा आर्थिक विकास करण्यासाठी गाव व गावाशेजारील नैसर्गिक साधनांचा जास्तीत जास्त वापर कसा करता येईल त्याचा विचार करण्यात येतो. जमिनीच्या प्रकारानुसार व प्रतीनुसार त्याची विभागणी करण्यात यावी. व त्यानुसार जमिनीमध्ये विविध प्रकारची पिके घेऊन शेती उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करणे. शेतीपुरक व्यवसाय उदा. दुग्धव्यवसाय, शेळी मेंढीपालन व्यवसाय, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, अळंबी लागवड, वराहपालन इत्यादी व्यवसाय सुरु करण्यात यावेत. पडीक जमिनीवर व हलक्या जमिनींवर कोरडवाहू पिके होणे इत्यादींचे नियोजन करावे. तसेच गावांमध्ये कुटीरोद्योगांना प्राधान्य देण्यात यावे.

## २.३ भारतातील पंचवार्षिक योजना :-

वसाहतवादी शोषणामुळे जर्जर झालेल्या अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानासाठी भारतात आर्थिक नियोजनाच्या संकल्पनेचा स्वीकार करण्यात आला. १ एप्रिल, १९५१ पासुन भारतात आर्थिक नियोजनास सुरुवात करण्यात आली. तेव्हापासुन भारतात ११ पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या असुन १२वी योजना चालू आहे. या व्यतिरिक्त ७ वार्षिक योजनाही राबविण्यात आल्या. भारतात पंचवार्षिक योजना प्रक्रियेत तीनदा खंड पडला. या कालावधीत ७ वार्षिक योजना राबविण्यात आल्या.

भारतात १ एप्रिल १९५१ पासुन झालेले आर्थिक नियोजन १९८५ पर्यंत पूर्णपणे आदेशात्मक होते. पहिल्यादांच ७ व्या योजनेत विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सूचक नियोजन प्रणालीचा अवलंब करण्यात आला. मात्र तरीही संपूर्ण योजना आदेशात्मकच होती. ७ व्या योजनेमध्ये जवाहर रोजगार योजनेच्या स्वरुपात भारताची पहिली विकेंद्रीकृत योजना सुरु करण्यात आली. या योजनेमध्ये २० टक्के खर्च राज्यांना करावयास लागत असे व तो ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन लागु केला जात असे. ८ व्या योजनेला भारताची पहिली पूर्ण सुचक नियोजनाची योजना मानली जाते.

**१) पहिली पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल १९५१ ते ३१ मार्च १९५६

पहिल्या पंचवार्षिक योजनेचा भर हा कृषी क्षेत्रावर होता. दुसऱ्या महायुद्धामुळे व भारताच्या फाळणीमुळे विस्कळीत झालेली अर्थव्यवस्था सावरुन भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये समतोल निर्माण करणे देशातील उपलब्ध साधनसंपत्तीचा उपयोग करुन रोजगार वाढविणे व लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे हे उद्दीष्ट्य पहिला पंचवार्षिक योजनेचे होते.

**२) दुसरी पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल १९५६ ते ३१ मार्च १९६१

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा मुख्य भर जड व मुलभूत उद्योगांवर होता. विकासाचा दर ७.५ टक्के प्रतिवर्ष एवढा संपादन करणे, जड व मुलभूत उद्योगांची स्थापना करुन औद्योगीकरण वाढविणे व १० ते १२ लाख व्यक्तींसाठी नव्याने रोजगार उपलब्ध करुन देणे या योजनेमध्ये समाजवादी समाजरचनेचे तत्व हे आर्थिक नीतीचे लक्ष्य म्हणून स्वीकारण्यात आले.

**३) तिसरी पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल १९६१ ते ३१ मार्च १९६६

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत कृषी व मुलभूत उद्योग यावर भर देण्यात आला. दुसऱ्या योजनेत कृषी क्षेत्राला दुय्यम महत्व दिले होते. भारताचा विकास हा कृषी विकासाशिवाय अशक्य आहे. हे लक्षात आल्यानंतर कृषी क्षेत्राकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले. तसेच १९६२ च्या चीन युद्धानंतर 'संरक्षण आणि विकास' यावर भर देण्यात आला.

**४) चौथी पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल १९६९ ते ३१ मार्च १९७४

चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये स्वावलंबनावर भर देण्यात आला. स्थैर्यासह आर्थिक वाढ हे घोषवाक्य ठरले गेले. स्वावलंबन, सामाजिक न्यायासह आर्थिक वाढ, समतोल प्रादेशिक विकास या घटकांवर भर देण्यात आला.

munotes.in

**५) पाचवी पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल १९७४ ते ३१ मार्च १९७९

पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये प्रामुख्याने भर हा गरीबी हटाओ किंवा दारिद्र्य निर्मुलन व स्वावलंबन यावर देण्यात आला. त्या दृष्टिने आर्थिक वाढीचे लक्ष्य ४.४ टक्के, दारिद्र्य निर्मुलन आणि उत्पादक रोजगारात वाढ हे उद्दीष्ट ठरविण्यात आले.

**६) वार्षिक योजना :-**

१ एप्रिल १९७८ ते जानेवारी १९८० दरम्यान राबविण्यात आली. या योजनेला साखळी योजना असे म्हणतात. कृषी व संलग्न क्षेत्रांमध्ये रोजगार क्षमता वाढविणे व उपभोग्य वस्तुंच्या उत्पादनासाठी लघु व कुटीर उद्योगांवर भर देण्यात आला.

**७) सहावी पंचवार्षिक योजना १ एप्रिल १९८० ते ३१ मार्च १९८५ :-**

सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मीतीवर भर देण्यात आला. त्या योजनेचे मुख्य उद्दीष्ट्य म्हणजे ५.२ टक्के इतका वाढीचा दर संपादित करणे, आर्थिक व तांत्रिक स्वावलंबन / स्वालंबनाबरोबरच ३ कोटी ४० लाख लोकांसाठी रोजगार निर्मिती करणे हे होते.

**८) सातवी पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल १९८५ ते ३१ मार्च १९९०

सातवी पंचवार्षिक योजना पंधरा वर्षांच्या दिर्घकालीन योजनेचा भाग होती. या योजनेमध्ये उत्पादक रोजगार निर्मीतीवर भर देण्यात आला. त्यामुळे या योजनेला 'रोजगार निर्मीती जनक' असे म्हणतात.

**९) वार्षिक योजना :-**

सातवी योजना संपल्यानंतर देशातील राजकिय अस्थैर्यामुळे आठवी योजना सुरु न करता दोन वार्षिक योजना राबविण्यात आल्या. १९९०-९२ दरम्यान अर्थव्यवस्थेत व्यवहार तोलाचे संकट, परकिय चलनाचा अत्यल्प साठा, उद्योगक्षेत्रात मंदी असे दुष्परिणाम निर्माण झाले होते.

**१०) आठवी पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल १९९२ ते ३१ मार्च १९९७

आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये मानव विकासावर भर देण्यात आला. त्यामध्ये रोजगाराच्या पुरेशा संधी निर्माण करणे, लोकसंख्या वाढीचा वेग नियंत्रित करणे, सर्वांना प्रामाणिक शिक्षण घेऊन निरक्षरतेचे उच्चाटन करणे, सर्व खेड्यातील लोकांना स्वच्छ व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, प्राथमिक आरोग्य सोयी सुविधा निर्माण करणे, कृषी क्षेत्राचा विकास व विविधीकरण करुन अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण करणे अशी उद्दीष्ट्ये ठरविण्यात आली होती.

**११) नववी पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल १९९७ ते मार्च २००२

नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये कृषी व ग्रामीण विकासावर भर देण्यात आला. यासाठी कृषी व ग्रामीण विकास ह्यांना अग्रक्रम, रोजगार निर्मीती, आर्थिक वाढीचा दर वार्षिक सरासरी ६.५ टक्के, सर्वांना मुलभूत किमान सेवा पुरविणे, शाश्वत विकास, दुर्बल घटकांचे सबलीकरण, पंचायत संस्था, सहकारी संस्थांच्या विकासास चालना इत्यादी उद्दीष्ट्ये ठरविण्यात आली.

**१२) दहावी पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००७

दहाव्या पंचवार्षिक योजनेचे उद्दीष्ट्य म्हणजे GDP च्या वाढीच्या दराचे लक्ष प्रतिवर्षी आठ टक्के ठेवण्याबरोबरच दारिद्र्याचे प्रमाण कमी करणे, साक्षरतेचे प्रमाण वाढविणे, बालमृत्युचे प्रमाण कमी करणे, प्रदुषित नदयांची स्वच्छता करणे, सर्व खेड्यांना शाश्वत स्वच्छ पेयजल पुरवठा करणे.

**१३) अकरावी पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २०१२

अकराव्या पंचवार्षिक योजनेत संपूर्ण देशासाठी GDP च्या वाढीचे वार्षिक सरासरी ९ टक्क्याचे लक्ष ठेवण्यात आले. तसेच ही वाढ सर्वांना सामावून घेणारी म्हणजेच समावेशी वृद्धी असेल. त्याद्वारे दुर्बल घटकांच्या जीवनाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा घडवून आणणे.

**१४) बारावी पंचवार्षिक योजना :-** १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१७

बाराव्या पंचवार्षिक योजनेचे जलद, शाश्वत आणि अधिक समावेशी वृद्धी असे उद्दीष्ट्य होते. या योजनेचा मुख्य भर कृषी व कारखानदारीबरोबरच पायाभूत सुविधा, आरोग्य व शिक्षण या क्षेत्रावर आहे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) भारतातील पंचवार्षिक योजनाची माहिती द्या.

## २.४ ग्रामीण विकासाचे कार्यक्रम :-

ग्रामीण भागाचा विकास होण्यासाठी व दारिद्र्य निर्मुलनासाठी स्वतंत्रप्राप्तीनंतर सरकारने दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मितीसाठी विविध उपक्रम राबविले. त्यापैकी महत्त्वाचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे :-

**अवर्षण – प्रवण क्षेत्र कार्यक्रम - (DPAP)**

सरकारने देशातील काही निवडक अवर्षण – प्रवण क्षेत्रांमध्ये हा कार्यक्रम १९७३-७४ मध्ये सुरु केला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे जमिन, पाणी आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा संतुलित विकास घडवून आणून या प्रदेशातील पर्यावरणाचा समतोल पुनर्स्थापित करणे. या योजनेसाठी आवश्यक असणारा निधी केंद्र व राज्य सरकारांनी 50% या प्रमाणात दिला आहे. ही योजना १३ राज्यातील १५५ जिल्ह्यांमधील ९४७ गटांमध्ये राबविली जात आहे. या योजने अंतर्गत ४१ लाख हेक्टर्स एवढ्या क्षेत्रावर जवळपास ८३५५ पाणलोट प्रकल्प राबविले जात आहेत.

### एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम - (IRDP)

सुरुवातीला २३०० गटांमध्ये सुरु करण्यात आलेला हा कार्यक्रम २ ऑक्टोबर १९८० रोजी पूर्ण देशभरामध्ये लागू करण्यात आला. सध्या मात्र हा कार्यक्रम अस्तित्वात नसून इतर ५ योजनासहित त्याचे विलिनीकरण १ एप्रिल १९९९ पासून स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेमध्ये करण्यात आले आहे. या योजनेचा मुख्य उद्देश्य म्हणजे दारिद्र्य रेषेच्या वर येण्यासाठी ग्रामीण कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे. हा उद्देश्य साध्य करण्यासाठी लक्ष्य गटांमध्ये स्वयं रोजगाराचा विकास घडवून आणण्यासाठी त्यांना उत्पादनक्षम भांडवलाचा पुरवठा करण्याची तरतूद यामध्ये करण्यात आली होती. या योजनेसाठी आवश्यक असणारा वित्त पुरवठा ५०% केंद्र सरकार व ५०% राज्य सरकार यांच्याद्वारे करण्यात येत असे.

### जवाहर रोजगार योजना - (JRY)

१ एप्रिल १९८९ रोजी सुरु करण्यात आलेल्या जवाहर रोजगार योजनेत गेल्या काही वर्षांपासून बदल करण्यात येऊन काही नवीन योजना सुरु करण्यात आल्या होत्या. या दृष्टीने जवाहर रोजगार योजनेची उत्क्रांती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### अ) जवाहर रोजगार योजना - (JRY)

सहाव्या पंचवार्षिक योजनेत सुरु करण्यात आलेल्या पुढील २ योजनांचे एकत्रिकरण करुन १ एप्रिल १९८९ रोजी जवाहर रोजगार योजना सुरु करण्यात आली.

**१ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (NREP – २ ऑक्टोबर १९८०)**

**२ ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी कार्यक्रम (RLEGP – १५ ऑगस्ट १९८३)**

ही योजना एक महत्त्वाची मजूरी रोजगार योजना होती. ती पंचायत राजसंस्थांच्या माध्यमातून देशातील सर्व खेड्यांमध्ये राबविली जात होती. तिच्या माध्यमातून ग्रामीण भागात टिकाऊ पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याचा प्रयत्न केला गेला.

### ब) जवाहर ग्राम समृद्धी योजना (JGSY) :- जवाहर रोजगार योजना

जवाहर रोजगार योजनेची पुनर्रचना करून १ एप्रिल १९९९ रोजी तिच्या जागी जवाहर ग्राम समृद्धी योजना सुरु करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागात टिकाऊ पायाभूत सुविधांची निर्मिती होण्याबरोबरच ग्रामीण जनतेला शाश्वत रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे. तसेच ग्रामीण बेरोजगारांसाठी मजुरी रोजगाराची निर्मिती करणे हा आहे.

### क) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (SGRY) :-

जवाहर ग्राम समृद्धी योजना आणि आश्वासित रोजगार योजना (२ ऑक्टोबर १९९३) यांचे एकत्रिकरण करून २५ सप्टेंबर २००१ पासून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सुरु करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे रोजगारा बरोबरच ग्रामीण भागात अन्नसुरक्षा निर्माण करणे. तसेच स्त्रिया, अनुसूचित जाती व जमातींवर विशेष भर देणे. या योजनेचा वार्षिक प्रस्तावित खर्च १० हजार कोटी रूपये असून त्यामध्ये ५० लाख टन अन्नधान्याचा समावेश आहे. या योजनेसाठी आवश्यक असणाऱ्या निधीची विभागणी केंद्र व राज्य सरकारमध्ये ७५% व २५% या प्रमाणात केली जाईल. तसेच कामगारांचे किमान वेतन हे किमान २५% रोख स्वरुपात आणि किमान ५ कि.ग्रॅम अन्नधान्याच्या स्वरुपात अशा संमिश्र स्वरुपात दिले जाईल.

munotes.in

या योजनेची अंमलबजावणी पंचायत राजव्यवस्थेच्या तिन्ही टप्प्यांवर केली जाईल. या योजनेची वित्तीय संसाधने जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत यांच्यामध्ये २०:३०:५० या प्रमाणात विभागून घेतली जाईल. संपूर्ण ग्रामीण योजना ही राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये विलीन करण्यात आली.

**इंदिरा आवास योजना - (IAY)**

इंदिरा आवास योजना ही योजना १९८५-८६ मध्ये सुरु करण्यात आली. जवाहर रोजगार योजनेचा एक भाग म्हणून या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली. १ जानेवारी १९९६ पासून भारत सरकारने तिला स्वतंत्र दर्जा दिला. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मुक्त वेठबिगार या गटातील दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटुंबांना घरे बांधण्यासाठी किंवा सुधारण्यासाठी वित्तीय सहाय्य दिले जाते. या योजनेचा विस्तार लढाईत मरण पावलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबासाठी करण्यात आला. तसेच ३% घरे ग्रामीण दारिद्र्य रेषेखालील शारीरिक व मानसिक विकलांग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. २००६-०७ पासून दारिद्र्य रेषेखालील अल्पसंख्यांकाचाही समावेश या योजनेत करण्यात आला आहे. ही केंद्र पुरस्कृत योजना असून वित्तीय संसाधनांची विभागणी केंद्र व राज्यामध्ये ७५:२५ या प्रमाणात केली जाते. लाभार्थ्याची निवड ही ठरवून दिलेल्या कोट्यानुसार ग्रामसभेमार्फत केली जाते.

**प्रधानमंत्री ग्राम सडक योजना - (PMGSY)**

ही योजना २५ डिसेंबर २००५ पासून १००% केंद्र पुरस्कृत म्हणून सुरु करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे सर्व न जोडलेल्या खेडे गावांना बारामाही रस्त्यांनी जोडणे. या योजनेसाठी देशी, परदेशी, बहुराष्ट्रीय वित्तीय संस्थांची मदत घेतली जाते. या योजनेचे मुख्य उद्दीष्ट म्हणजे सपाट प्रदेशातील ५०० पेक्षा अधिक लोक वस्तीच्या तर डोंगराळ किंवा आदिवासी प्रदेशातील २५० पेक्षा अधिक लोकवस्तीच्या वस्त्यांना सिंगल बारामाही रस्त्यांनी जोडणे हे आहे. या योजनेत आतापर्यंत रस्त्यांनी न जोडण्यात आलेल्या वस्त्यांचाच समावेश करण्यात आला आहे.

**स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना - (SGSY)**

१) एकात्मिक ग्रामीण विकास (IRDP)

२) स्वयंरोजगारासाठी ग्रामीण तरूणांना प्रशिक्षण (TRYSEM)

३) ग्रामीण क्षेत्रातील स्त्रिया व मुलांचा विकास (DWCRA)

४) दशलक्ष विहिरींची योजना (MWS)

५) गंगाकल्याण योजना (GKY)

६) ग्रामीण कारागिरांना सुधारित अवजारांचा पुरवठा (SITRA)

अशा सहा योजनांचे एकत्रिकरण १ एप्रिल १९९९ पासून करून ही योजना सुरु करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे स्वयंरोजगाराच्या सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करण्यात आला आहे. त्यामध्ये गरीब लोकांना स्वयं-सहाय्यता गटांमध्ये संघटित करणे, प्रशिक्षण, वित्त पुरवठा, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा तसेच विपणन इत्यादींचा समावेश आहे.

या योजनेत अनेक संस्थांची एकात्मीकरण घडवून आणण्यात आले आहे. यामध्ये जिल्हा ग्रामीण विकास मंडळे, बँका, पंचायत राज-संस्था, स्वयंसेवी संस्था आणि इतर निम-सरकारी संस्था इत्यादींचा समावेश आहे.

ग्रामीण कुटुंबांना बँक पतपुरवठा आणि सरकारी अनुदाने यांच्या सहाय्याने काही उत्पन्न मिळवून देणारी मालमत्ता देऊन ३ वर्षांच्या कालावधीत त्यांना दारिद्र्य रेषेच्या वर आणणे. हे या योजनेचे मूळ उद्दीष्ट्य आहे. या मालमत्तेमधून मिळणारे उत्पन्न बँकेचा हप्ता वजा जाता किमान दोन हजार रुपये प्रतिमाह मिळावा अशी अपेक्षा आहे. या योजने अंतर्गत मिळणारे अनुदान हे प्रकल्प किंमतीच्या ३०% इतके आहे व अनुसूचित जमातींसाठी ५०% इतके आहे. व्यक्तिंच्या गटासाठी ५०% अनुदान असून जलसिंचन प्रकल्पांसाठी अनुदानाची कोणतीही कमाल मर्यादा नाही.

या योजनेसाठी आवश्यक असणारा निधी ७५% केंद्र सरकार व २५% राज्य सरकार यांच्या तर्फे मिळतो. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे हे या योजनेचे लक्ष्य गट आहेत. त्यातही पुढील घटकांसाठी विशेष सुविधा आहेत. एकूण सुविधांपैकी ५०% सुविधा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आहे. स्त्रियांसाठी ४०% तर ३% अपंगांसाठी राखून ठेवण्यात आली आहेत. ग्रामीण गरिबांच्या स्वयंरोजगारासाठीची सध्याही एकच महत्त्वाची योजना आहे.

**राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM) :-**

ग्रामीण विकास मंत्रालयाने सप्टेंबर २००९ मध्ये ही योजना सुरू केली. ग्रामीण दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे दारिद्र्य कमी करण्यासाठी स्वयंरोजगार व मजुरी रोजगाराच्या विविधीकृत संधी निर्माण करणे व शाश्वत आधारावर उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणे हे उद्दीष्ट ठरविण्यात आले.

**भारत निर्माण योजना :-**

१६ डिसेंबर २००५ रोजी ही योजना सुरु करण्यात आली. ही योजना म्हणजे 'ग्रामीण पायाभूत संरचनेसाठी एक बिझनेस प्लॅन' आहे. त्यामध्ये ग्रामीण भागात ६ क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधा विकासाचा समावेश आहे.

ग्रामीण पेयजल या संकल्पनेद्वारे २०१२ पर्यंत सर्व अलाभान्वित वस्त्यांना पेयजलाचा पुरवठा करण्यात आला. ग्रामीण गृहनिर्माण या प्रकल्पाद्वारे गरिबांसाठी घरांची उपलब्धता करून देणे. ग्रामीण दुर-संचारद्वारे पंचायत स्तरांवर भारत निर्माण केंद्र स्थळे स्थापन करणे. ग्रामीण रस्त्यांद्वारा १००० लोकसंख्या असलेली सर्व गावे (डोंगराळ किंवा आदिवासी भागात ५००) बारामाही रस्त्यांनी जोडणे. ग्रामीण विद्युतीकरणाद्वारे सर्व गावापर्यंत वीज पोहोचविणे व गरीब कुटुंबांना विजेचे कनेक्शन देणे. जलसिंचन योजनेद्वारे १ कोटी हेक्टर जमीन नव्याने सिंचनाखाली आणणे.

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (NREGS) :-**

७ सप्टेंबर २००५ रोजी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याची नोंदणी झाल्यावर २ फेब्रुवारी २००६ रोजी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली. यामध्ये संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (SGRY) आणि नॅशनल फुड फॉर वर्क प्रोग्रॅम (NFFWP) या दोन

munotes.in

योजना विलीन करण्यात आल्या. २ ऑक्टोबर २००९ रोजी महात्मा गांधी यांच्या १४०व्या जन्मतिथी दिवशी या योजनेचे नाव बदलून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे नाव देण्यात आले. सुरुवातीला ही योजना २०० जिल्ह्यांमध्ये सुरु करण्यात आली होती. त्यानंतर १ एप्रिल २००८ पासून ही योजना संपूर्ण देशभरात लागू करण्यात आली.

ज्या ग्रामीण कुटुंबातील तरूण सदस्य अकुशल अंगमेहनतीचे काम करू इच्छितात अशा प्रत्येक कुटुंबास प्रत्येक आर्थिक वर्षात किमान १०० दिवसांचा मजुरी रोजगार पुरविण्याची हमी राज्य सरकारने घेतली आहे. प्रत्येक कुटुंब १०० दिवसांच्या रोजगाराचे विभाजन कुटुंबाच्या प्रौढ सदस्यांमध्ये करू शकतो. अशा प्रकारची ही जगातील पहिलीच योजना आहे.

काम करण्यास इच्छुक प्रत्येक परिवार ग्राम पंचायतीमध्ये नोंदणी करू शकतो. ही नोंदणी ५ वर्षांसाठी वैध असे. ग्राम पंचायत अशा नोंदणीकृत परिवारास फोटोग्राफयुक्त जॉब कार्ड देते.

अर्जदाराने अर्ज केल्यापासून पंधरा दिवसाच्या आत त्याच्या घरापासून ५ किलोमीटर अंतराच्या परिसरात त्याला रोजगार पुरवला जाईल. अन्यथा त्या राज्य सरकारांनी जाहीर केल्याप्रमाणे त्यांना प्रतिदिन बेरोजगारी भत्ता दिला जाईल. भत्त्याचा दर आर्थिक वर्षातील पहिल्या ३० दिवसांसाठी मजुरी दराच्या २५% पेक्षा कमी नसावा. तर वर्षातील पुढील कालावधीसाठी मजुरी दराच्या ५०% पेक्षा कमी नसावा. रोजगार ५ किमी क्षेत्राच्या बाहेर उपलब्ध करून दिल्यास १०% अतिरिक्त मजुरी दिली जाईल.

मजुरीचा दर किमान १०० रूपये प्रतिदिन करण्यात आला. प्रत्येक राज्य सरकार अर्थसंकल्पातील या तरतुदीद्वारे आपला दर ठरवतात. महाराष्ट्रात हा दर १४५ रू. इतका करण्यात आला आहे. महिलांसाठी ३३% आरक्षणाची तरतुद या कायद्यात करण्यात आली आहे.

राज्यांनी उपलब्ध करून दिलेल्या रोजगारावर होणाऱ्या खर्चापैकी ९०% खर्च केंद्र सरकार उपलब्ध करून देते. या योजनेचे वेळोवेळी परिक्षण करण्यासाठी केंद्र पातळी, राज्य पातळी, जिल्हा पातळीवर परिषदा स्थापन करण्यात येतात व त्यासाठी एक योजना अधिकाऱ्याची निवड केली जाते. ग्राम सभेच्या शिफारशीनुसार प्रकल्पांची निवड अंमलबजावणी आणि पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी ग्राम पंचायतीची असेल.

**वीस कलमी कार्यक्रम :-**

२६ जून १९७५ रोजी वीस कलमी कार्यक्रम स्व. इंदिरा गांधी यांनी सुरू केला. दारिद्र्य रेषेखालील जनतेच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा करणे हा त्यामागील प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमाची नंतर पुनर्रचना करण्यात आली. गरिबी हटाओ असे या कार्यक्रमाचे घोष वाक्य आहे. ही वीस कलमे पुढीलप्रमाणे –

१) गरिबी हटाओ.

२) जनशक्ती

munotes.in

३) किसान मित्र

४) श्रमिक कल्याण

५) सर्वांसाठी घरे

६) स्वच्छ पेयजल

७) खाद्य सुरक्षा

८) सर्वांसाठी आरोग्य

९) सर्वांसाठी शिक्षण

१०) अनुसूचित जाती, जमाती अल्प संख्याक आणि इतर मागासवर्गीयांचे कल्याण

११) महिला कल्याण

१२) बालकल्याण

१३) युवा विकास

१४) झोपडपट्टी सुधार

१५) पर्यावरण संरक्षण आणि वनवृद्धी

१६) सामाजिक सुरक्षा

१७) ग्रामीण सडक

१८) ग्रामीण उर्जा

१९) मागास भागांचा विकास

२०) ई-शासन

**पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) :-**

हा कार्यक्रम ऑगस्ट २००८ मध्ये नव्याने सुरु करण्यात आलेला पत आधारित अनुदान कार्यक्रम आहे. यामध्ये ग्रामीण भागात व शहरी भागात सुक्ष्म उपक्रमांच्या स्थापनेच्या माध्यमातून रोजगाराच्या संधीच्या निर्मितीवर भर देण्यात आला आहे. विस्तृतपणे विखुरलेल्या पारंपारिक कारागिरांना किंवा ग्रामीण व शहरी बेरोजगार तरूणांना एकत्र आणणे व त्यांना शक्यतो त्यांच्या राहत्या घराजवळच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे. तसेच ग्रामीण तरूणांचे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी करण्यासाठी शाश्वत रोजगार उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट्य आहे.

**राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण (NSDP) :-**

भारत सरकारने फेब्रुवारी २००९ मध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण जाहीर केले. या धोरणाचे उद्दिष्ट म्हणजे कौशल्य विकास समावेशी बनविणे आणि भारतीय कामगारांमधील ग्रामीण – शहरी, पुरुष – महिला, संघटित -असंघटित आणि पारंपारिक – आधुनिक या आधारावरील आर्थिक व सामाजिक विभागणी दूर करणे, विविध उद्योग व उपक्रमांमध्ये कौशल्यांची वाढती मागणी बरोबरीने भागविणे.

रोजगार निर्मिती हे दारिद्र्य निर्मुलनाचे महत्त्वाचे साधन असल्यामुळे सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण विकासासाठी वरील कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी केली आहे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) ग्रामीण विकासाचे विविध कार्यक्रम सांगा.

## २.५ सारांश :-

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर देशाचा जलदगतीने आर्थिक विकास घडवून आणण्याचा प्रश्न शासनासमोर होता. आपल्या देशाची अर्थव्यवस्था फार मोठ्या संकटात सापडली होती. या परिस्थितीवर मात करण्यासाठी आपल्या राज्यकर्त्यांनी आर्थिक नियोजनाच्या मार्गांचा अंगीकार करून आर्थिक विकासाला गती देण्याचे ठरविले. नियोजनबद्ध विकासाचे उद्दिष्ट्य निश्चित करण्यात आले. त्यासाठी नियोजन मंडळाची स्थापना करून पंचवार्षिक योजनांची आखणी करून अंमलबजावणी आली. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी विविध विकास कार्यक्रम राबविण्यात आले.

## २.६ स्वाध्याय :-

१) भारतातील 'ग्रामीण पुनर्रचना' यावर भाष्य करा.
२) समाज विकास योजनेची माहिती द्या.
३) भारतातील पंचवार्षिक योजनांचा आढावा घ्या.
४) ग्रामीण विकासाचे विविध कार्यक्रम यावर चर्चा करा.

## २.७ संदर्भ सूची

१) आगलावे प्रदिप : ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन – नागपुर
२) नाडगोंडे गुरुनाथ : ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टीनेन्टल प्रकाशन – पुणे
३) देसाई श्री. मु. : भारतीय अर्थव्यवस्था, भालेराव निर्मला, निराली प्रकाशन – पुणे
४) कोळंबे रंजन : भारतीय अर्थव्यवस्था, भागीरथ प्रकाशन – पुणे
५) रिबेलो क्लेमेंटाईन : बचतगट, गौरव बुक हाऊस – नागपुर

❖❖❖❖

# घटक -३

## ग्रामीण समाज

- प्रा. विवेक शां. चव्हाण

**पाठाची रचना :**

३.१ उद्दिष्ट्ये
३.२ प्रस्तावना
३.३ ग्रामीण समाजाची संकल्पना
३.४ ग्रामीण समाजाचे स्वरूप
३.५ ग्रामीण समाजाची उत्पत्ती
३.६ ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये
३.७ सारांश
३.८ स्वाध्याय
३.९ संदर्भसूची

### ३.१ उद्दिष्ट्ये :-

१) ग्रामीण समाजाचा अभ्यास करणे.
२) ग्रामीण समाजाचे स्वरुप अभ्यासणे.
३) ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये अभ्यासणे.
४) ग्रामीण समाजातील परिवर्तन अभ्यासणे.

### ३.२ प्रस्तावना :-

भारतीय समाजाचा अभ्यास करताना भारतीय ग्रामीण समाजाचा अभ्यास अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो. भारत हा खेड्याचा देश म्हणून समजला जातो. भारत हा खेडीप्रधान देश आहे, असे वर्णन महात्मा गांधीजींनी केले होते. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६८ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. भारतात सहा लाखांपेक्षा अधिक खेडी आहेत. भौगोलिक परिस्थितीमुळे प्रत्येक खेड्यांच्या सामाजिक व भौतिक रचनेमध्ये भिन्नता आढळते. प्राचीन काळी वाहतूक व दळणवळणाच्या अभावामुळे खेडी स्वयंपुर्ण व स्वायत्त असलेली दिसून येतात. खेड्यातील लोकांच्या गरजा खेड्यातील लोकांकडून भागविल्या जात होत्या. शेती व्यवसायाने भारतीय सामाजिक संघटन तसेच मानसिक व भावनिक जीवन प्रभावित केले असून ग्राम हाच भारतीय सामाजिक जीवनाच्या संस्कृतीचा प्रमुख आधार आहे. बलुतेदारी पद्धतीतून ग्रामीण समाजाला

बळकटी प्राप्त झालेली दिसून येते. ब्रिटीश राजवटीपूर्वी ग्रामीण समाजात असलेली ही स्वयंपूर्णता वर्षानुवर्षे टिकून असलेली दिसून येते.

प्राचीन भारतीय समाजाचे स्थिरता हे वैशिष्ट्य होते. परंतु ब्रिटीश कालखंडात परिवर्तनाची प्रक्रिया गतीमान होऊन ग्रामीण स्वावलंबन संपुष्टात येऊन परावलंबन वाढत गेले. जातपंचायत, ग्रामपंचायत, संयुक्त कुटुंब इ. प्रभाव कमी होऊन यांची कार्ये परावर्तीत झाली. ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात राष्ट्रीयच नव्हे तर जागतिक अर्थव्यवस्थेचीही अंग बनली. सामाजिक संघटनांमध्ये बदल झाले. ग्रामीण समाज बदलत गेला. दारिद्र्य, बेरोजगारी या समस्या ग्रामीण समाजाला भेडसावू लागल्या औद्योगिकीकरण, शहरीकरण, पाश्चिमात्यिकरण परिणाम ग्रामीण जीवनावर झालेला दिसून येतो.

## ३.३ ग्रामीण समाजाची संकल्पना :-



भारतीय ग्रामीण समाजाचा अभ्यास अलिकडचा / आजचा नसून या समाजाच्या अभ्यासाला १० व्या शतकापासून सुरुवात झालेली आहे. त्यात सातत्याने भरच पडत आहे. समाजाविषयीचे संशोधन देशी तसेच विदेशी संशोधकांनी, विचारवंतांनी केलेले दिसून येते. ग्रामीण समाजाचा अभ्यास कौटिल्याच्या अर्थशास्त्रात, महाभारत, ऋग्वेद इ. ग्रंथात आढळतो. याचाच अर्थ असा की, ग्रामीण समाजाला हजारो वर्षाचा इतिहास असून त्याच्या विकासाच्या दृष्टीने निश्चितच प्रयत्न करणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून समाजसेवक सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था, संघटना, राजकीय नेते महात्मा गांधीजीचे खेड्यांच्या विकासाचे स्वप्न साकारण्यासाठी प्रयत्नशील असलेले दिसून येतात, हे विकासाचे कार्य वेगवेगळ्या ठिकाणी चालत असले तरी समाज अनेक प्रश्नांनी ग्रासलेला दिसतो. अनेक समस्या ग्रामीण समाजाच्या पाचवीलाच पुजलेल्या दिसून येतात.

खेडी अस्तित्वात येण्यापूर्वीचे मानवी जीवन संघर्षमय असलेले दिसून येते. रानटी पशुंचा मुक्त संचार त्यातून त्याच्यात निर्माण झालेली सुरक्षतेची भावना त्यातून वस्तीची निर्मिती

झालेली दिसून येते. शेती व्यवसायातून मानवी जीवनाला स्थिरत्व प्राप्त झालेले दिसून येते. शेती अर्थव्यवस्थेवर अवलंबून असणारी कायम स्वरुपी वसाहत निर्माण झालेली दिसते.

मध्ययुगीन काळात हा समाज स्वयंपूर्ण असलेला दिसून येतो. जातीप्रथा, संयुक्त कुटुंब पद्धती, बलुतेदारीपद्धत हे घटक महत्त्वपूर्ण असलेले दिसून येतात. आधुनिक काळात ग्रामीण जीवनाचे स्वयंपुर्ण, स्थितीशीलता, सजातीय समुदाय हे पारंपारिक चित्र बदललेले दिसून येते. औद्योगिकरण, आधुनिकीकरणामुळे ग्रामीण समाजात परिवर्तन झालेले दिसून येते.

साधारण जे नगर नाही ते खेडे मानले जाते. जेथे कमी लोकसंख्या असून शेती हा मुख्य व्यवसाय आहे. अशा मानवी समूहास ग्रामीण समाज म्हटले जाते. तथापि एवढ्यावरुन ग्रामीण समाजाचा अर्थ स्पष्ट होत नाही. म्हणून ग्रामीण समाज शास्त्रज्ञांनी त्याविषयी मांडलेल्या कल्पनांचा अभ्यास करणे उचित ठरेल व त्यातूनच ग्रामीण समाजाची संकल्पना अधिक स्पष्ट होईल.

**ग्रामीण समाजाच्या व्याख्या**

संपुर्ण मानवी समुदायाचे ग्रामीण समुदाय व नागरी समुदाय असे दोन प्रकार समाजशास्त्रज्ञ पाडतात. प्रथम ग्रामीण समुदाय अस्तित्वात आला व नंतर नागर समुदायाचा उदय झाला. नागर समुदायाच्या तुलनेने जे नगर किंवा शहर नाही ते खेडे अशी खेड्याची व्याख्या केली जाते. त्याचप्रमाणे समुदाय मानले जाते. ग्रामीण समुदाय म्हणजे काय हे समजण्यासाठी ग्रामीण समुदायाच्या समाजशास्त्रांनी केलेल्या व्याख्या पाहणे योग्य ठरेल.

munotes.in

१) **त्रि. ना. अत्रे** यांनी "गावगाडा" या ग्रंथात खेड्याची व्याख्या सांगितली आहे. "जिच्या सभोवती कीर्दसार-वहीताला जमीन आहे व जिच्यामध्ये मातब्बर शेतकरी व पुष्कळसे मजूर आहेत. अशा वस्तीला ग्राम म्हणतात."

२) **हॅरॉल्ड पीक** यांच्या मते ग्रामीण समुदायात अशा परस्पर संबंधीत किंवा असंबंधीत व्यक्तींच्या समुहाचा अंतरभाव होतो की जो समूह एका कुटुंबापेक्षा मोठा आहे व त्या व्यक्तींची घरे अगदी जवळ जवळ किंवा अनियमित वसलेली असतात. या समुदायाच्या कृषीयोग्य जमिनीवर शेती केली जाते व सभोवतालच्या पडीक जमीनीवर गुरे चारली जातात. शेजारच्या सीमेपर्यंत पसरलेल्या कृषी योग्य व पडीक जमीनीवर त्या समुदायाची मालकी हक्काची भावना असते.

३) **त्रि. ना. अत्रे** "खेडणे म्हणजे जमीन कसणे व खेडूत म्हणजे जमीन कसणारा तेव्हा खेडुतांची वस्ती म्हणजे खेडे होय."

४) **राधाकमल मुखर्जी** गाव म्हणजे असा समुह की ज्याच्या ठिकाणी सापेक्ष अशी सांस्कृतिक व सामाजिक साम्ये आढळतात ज्याचे स्वरुप अनौपचारिक व प्राथमिक समुहासारखे असते. तेथे लोकसंख्येची घनता कमी असून शेती हाच प्रमुख व्यवसाय असतो.

५) **प्रा. चंद्रकांत खंडागळे**

ग्रामीण समाज म्हणजे सापेक्षता लघु आकाराच्या भूप्रदेशातील अशी मानवी वसाहत की जिच्यामध्ये लोकसंख्येची घनता कमी असून प्राथमिक संबंधाचा प्राबल्य असते आणि मुख्यतः कृषीप्रधान असे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन आढळते.

६) भिन्नता दाखविणाऱ्या विशिष्ट नावामुळे सुस्पष्ट ओळखला जाणारा भिन्न सामाजिक घटक म्हणून दुसरे लोक आणि स्वतः ज्या समाजातील रहिवाशी मानतात असा घरांचा समूह म्हणजे खेडे होय.

वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर ग्रामीण समाजाचा अर्थ अधिक स्पष्ट होतो. ग्रामीण समाजामध्ये लहान-लहान आकाराचे समुह आढळतात. हा समाज आर्थिकदृष्ट्या शेतीवर अवलंबून असलेला दिसून येतो. लोकसंख्येची घनता कमी दिसून येते. शेती आणि शेतमजुरी करणारी जनता ग्रामीण समाजात सर्वत्र आढळते.

भारतीय ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना प्रत्येक खेड्यांची मशागतीला योग्य अशी जमीन असते. सर्वसाधारणपणे मध्यजागेत राहती घरे वसलेली असतात आणि या वस्तीच्या आजूबाजूला मशागतीला योग्य जमिनी असतात. भरपूर जमीन व जनावरांसाठी राने पसरलेली असतात. ही राने व राहती घरे यांनाच खेडे असे संबोधले जाते.

## ३.४ ग्रामीण समाजाचे स्वरूप

ग्राम एक स्वयंपूर्ण एकरुप समाज व्यवस्था म्हणून ओळखली जाते. ग्रामाला एकात्म बंधनात ठेवण्यासाठी ग्रामातील परंपरा, रितीरिवाज इ. ची प्रमुख भूमिका असते व ग्रामातील व्यक्ती व परंपरांचे रितीरिवाजांचे उल्लंघन करीत नाही. व्यक्तीचा मानसन्मान, ओळख धारणा इ. ग्रामाच्या आधारावरच निश्चित होतात. पारंपारिक समाजव्यवस्थेत ग्रामातील प्रत्येक व्यक्ती ग्रामाच्या हिताच्या दृष्टीकोनातून कार्य करत असे. शेतीसाठी लागणारी सामुग्री, सहाय्य गावातील व्यक्तीच्या सहाय्याने पार पाडल्या जात असत. त्यासाठी गावामध्ये जजमानी पद्धत अस्तित्वात होती. जन्म, मृत्यू, विवाह, संस्कार परस्पर सहकार्याने पार पाडले जात असत. ग्रामस्तरावर जात पंचायत, आंतरजाती पंचायत व ग्रामपंचायतीद्वारे अनेक कार्य म्हणजे शिक्षण, स्वच्छता ग्रामोत्सव, भांडणतंटे मिटवले जात. ग्रामपंचायतीद्वारे स्थानिक प्रशासन पाहीले जात असे. तर जात पंचायत जातीसाठी कार्य करीत असे. ग्रामवासियांच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक इ. आवश्यकतांची पुर्तता करणारी समाजव्यवस्था असलेली दिसून येते. समाजातील एकात्मतेची भाषा दिसून येत असल्याने ग्राम ही एक स्वयंपूर्ण समाजव्यवस्था आहे असे म्हणता येईल.

**प्रेमनाथ बॅनर्जी** यांच्यामते, "वैदिक काळापासून खेडी ही स्वयंशासित होती, मध्यवर्ती शासनाच्या नियंत्रणापासून खेड्यांचा कारभार मुक्त होता. ग्रामिणी व इतर पदाधिकारी यांची नियुक्ती खेडीच करीत असत. खेड्यांच्या कारभारासंबंधीची माहिती रामायणात देखील आढळून येते." विविध नियुक्त केलेल्या पदाधिकाऱ्यांवर खेडयांचे नियंत्रण असे गावाचा कारभार चालविण्यासाठी गावातील काही प्रमुख सेवक काम करीत असत. ते सेवक खालील प्रमाणे आहेत.

### १) ग्रामिणी :

या व्यक्तीला गावातील प्रमुख नागरिकाचा मान मिळत असे. ही खेड्यातील प्रमुख व्यक्ती मानली जात असे. लोकहिताच्या दृष्टीकोनातून ग्रामिणीची ख्याती फार मोठी होती.

खेड्याचे संरक्षण करणे, जमिनीवरील सारा महसुल गोळा करणे, गावातील भांडण तंटे सोडविणे, सार्वजनिक कामे करणे इ. महत्त्वाची कामे त्याला करावी लागत असत. खेड्यामध्ये अत्यंत प्रभावी असणाऱ्या या गावप्रमुखाला कामाचे वेतन म्हणून विशिष्ट जमिनी दिल्या जात असत. ह्या गाव प्रमुखाला विविध राज्यात विविध नावांनी ओळखले जात असे. मुखीया, कर्मिष्ठ, पटेल इ. नावे गावप्रमुखांची होती.

**२) हिशेबनीस :**

ग्रामिणी गावप्रमुखाच्या हाताखालचा सेवक म्हणून याच्याकडे पाहिले जात असे. गावप्रमुखाच्या हुकूमानुसारच हिशेबनिसाला वागावे लागत असे. गावाचा हिशेब ठेवणे, जमिनीच्या हक्का संबंधीची महत्त्वाची कागदपत्रे सांभाळणे, एखादा अनुचित प्रकार घडल्यास त्यासंबंधीची नोंद करुन सरकारला कळविणे इ. कार्ये त्याला पार पाडावी लागत असे. त्याला वेतन म्हणून जमिनी दिल्या जात असत. पटणारी, पटेल, खोत, कुलकर्णी इ. नावांनी त्याला ओळखले जात असे.

**३) चौकीदार :**

खेड्यामधील कायदा सुव्यवस्था राहण्यासाठी याला नियुक्त केलेले असते. खेड्यातील हा पोलिस होय. याची जबाबदारी म्हणजे खेड्यात पहारा ठेवणे, गुन्ह्यांचा वृत्तांत सरकारला कळविणे गुन्ह्यांचा शोध घेण्यासाठी सरकारी पोलीसांना मदत करणे. वेळ पडल्यास गुन्ह्यासंबंधी संबंधीत असणाऱ्या लोकांना अटक करण्याचा अधिकार देखील त्याला असे.

**४) संदेशवाहक :**

गावातील लोकांना माहिती पुरविण्यासाठी याची नियुक्ती केलेली असे. याचे महत्त्वाचे काम म्हणजे गावप्रमुखाचा निरोप सर्व लोकांना कळविणे, सरकारी मालमत्ता, झाडे, हद्दनिशाण्या यामध्ये बिघाड झाला तर गाव प्रमुखाला कळविणे.

**५) बलुता पद्धती / जजमानी पद्धत :**

भौतिकदृष्ट्या खेडी ही नगर व इतर खेड्यांपासून अलग असल्याने त्यांना मुलभूत व आर्थिक गरजा भागविण्यासाठी गावातच सहकार्याने स्वतंत्र अशी आर्थिक यंत्रणा उभी करावी लागली. शेती करणारा तो शेतकरी. पण शेतीसाठी अवजारे बनविणारा इतर साधने करणारे बिगर शेती कारागीर उदा. सुतार, चांभार, लोहार, कुंभार इ. परस्परांच्या गरजा भागवित व आपला उदरनिर्वाह करीत या परस्परावलंबनातून बलुतेदारी पद्धत रुढ झाली.

महाराष्ट्रात जी बलुतेदारी पद्धत रुढ होती. त्यात आढळणारे बारा बलुतेदार कारु म्हणजे सुतार, लोहार, कुंभार, चांभार, न्हावी, परिट, कोळी, महार, मांग, चौंगुला व जोशी हे होते तर अठरा बलुतेदार म्हणजे तेली, तांबोळी, साळी, धनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डवऱ्या, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, वाजंत्री, घडसी, कलावंत, तराळ, भोई आणि मुल्लाणी यांना नारु किंवा अलुतेदार म्हटले जाई. यांच्या सेवेच्या बदल्यास बलुतेदारांना धान्य किंवा भेटवस्तू दिल्या जात असत. बलुतेदार व शेतकरी वर्ग यांचे संबंध जिव्हाळा आणि कौटुंबिक असत, सुखदु:खाच्या प्रसंगी हे लोक एकमेकांना मदत करीत असत.

**६) जमीनदार :**

जमीनदार वर्गाला गावामध्ये मानाचे स्थान दिले जाई. कित्येक वेळा स्थानिक पातळीवर न्याय निवाड्याचे काम जमिनदारांकडूनच केले जाई. जमीनदार व कुळ यांचे संबंध शेतजमिनीच्या दृष्टीने घनिष्ठ आढळून येत असत. स्थानिक पातळीवरील विविध कामे पार पाडली जात असत. गावातील वाद जमीनदारांच्या मध्यस्थीनेच मिटवले जात.

ग्रामीण समाजात वेगवेगळ्या प्रकारच्या व्यवस्था जिवंत होत्या. आर्थिक समृद्धता होती. धर्मबंधने प्रभावी होती. भावनिक ऐक्य होते. खेडे हा राज्ययंत्रणेचा केंद्रबिंदू होता. कारण ग्रामीण समाज हा सुरुवातीपासून अस्तित्वात आलेला होता. गावातील तंटे, वाद, दोन खेड्यातील तंटे हे एकत्र येऊन मार्ग काढण्याची प्रथा रुढ होती. वाईट गोष्टीस कडक शासन करुन सामाजिक नियंत्रण साधले जाई.

ग्रामीण समाजाचे स्वरुप वरील मुद्द्यांच्या आधारे सांगता येईल.

## ३.५ ग्रामीण समाजाची उत्पत्ती

ग्रामीण समाजाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. याचा अभ्यास केल्यानंतर या कालावधीमध्ये मानवाची सतत भ्रमंती चाललेली दिसून येते. एका निश्चित अशा भूभागावर राहून आपण आपला विकास करावा असे मानवाला वाटत नव्हते. पुढे प्राणी व पक्षी मारण्यापेक्षा ते पाळले तर दूध, मांस, कातडे, चरबी, वाहतुक इ. सर्वच दृष्टीने सोयीचे पडते. हे लक्षात येताच मानव पशुपालन करु लागला. पाळलेल्या पशुंना ज्या भागात चारा मिळेल. त्या भागात तो तात्पुरती वस्ती करु लागला.

याच कालावधीत मानवाला शेतीचा शोध लागला. धान्य पेरण्यानंतर जे रुजते त्याच्यापासून धान्य मिळते या महत्त्वपुर्ण शोधामुळे तो जिथे-जिथे सुपीक जमीन दिसेल तिथे तिथे स्थिर होऊ लागला. शेतीच्या शोधाबरोबरच त्याला लागलेला अग्नीचा शोध हा देखील त्याच्या स्थिरतेच्या दृष्टीकोनातून उपयुक्त ठरला. आणि त्यातून त्याची भ्रमंती कमी झाली.

शेती व्यवसाय करत असतेवेळी संरक्षणासाठी एकत्र राहणे महत्त्वाचे व निकडीचे होते. त्यामुळे एकत्र राहणे यातून खेड्यांच्या निर्मितीस प्रारंभ झाला. लागवड योग्य जमीनी, नद्या, नाले, ओढे इ. पाण्याच्या ठिकाणी मानव लोकवस्ती करु लागला. शेती उत्पादनाचा साठा करु लागला. त्याचा व्यापार केला जाऊ लागला. भ्रमंती करणारा समाज एका ठिकाणी स्थिर झाला. हळूहळू ग्रामीण संस्कृतीचा विकास झाला.

भौगोलिक परिस्थितीनुसार प्रत्येक खेड्याचा आकार, वस्ती, जीवनपद्धती, जीवन विषय दृष्टीकोन, धर्मकल्पना, चालीरिती यामध्ये तफावत आढळून येते.

खेडेगावात राहणारे सर्वच लोक शेती व्यवसाय करत होते असे नाही तर शेती संलग्न व्यवसाय असणारे अनेक व्यवसाय करु लागले. मानव विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करु लागला. लोकसंख्या वाढीबरोबरच वेगवेगळ्या प्रदेशांच्या पर्यावरणाला अनुसरुन इतर व्यवसाय विकसीत

munotes.in

झाले. कालांतराने शेती व्यवसायापासून एक भाग मुक्त होऊन इतर उद्योग धंद्याकडे वळला. यातूनच तंत्रविद्या, कला, विज्ञान, तत्वज्ञान, यासारख्या शाखा निर्माण झाल्या. मानवी जीवनावर याचे दुरगामी परिणाम झाले. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास ज्ञानाच्या विकासामुळे मानवाची भटकी अवस्था संपली व खेड्यांचा उगम झाला.

भारतीय बहुसंख्य खेड्यांची उत्पत्ती व विकास नद्यांच्या परिसरात अधिक प्रमाणात झालेली दिसून येते. उदा. गंगा, यमुना नद्यांच्या परिसरात खेड्यांचा विकास जलदगतीने झालेला आढळतो. ग्रामीण समाजाच्या उत्पत्तीस ग्रामीण समाजशास्त्रज्ञांनी खालील घटक जबाबदार असलेले दिसून येतात. ज्या ठिकाणी हे घटक प्रबळ आहेत. त्या ठिकाणी समाज अधिक परिणामकारक वसलेला दिसून येतो.

ग्रामीण समाजाची उत्पत्ती

- **भौगोलिक घटक**
- जमीन
- हवामान
- पाणी
- आर्थिक घटक
- सहकार्याची भावना
- बुद्धीजीवी वर्ग व श्रमजीवीवर्ग

munotes.in

**१) भौगोलिक घटक :**

भौगोलिक घटकांमध्ये जमीन, हवा आणि पाणी यांचा समावेश होतो. ह्या गोष्टी ज्या ठिकाणी अनुकूल आहे. तेथेच खेड्यांची मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. आणि ज्या ठिकाणी प्रतिकूल परिस्थिती आहे. त्या ठिकाणी वस्ती विरळ स्वरुपात आढळून येतात.

**i) जमीन :**

वाळवंटी प्रदेशात, दऱ्याखोऱ्यात, डोंगराळ भागात तुरळक स्वरुपाची वस्ती आढळते. कारण प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगावे लागते. अन्नाचा प्रश्न सातत्याने भेडसावतो. मात्र उत्पादनक्षम जमीन ज्या ठिकाणी आहे. तेथे वस्ती झपाट्याने वाढलेली दिसून येते. उदा. गंगा यमुना खोरे या ठिकाणी शेतीस उपयुक्त सुपीक जमीन आहे. तेथे शेती उत्पन्न मोठ्या प्रमाणात घेतले जाते. याचा अर्थ असा की खेड्याच्या निर्मितीमध्ये जमीन हा घटक महत्त्वाचा आहे.



**ii) हवामान :**

ज्या प्रदेशामध्ये हवामान मानवी लोकवस्तीस अनुकूल आहे. उदा. हवामान ज्या ठिकाणी समशीतोष्ण आहे. तेथे लोकवस्ती दाट असलेली दिसून येते. उलट ज्या ठिकाणी हवामान थंड अथवा उष्ण आहे. तिथे लोकवस्ती तुरळक स्वरुपात आहे.

**iii) पाणी :**

मानवाच्या आरोग्याच्या दृष्टीने तसेच शेती व्यवसायाच्या दृष्टीने पाणी मुलभूत गरज असून जिथे भरपूर पाणी आहे. अशा ठिकाणी मानवी समाज मोठ्या प्रमाणात पहायला मिळतो. मात्र पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या प्रदेशात लोकवस्ती किरकोळ स्वरुपात आढळते.

**२) आर्थिक घटक :**

आर्थिक विकासाच्या दृष्टीने ज्या ठिकाणी जमीन सुपीक आहे अशा ठिकाणचा शेतकरी वर्ग आर्थिकदृष्ट्या सबल आढळतो. सर्वजण अशा ठिकाणी वास्तव्य करणे अधिक पसंत करतात. स्थानिक साधनसामुग्रीचा वापर करुन जिथे उद्योग व्यवसायांची निर्मिती केली जाते तिथे देखील खेड्याचे प्रमाण अधिक आढळते.

**३) सामाजिक स्वास्थ :**

सामाजिक स्वास्थ ज्या लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळते. अशा ठिकाणी खेड्याची निर्मिती झपाट्याने झालेली दिसून येते. आपआपसात हेवेदावे नसणे हे सामाजिक स्वास्थाचे लक्षण आहे. सामाजिक प्रश्न सामोपचाराने सोडविण्याची प्रवृत्ती ज्या लोकांमध्ये अधिक आढळते. त्या खेड्यांची झपाट्याने प्रगती झालेली दिसून येते.

**४) सहकार :**

एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती ज्या खेड्यांत अधिक आढळते. अशा भागातील खेडी अल्पावधीतच नावारुपाला आलेली आढळतात. मात्र सहकाराची वृत्ती नसणाऱ्या भूप्रदेशातील खेड्याची अधोगती झालेली दिसून येते.

**५) बुद्धिजीवी व श्रमजीवी वर्ग :**

बुद्धीमत्तेच्या जोरावर काही भूप्रदेशातील लोकांनी अल्पावधीत आपली प्रगती करुन घेतलेली असते. त्याचबरोबर श्रम करण्याची तयारी या लोकांची असते. रुढी परंपरांचा पगडा ज्या ठिकाणी अधिक आढळतो. तिथे विरळ स्वरुपाची खेडी आढळतात. बुद्धी आणि श्रम या दोन गोष्टींची जोड ज्या ठिकाणी आढळते तो समाज व खेडी विकासाच्या मार्गावर असलेली दिसून येतात.

## ३.६ ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये :

ग्राम एक स्वयंपूर्ण एकरुप समाज व्यवस्था म्हणून ओळखली जाते. ग्रामाला बंधनात टिकवण्यासाठी ग्रामातील परंपरा, रितीरिवाज इ. प्रमुख भूमिका असते. व ग्रामातील व्यक्ती या परंपरा रितीरिवाजांचे उल्लंघन करत नाही. व्यक्तीचा मानसन्मान, ओळख धारणा इ. ग्रामाच्या आधारावरच निर्माण होतात.

विविध देशातील ग्रामीण समाज व भारतीय ग्रामीण समाज यात खूप मोठा फरक दिसून येतो. म्हणूनच भारतीय ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये ही जगातील ग्रामीण समाजापेक्षा वेगळी असलेली दिसून येतात. भारतीय ग्रामीण समुदायाची स्वतःची काही वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे ग्रामीण समाजाचे वेगळेपण लक्षात येते. या वैशिष्ट्यांमुळे काळाच्या ओघात देखील खेडी आपले अस्तित्व टिकवून ठेऊ शकली. पारंपारिक ग्रामीण समाजाच्या अंगभूत वैशिष्ट्यांचा व प्रशासकीय वैशिष्ट्यांचा उल्लेख खालीलप्रमाणे करता येईल.

### १) आर्थिक स्वयंपुर्णता :

प्रत्येक खेडे हे दुसऱ्या खेड्यापासून दूर असल्याने वाहतुकीची साधने उपलब्ध नसल्याने प्रत्येक खेड्याला स्वयंपूर्ण होणे क्रमप्राप्त होते. खेड्यांनी निर्वाहविषयक गरजांचा विचार केलेला होता. यासाठी खेड्यांनी स्वतंत्र यंत्रणा उभी केली होती. बाह्य जगाशी संबंध नसल्याने समाजाच्या मुलभूत गरजा खेड्यातच भागविल्या जात होत्या. याचा अर्थ खेडी ही आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होती. प्रत्येकाचे व्यवसाय ठरलेले असल्याने खेड्यांच्या स्वयंपुर्णतेला बळकटी आलेली होती.

### २) अलगता :

भारतीय खेडी बाह्य जगापासून अलग होती. वाहतुकीच्या अपर्याप्त, अप्रगत व असुरक्षित व्यवस्थेमुळे खेड्यांचा इतर खेड्यांशी व शहरांशी संबंध जवळ जवळ नसल्यासारखाच होता. यात्रा, तीर्थयात्रा, बाजार, जनावरांची खरेदी, विवाह यासारख्या प्रसंगीच लोक खेड्याबाहेर पडत. अनेक खेडी दुर्गम भागात वसल्याने त्यांच्याशी संपर्क साधणे कठीण जाते. या अलगतेचा ग्रामीण समाजावर दुरगामी परिणाम झाला. खेड्यांचे बाह्य जगाशी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित होऊ शकले नाहीत.

### ३) स्वायत्तता :

आर्थिक स्वयंपुर्णता आणि अलगता या दोन वैशिष्ट्यातूनच स्वायत्तता हे तिसरे वैशिष्ट्य निर्माण झाले आहे. गावातील अनुभवी, वृद्ध कर्तबगार लोकांच्या सल्ल्यानेच ग्रामीणी व त्यांचे मदतनीस गाव कारभार चालवत असत. जमीन महसुल गोळा करणे व मध्यवर्ती राज्यसत्तेकडे जमा करणे, न्यायदान करणे व गावकारभार पहाणे ही पंचायतीची प्रधान कामे होती. पंचायतीच्या कारभारात राजसत्ता सहसा हस्तक्षेप करीत नसत. त्यामुळे पंचायतींना स्वायत्तता लाभली.

### ४) कृषी हा मुख्य व्यवसाय

ग्रामीण जनतेचा मुख्य व्यवसाय शेती आहे. बहुसंख्य लोक प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे या व्यवसायावरच अवलंबून असल्यामुळे ग्रामीण अर्थोत्पादनाचा केंद्रबिंदू शेती आहे. बहुसंख्य लोक शेती व शेतीशी निगडीत पशुपालन, कुक्कुटपालन यासारख्या व्यवसायात गुंतलेले आहेत. साधारणतः उच्च जातीच्या समुहाकडे शेतजमिनीची मालकी असते. शेती आधारीत आर्थिक व्यवहार असतात सामाजिक दर्जा, जीवनमानाची पातळी व सांस्कृतिक जीवन शेतीवर अवलंबून आहे. म्हणजेच शेती ही ग्रामीण समाजाची जीवनपद्धती आहे. गावातील स्तरीकरण शेतीवरील मालकीच्या आधारावर होते. व्यवसायाला मदत करणारे इतर उपव्यवसायही गावामध्ये केले जातात. शेतीचे कार्य परंपरागत स्वरुपात पांरपारिक साधनांद्वारे केले जाते. वैज्ञानिक ज्ञानाच्या अभावामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जात नाही.



**५) लहान आकार :**

भौगोलिक क्षेत्राच्या आधारावर ग्रामाचा आकार लहान असलेला दिसून येतो. ग्रामीण समाज प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रुपाने पूर्णतः निसर्गावर अवलंबून असून त्याचा मुख्य व्यवसाय कृषी व पशुपालन असतो. शेती व्यवसायामुळे ग्रामीण समुदाय आकाराने लहान असतो ज्या ठिकाणी गाव वसलेले आहे तो आकार लहान असून त्याच्या आजुबाजूला विस्तीर्ण अशी कृषी जमीन आहे. हा समाज वाड्या व वस्त्यामध्ये विभागलेला आहे. रोजगाराच्या मर्यादीत संधीमुळे ग्रामीण जनता रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात शहरीभागात स्थलांतर करते. त्यामुळे ग्रामीण समाज आकाराने लहान असलेला दिसून येतो.

**६) निसर्गाचा प्रभाव :**

शेती व्यवसायामुळे ग्रामीण समाजाचा भौतिक पर्यावरणाशी जवळ संबंध असतो. ग्रामीण समाज मोठ्या शहरांपासून अलिप्त वसलेले असतात. आपल्या गरजा भागविण्यासाठी उदा. जनावरे चारणे, पिण्याचे पाणी, लाकूडफाटा इ.लोक निसर्गावरच अवलंबून असतात. सुपीक जमीन, नद्या जंगलसंपत्ती यामुळे स्वच्छ हवा व पाणी व प्रदुषणाचा पर्यावरणाशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करतो. मॅकआयव्हर म्हणतात, त्याप्रमाणे निसर्गाकडे दैवत्व या दृष्टीकोनातून पाहिले जाते.

**७) सामाजिक स्तरीकरण**

सामाजिक स्तरीकरण हे जाती व वर्ग व्यवस्थेवर आधारीत आहे. ग्रामीण समाजातील सामाजिक स्तरीकरण हे वर्गव्यवस्थेपेक्षा जाती व्यवस्थेवर आधारीत असलेले दिसून येते. जाती व्यवस्थेचे प्राबल्य असल्यामुळे शेती व्यवहार परंपरेप्रमाणे होतात. गावातील वस्तीस्थाने देखील जातीवरच आधारलेली असतात. व्यक्तीचे जीवन जातीनेच नियंत्रित झालेले असते. जाती नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास जाती पंचायतीकडून दंड दिला जातो.

**८) सामाजिक गतिशीलतेचा अभाव**

जातीधिष्टीत व्यवसाय करण्याचे बंधन असल्याने व्यावसायिक गतिशिलतेवर खूपच मर्यादा आहेत. ग्रामीण जीवन बंधिस्त आढळून येते. कुटुंबाचा व्यवसाय पिढ्यानपिढ्या सुरु असतो. व्यावसायिक गतिशिलतेचा अभाव असल्यामुळे एकाच पदाला चिकटून राहण्याची ग्रामीण समाजामध्ये सवय दिसून येते. आपला व्यवसाय किंवा नोकरी सोडण्यास ग्रामीण समाज सहसा तयार होत नाही. दळणवळणाच्या प्रगत साधनांच्या अभावामुळे भौगोलिक गतीशीलतेलाही पुरेसा वाव मिळत नसे. त्यामुळे ग्रामीण जीवनात एक प्रकारची स्थितीशीलता निर्माण झालेली दिसून

येते. जन्मापासून मृत्युपर्यंत एकच जीवनपद्धती आणि एकाच समुहात वास्तव्य अशी स्थिती होती. त्यामुळे ग्रामीण जीवनात साचेबंदपणा आलेला दिसून येतो.

### ९) संयुक्त कुटुंब पद्धती

संयुक्त कुटुंबपद्धती हे भारतीय ग्रामीण समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भारतीय ग्रामीण समाज जीवनावर या कुटुंबपद्धतीचा मोठा प्रभाव आहे. ग्रामीण समाज रचनेचे ते एक महत्त्वपूर्ण व प्रभावशाली अंग आहे. ग्रामीण संयुक्त कुटुंब पद्धती शेती व्यवसायाशी सुसंगत ठरते. शेतीला अधिक मनुष्य श्रमाची गरज असते. म्हणून ग्रामीण कुटुंबात दोन तीन पिढ्यांचे सदस्य एकत्र राहतात. कुटुंबातील वरिष्ठ व्यक्ती ही कुटुंबाचा प्रमुख असून त्याच्या द्वारे कुटुंबाचा कारभार चालविला जातो. कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या अभिवृत्ती, विश्वास, आकांक्षा आणि मुल्ये समान पातळीचे असतात. व्यक्तीच्या चांगल्या वाईट वर्तनाची जबाबदारी कुटुंबावरच टाकली जाई. थोडक्यात व्यक्ती अनेक दृष्टीने कुटुंबावरच अवलंबून असे. अशा प्रकारच्या अनेक संयुक्त कुटुंबाचा समुह म्हणजे खेडे होय. आधुनिक काळात कुटुंबाचे विघटन होत असलेले दिसते.

### १०) जाती प्रथा

ग्रामीण समाजाच्या संरचनेचे कार्य जाती व्यवस्थेद्वारे नियंत्रित होत असलेले दिसून येते. ग्रामाअंतर्गत विभिन्न जातीची उच्च व कनिष्ठ स्तरांआधारे विभागणी होते. ग्रामीण समाजात आंतरजातीय करणे अनिवार्य आहे. खानपान, रितीरिवाज, व्यवसाय इ. निर्धारण जातीद्वारेच होते. जाती नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास जाती पंचायतीकडून दंड दिला जात असे. सामाजिक नियंत्रणासाठी जात पंचायतीची भूमिका महत्त्वपूर्ण असलेली दिसून येते.

### ११)साधे राहणीमान

ग्रामीण समाजातील प्रत्येक व्यक्तीवर जात पंचायतीचा फार मोठा प्रभाव दिसून येतो. प्रत्येक व्यक्ती जातपंचायतीच्या आदेशाचे पालन करते. आजच्या भौतिक युगात देखील ग्रामीण समाजात साधी राहणी व उच्च विचारसरणी हे आदर्श मानले जातात. नैतिकतेला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले जाते. शेतीत रात्रंदिवस काबाडकष्ट करुन देखील त्यातून मिळणारे उत्पन्न हे मोजके व उदरनिर्वाह भागविण्यापुरतेच असते त्यामुळे त्यांच्या जीवनामध्ये श्रीमंती डामडौल नसतो. गरजा मर्यादीत असल्यामुळे जीवनमान साधे व शांततापुर्ण असते. परस्परांविषयी आदर व सहानुभूती असते.

### १२)स्त्रियांचा निम्न दर्जा

पितृसत्ताक संयुक्त कुटुंबाच्या प्रभावामुळे सर्व अधिकार पुरुषांच्या हातात केंद्रीत असतात. स्त्रियांना अनेक अधिकारांपासून वंचित ठेवलेले दिसून येते. तिचे कार्यक्षेत्र 'चुल आणि मुल' यापुरतेच मर्यादीत असलेले दिसते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते, बालविवाह केला जात असे विधवेला पुर्नविवाह करण्यास बंधने स्त्रियांवर लादलेली दिसून येतात या सर्व परिस्थितीमुळे स्त्रियांना ग्रामीण भागात अत्यंत निम्न किंवा दुय्यम स्थान व दर्जा प्राप्त झाल्याचे दिसून येते.

### १३)लोकमताचा प्रभाव

ग्रामीण समुदाय आकाराने लहान व कमी लोकसंख्येचा असल्याने प्रत्येक नागरिक प्रत्येकाला नावाने ओळखतात. त्यांच्यामध्ये घनिष्ठ संबंध प्रस्थापित झालेले असतात. व्यक्तीच्या चांगल्या वाईट वर्तनाची दखल सर्वांकडून घेतली जाते. त्यामुळे व्यक्तीला स्वैरपणे वागता येत नाही. त्यामुळे व्यक्तीचे जीवन पुर्णपणे कुटुंब, जातीसमुह व गाव याच्यावरच अवलंबून असल्याने व्यक्ती लोकमताच्या विरुद्ध जाऊन वागू शकत नाही. तसे वागणाऱ्यास लोकनिंदा, वाळीत टाकणे, संपर्क तोडणे, यासारख्या शिक्षाना तोंड द्यावे लागते. समान व्यवसाय, समान श्रद्धा आणि मूल्ये, समान आचार विचार यामुळे ग्रामीण लोकमतही बहुतांशी समान असते. कोणत्याही घटनेबद्दल लोकभावना सारखीच असते. त्यामुळे लोकांच्या मनावर या लोकमताचा प्रभाव दिसून येतो.

### १४)विशेषीकरणाचा अभाव

ग्रामीण विभागात कृषी हा मुख्य व्यवसाय आहे. शेतीच्या नांगरणीपासून ते पिकाच्या कापणीपर्यंत सर्व कामे शेतकरी पार पाडतो. सर्व कामाची माहिती त्याच्याकडे असते. कोणत्याही कामाचे विशेषीकरण झालेले नसते त्यामुळे विशेषीकरणाचा अभाव हेच ग्रामीण जीवनाचे एक वैशिष्ट्य ठरते.

### १५)शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणा

भारतीय समाजात काही दशकांपूर्वी शिक्षण ही विशिष्ट जातीची मक्तेदारी होती. स्त्रियांना, शुद्रांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यातुन निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा यांसारख्या समस्या ग्रामीण भागात निर्माण झाल्या. शिक्षणाच्या अभावामुळे नवे ज्ञान, नवे विचार, नवी मुल्ये व कल्पना यांचा ग्रामीण जनतेकडून स्वीकार केला जात नाही. शेती हा ग्रामीण लोकांचा मुख्य व्यवसाय असला तरी किफायतशीर नाही. आर्थिक मागासलेपणामुळे शेती मागासलेली आहे. इतर गरजांसाठी कर्जाशिवाय पर्याय राहत नाही. साधनांचा तुटवडा, भांडवलाचा अभाव, अज्ञान, दैववादीवृत्ती इ. मुळे शेतीमध्ये अनेक अडचणी निर्माण होतात.

### १६)राजकीय स्वायत्तता

ग्रामीण समुदाय राजकीयरित्या सार्वभौम नसला तरी स्वायत्तता भोगणारा होता. एखाद्या राजकर्त्यांच्या अंमलाखाली एखादे गांव येत असले तरी प्रत्यक्षात अंतर्गत कारभारात त्याचा हस्तक्षेप नसे. ग्रामपंचायत खेड्यांचे संरक्षण, न्यायनिवाडा, शासन, राजाज्ञेचे पालन, कर गोळा करणे या नियमित कामांव्यतिरिक्त दुष्काळाच्यावेळी सार्वजनिक कर्ज उभारणे, नापीक जमीन मशागतीला योग्य करणे, तलाव बांधणे इ. लोकोपयोगी कामे करीत असत.

### भारतीय ग्रामीण समाजातील परिवर्तन


जगातील कुठलाही समाज नेहमी स्थिर असत नाही. त्यात सतत परिवर्तन हे होतच असते. भारतीय समाजसुद्धा याला अपवाद नाही. प्राचीन काळापासून समाजात परिवर्तन होत राहील आहे. परिवर्तन ही सतत चालत राहणारी प्रक्रिया आहे. प्रामुख्याने ब्रिटिश राजवटीत भारतात सामाजिक परिवर्तनाला चालना मिळाली ब्रिटिशांनी भारतात उद्योगधंदे सुरु केले. त्यातून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा उदय झाला. औद्योगिकरणातून नागरीकरण वाढू लागले. दळणवळणांची साधने वाढली. शिक्षणप्रसाराला चालना देण्यात आली. शिक्षणाच्या प्रक्रियेत

भारतीय समाज असल्यामुळे ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व मुल्ये इ. ओळख झाली. यातून समाज प्रभावित होऊन समाजातील अनिष्ट गोष्टींचे उच्चाटन करण्यासाठी धार्मिक व सामाजिक क्षेत्रात चळवळी सुरु झाल्या. यातून सामाजिक परिवर्तनाला गती मिळाली.

सामाजिक परिवर्तनासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरु झाले. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनाचा स्वीकार केला गेला. पंचवार्षिक योजना, समाजविकास योजना, पंचायतराज तसेच कायद्याचे राज्य सुरु झाले. शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण, वाहतुक, दळणवळण, शेती, उद्योग इ. विकासासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न झाले. त्यातून समाजात आमुलाग्र बदल घडून येण्यास प्रारंभ झाला. मात्र समाज परिवर्तनाची ही गती सर्वत्र सारखी राहीली नाही. परंतु ग्रामीण समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरु झाली. समाजामध्ये होणारे बदल पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १)कृषी व्यवसायात बदल

शेतीचा विकास म्हणजे देशाचा विकास हे ओळखून पंचवार्षिक योजनांमधून शेती विकासासाठी नियोजन करण्यात आले. शेतीला कर्जपुरवठा, अनुदाने कृत्रिम पाणीपुरवठा, आधुनिक उत्पादन तंत्र, शेतमाल विक्री व्यवस्था इ. सोयीसुविधा पुरविल्या. त्याचबरोबर शेतकरी रासायनिक खते, अवजारे, सुधारीत बी-बियाणे, किटकनाशके वापरु लागला. त्यातून हरितक्रांती घडून आली. जमीन सुधारणा कार्यक्रमांतर्गत जमीनदारीचे निर्मुलन, कुळांना संरक्षण कमाल जमीन धारण कायदा, भूमीहीनांना जमीन इ. कृषी व्यवसायात फार मोठे बदल घडून आले.



### २)बलूतापद्धतीचे उच्चाटन

बलूतेदारी पद्धतीमध्ये जातीचाच व्यवसाय केला जात असे. तसेच जातीचा व्यवसाय करण्याची सक्ती होती. मात्र औद्योगिकरण, नागरीकरण, समतेचे तत्त्व, व्यवसाय स्वातंत्र्य, कनिष्ठ जातीत शिक्षणाचा झालेला प्रसार त्यातून निर्माण झालेली सामाजिक जागृती त्यातून बलूता पद्धतीचे उच्चाटन झाले.

### ३)औद्योगिक विकास

शेती व्यवसायाबरोबरच ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारण्यास शासनाने उत्तेजन व सवलती दिल्याने ग्रामीण भागात औद्योगिक विकासास चालना मिळाली. शेती व्यवसायाशिवाय

साखर उद्योग, सूत गिरण्या इ. मुळे रोजगाराच्या संधीत वाढ झाली. जमीनीचे तुकडीकरण, शेतमजुरांच्या संख्येत वाढ तसेच श्रीमंत व गरीब वर्ग निर्माण झाले.

### ४)कुटुंबसंस्थेतील बदल

भारतीय ग्रामीण समाजात प्रचलित असलेल्या संयुक्त कुटुंबपद्धतीचे विघटन होऊन विभक्त कुटुंबपद्धती उदयास आली. कुटुंब नियोजनाच्या प्रसारामुळे लहान आकाराचे कुटुंब ग्रामीण भागात रुढ होत आहे. व्यक्तीवादाच्या वाढत्या प्रभावामुळे कुटुंब हितापेक्षा स्वहिताला प्राधान्य देण्यात आले. कुटुंबाची शिस्त, प्रेम, जिव्हाळा, आत्मियता इ. मुल्यांचा ऱ्हास झाला.

### ५)जातीसंस्थेतील बदल

ग्रामीण समाजावर असलेले जातीसंस्थेचे वर्चस्व कमी झाले. जातीचे नियम शिथिल झाले. व्यक्तीचा दर्जा, प्रतिष्ठा जन्माऐवजी कर्तृत्त्वावर ठरु लागली. अस्पृश्य जातीवरील सामाजिक – धार्मिक – राजकीय बंधने कायद्याने नष्ट करण्यात आली. जातीपंचायतीचे उच्चाटन झाले. मात्र शंभर टक्के हे प्रमाण राहीले नाही. पुर्वी सलोख्याने राहणारे जाती समुह आज परस्परांत तीव्र स्पर्धा करीत आहेत. राजकारणात जातीला निर्णायक महत्त्व असल्याने जातीय ताणतणाव व संघर्ष वाढत आहे.

### ६)स्त्रियांच्या दर्जात बदल

परंपरागत ग्रामीण समाजात स्त्रियांचा दर्जा निम्न स्वरुपाचा होता. स्त्रीचा दर्जा उंचावला नसला तरी अनिष्ठ रुढी परंपरांच्या बंधनातून काही प्रमाणात मुक्तता झाली. शिक्षण, नोकरी, विवाह या गोष्टी हळूहळू स्विकारल्या जात आहे. मात्र कन्येपेक्षा पुत्रप्राप्ती विशेष मानली जाते. नोकरीसाठी बाहेर पडलेल्या स्त्रियांच्या नवीन समस्या निर्माण झाल्या आहे. स्त्रीभ्रूण हत्या, बलात्कार, छेडछाड, मानसिक त्रास इ. समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.

### ७)राजकीय क्षेत्रातील बदल

भारतीय ग्रामीण राजकारणात जातीचे वर्चस्व असलेले दिसून येते. या ग्रामीण राजकारणावर उच्च जातीतील राजकारण्यांनी सत्तास्थाने काबीज केली होती. मात्र ७३व्या घटना दुरुस्तीमुळे महिला, अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय समाज यांना पंचायत राजमध्ये आरक्षण प्राप्त झाले. यातून ग्रामीण लोकांच्या राजकीय सहभागाला चालना मिळाली. राजकीय जागृती वाढली, राजकारणाचे, लोकशाहीचे धडे मिळू लागले. नवीन राजकीय नेतृत्त्व निर्माण झाले. पण याचबरोबर सत्ताप्राप्तीसाठी ग्रामीण भागातील जाती समुह परस्परांशी जिवघेणी स्पर्धा करु लागले आहेत. दुर्बल घटकांच्या प्रतिनिधींचा अपेक्षित प्रभाव पडत नाही. त्यातून काही नेतृत्त्व बाहुले बनून राहिले आहे. राजकारणातून हेवेदावे, भांडणे, मारामाऱ्या तसेच राजकीय हत्यादेखील झालेल्या दिसून येऊन नवीन सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

### ८)इतर क्षेत्रातील परिवर्तन

पारंपारिक ग्रामीण समाजात शिक्षणाचा हक्क केवळ उच्च जातींनाच होता. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण प्रसाराला चालना मिळाली. त्यामुळे सर्व समाज शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये आला. मुलांप्रमाणे मुली देखील शिकू लागल्या सर्व शिक्षा अभियान, प्रौढ साक्षरता यातून शिक्षणाचे प्रमाण

वाढले यातून अनिष्ट प्रथांचे उच्चाटन झाले. उदा. अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, दैववाद, अस्पृश्यता, जातीभेद यांचे उच्चाटन होण्यास मदत झाली.

ग्रामीण समाजात धर्माचा प्रभाव होता. अंधश्रद्धा, कर्मकांड, जादूटोणा, मंत्रतंत्र, पापपुण्य, स्वर्गनरक इ. वरील विश्वास कमी होत गेला तर पाश्चिमात्य ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, उदारतावाद, धर्मनिरपेक्षता व लोकशाहीची मुल्ये रुजू लागली.

पारंपारिक ग्रामीण समाजात कुटुंब हेच मनोरंजनाचे साधन होते. त्याचप्रमाणे भजन, किर्तन, प्रवचन, यात्रा, लोककला ही मनोरंजनाची साधने होती. त्यांची जागा रेडिओ, टि.व्ही., चित्रपट, मोबाईल यांनी घेतलेली दिसून येते. अशा प्रकारे पारंपारिक ग्रामीण समाजात परिवर्तन घडून येत आहे.

## ३.७ सारांश

भारतीय ग्रामीण समाज या पाठामध्ये ग्रामीण समाजाची संकल्पना, अर्थ, स्वरुप, उत्पत्ती, ग्रामीण समाज, वैशिष्ट्ये व ग्रामीण समाजातील परिवर्तन या गोष्टीवर लक्ष वेधले आहे. ह्या समाजाची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्यांचा आधार घेतला आहे. ग्रामीण समाजाची रचना, त्याची उत्पत्ती कशी झाली त्याची कारणे, या विषयीचे विवेचन करण्यात आले आहे. रामायण, महाभारत, ऋग्वेद यासारख्या महत्त्वाच्या धर्मग्रंथात ग्रामीण समाजाच्या नोंदी आढळतात. समाजाची उत्पत्ती भौगोलिक घटकावर अवलंबून असलेली दिसून येते. ग्रामीण समाजाच्या स्वरुपामध्ये सामाजिक संघटना, ग्रामीण रचना व आर्थिक संघटनांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण समाजाच्या स्वतःच्या वैशिष्ट्यांमुळे हा समाज इतर समाजापासून भिन्न दिसतो. शेती हा मुख्य व्यवसाय त्यावर आधारलेली संयुक्त कुटुंबपद्धती, रुढी पंरपरा, जातीसंस्था हे घटक महत्त्वपूर्ण आहेत. पण आधुनिकीकरण, औद्योगिकरणामुळे या समुदायात परिवर्तन झालेले दिसून येते. त्यामुळे जीवनशैली, आचार, विचार व्यवसाय, शिक्षण इ. बदल घडून आला आहे.

## ३.८ स्वाध्याय

१) ग्रामीण समाजाची संकल्पना स्पष्ट करुन ग्रामीण समाजाच्या उत्पत्तीचे घटक सांगा.
२) ग्रामीण समाज म्हणजे काय ? ते सांगून ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये सांगा.
३) ग्रामीण समाजाचा अर्थ सांगून त्याच्या स्वरुपासह वैशिष्ट्ये सांगा.
४) ग्रामीण समाजाचे स्वरुप स्पष्ट करा.
५) ग्रामीण समाजाच्या उत्पत्तीच्या घटकांची चर्चा करा.
६) ग्रामीण समाजात होत असलेले परिवर्तन सांगा.

munotes.in

## ३.९ संदर्भसूची


१) प्रा. चंद्रकांत खंडागळे – भारतीय समाज - सौ. मायादेवी खंडागळे, सांगली - २००६

२) प्रा. माणिक माने – समाजशास्त्रीय संकल्पना, विद्या प्रकाशन, नागपूर - १९९६

३) प्रा. ए. वाय. कोंडेकर – समाजशास्त्र – फडके पब्लिकेशन, कोल्हापूर - २००७

४) डॉ. दिलीप खैरनार – भारतीय ग्रामीण समाजशास्त्र विद्या प्रकाशन, औरंगाबाद – २०१०

५) डॉ. भा. कि. खडसे – भारतीय समाज - हिमालया पब्लिकेशन, मुंबई – १९९५

६) त्रि. ना. अत्रे – गावगाडा, ह. वी. मोटे प्रकाशन, मुंबई

७) डॉ. तानाजीराव निकम – ग्रामीण समाजशास्त्र प्रशासन – रा. द. पवार, सातारा – २००१

८) डॉ. भा. बी. खडसे – समाजशास्त्र परिचय - हिमालय पब्लिकेशन, मुंबई – २००६

९) रा. ज. लोटे – भारतीय समाज आणि समस्या, पिंपळपुरे प्रकाशन, नागपूर – २००५

१०) प्रा. डॉ. गु. द. नाडगोंडे – भारतीय समाज आणि समस्या, पिंपळपुरे प्रकाशन, नागपूर – २००५

१२) डॉ. दिलीप शं. पाटील, डॉ. स्मिता भोईर, प्रा. प्रविण सनये, प्रा. रमेश म्हात्रे, ग्रामीण विकासाची तोंडओळख, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, २०१०


❖❖❖❖

munotes.in

# घटक -४

## ग्रामीण सामाजिक संस्था - १

- डॉ. स्मिता भोईर

**पाठाची रचना :**

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ ग्रामीण सामाजिक संस्था
४.३ कुटुंब संस्था
४.४ सारांश
४.५ स्वाध्याय

## ४.० उद्दिष्ट्ये :-

१) ग्रामीण सामाजिक संस्थेचा अर्थ आणि महत्त्व अभ्यासता येईल.
२) ग्रामीण कुटुंब संस्थेचा अभ्यास करता येईल.
३) कुटुंब संस्थेतील परिवर्तनाचे स्वरुप लक्षात येईल.

## ४.१ प्रस्तावना :-

समाजातील व्यक्तीच्या समाजातील विविध सामाजिक गटांद्वारे मूल्यांचा किंवा प्रमाणकांचा संबंध येतो. सामाजिक गट म्हणजे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या विशिष्ट कार्याकरिता एकत्र येऊन अगर एकमेकांशी संपर्क साधून एकमेकांच्या सहकार्याने ते कार्य पार पाडणाऱ्या व्यक्तींचा समूह होय. सामाजिक जीवनास आवश्यक असलेल्या मानवी व्यवहारांची विभागणी अशा विविध गटांमधून झालेली असते. मानवाच्या दैनंदिन जीवनातील विविध गरजांची पूर्तता करण्यासाठी लोक-रूढी, लोकनिती कायदे यासारखे सामाजिक नियमने अस्तित्वात आली. त्यामुळे समाजाच्या वर्तनाला विशिष्ट वळण लागते. सामाजिक नियमनामध्ये परस्परावलंबन असल्यामुळे विशिष्ट गरजेशी संबंधित नियमने एकत्र करता येतात. विशिष्ट कार्याला पूरक अशा नियमनांच्या संचाला संस्था असे म्हणतात. संस्थाही संज्ञा मानदंड प्रतिमान म्हणून विशिष्ट गटाची निदर्शक असते. सामाजिक संस्था ह्या प्रत्येक समाजामध्ये पहायला मिळतात. समाजातील प्रत्येक सदस्य हा सामाजिक संस्थाचा सदस्य बनतो.

## ४.२ ग्रामीण सामाजिक संस्था

### ४.२.१ सामाजिक संस्थेचा अर्थ :-

मानवी समाजास आवश्यक असणाऱ्या व्यवहारांची आर्थिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक इत्यादी वेगवेगळ्या क्षेत्रात विभागणी होते. समाजामध्ये परंपरेने विविध क्षेत्रातील कार्याकरिता विविध गट निर्माण होतात. त्यामुळे परंपरेने प्रत्येक गटाची, सदस्यांची काम करण्याची पद्धत निश्चित होते. प्रमाणके म्हणजे गट निर्माण होण्याची किंवा त्या गटाने आपली जबाबदारी पार पाडण्याची पद्धत होय. जेव्हा कोणत्याही गटांच्या प्रमाणकांना उद्देशून त्या गटांविषयी बोलले जाते. त्याला 'सामाजिक संस्था' म्हणून ओळखले जाते.

१) समाजशास्त्रात सामाजिक संस्था म्हणजे "व्यक्ती व समाजाच्या गरजेशी संबंधित रूढी, परंपरा, चालीरीती किंवा रितीरिवाज यांचा समुच्चय होय."

२) किंग्लेज डेव्हिस यांच्या मते "एक किंवा अधिक कार्याच्या भोवती रचलेल्या व एकजीव झालेल्या लोक रूढी, लोकनिती व कायदा यांचा संच म्हणजे सामाजिक संस्था होय."

३) बोगार्डस यांच्या मते "मानवाच्या गरजा भागविण्यासाठी व्यवस्थितपणे तयार केलेल्या वर्तन प्रकारांची पद्धती म्हणजे सामाजिक संस्था होय."

सामाजिक कार्याचे स्वरुप, कार्य सर्वत्र समान आढळत नाही. प्रजोत्पादन, बालसंगोपन, उत्पादन, शिक्षण, सुव्यवस्था व संरक्षण अशा प्रत्येक कार्यांसाठी निर्माण झालेल्या प्रमाणके व मुल्यांना 'सामाजिक वारसा' म्हणून जतन केले जाते. त्यामुळे समाजात स्त्री-पुरुषांनी एकमेकांशी वागण्याचा निश्चित आकृतीबंध तयार होतो. उदा. प्रजोत्पादन व बालसंवर्धन या दृष्टीने स्त्री-पुरुषांचा एकमेकांशी वागण्याचा आकृतीबंध म्हणजे 'राज्यसंस्था' होय. या आकृतीबंधात काळानुसार परिवर्तन होत जातो. त्यामुळे समाज व्यवस्थेतील बदलांचे स्वरुप समजून घेण्यासाठी सामाजिक संस्थांचा अभ्यास आवश्यक ठरतो. व्यक्ती व समाजाच्या अस्तित्व विषयक गरजांची पूर्ती करणे हा उद्देश सामाजिक संस्थांच्या निर्मितीमागे असतो. कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, धर्मसंस्था यांची मिळून समाजाची संरचना तयार होते. त्यामुळे त्यांना 'समाजाच्या पायाभूत संस्था' असे म्हणतात. त्यांच्या द्वारे समाजसत्ता, बालसंवर्धन, समुहातील सदस्यांवर नियंत्रण ठेवणे शक्य होते. किंबहुना या गोष्टींच्या पूर्ततेसाठी कुटुंब, अर्थ, धर्म, राज्य व शिक्षण संस्था समाजामध्ये आढळतात.

भारतीय समाजामध्ये जातीसंस्था ही देखील पायाभूत संस्था आहे. हिंदू समाजव्यवस्थेचा जातीसंस्था हा पाया आहे. संयुक्त कुटुंब पद्धत व जातीसंस्था या दोन संस्था महत्त्वपूर्ण आहेत. त्यांच्या अभ्यासाशिवाय भारतीय ग्रामीण समाजाचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न सामाजिक संस्थेचा अर्थ स्पष्ट करा.

___

___

___

___

___

### ४.२.२ सामाजिक संस्थेची वैशिष्ट्ये :-

सामाजिक संस्थांची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) सामाजिक प्रथांचे एकत्रिकरण म्हणजे संस्था होय. संस्थेला सांस्कृतिक रचनेतील कार्यात्मक घटक म्हटले जाते. उदा. विवाह संस्थेद्वारे कौटुंबिक स्थैर्य व जैविक कार्यपूर्ती होते.

२) संस्था समाजात स्थिर असतात. उदा. धर्म

३) प्रत्येक संस्थेची गरजांची पूर्ती करणारी एक किंवा अनेक उद्दीष्ट्ये असतात. उदा. कुटुंबसंस्था – प्रजोत्पादन, बालसंवर्धन.

४) सामाजिक संस्थांना सुनिश्चित प्रतिके असतात. उदा. कुटुंबाचे प्रतिक घर.

५) प्रत्येक संस्थेच्या लिखित व अलिखित परंपरा असतात. त्याद्वारे सदस्यांची वर्तणूक व्यक्त होते.

अशा तऱ्हेने संस्थेची वैशिष्ट्ये संस्थेचे प्रकार व स्वरुप स्पष्ट करतात. मानवाच्या गरजपूर्तीसाठी प्रस्थापित केलेल्या सुसंघटीत वर्तन प्रकाराची बांधणी संस्थेमुळे होते. संस्थाचा विकास मानवाने स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी केलेला विचार प्रथा, रूढी यातून झाला आहे. संस्थाच्या विकासाला पुढे सामाजिक तत्वज्ञानाची जोड देण्यात आली आहे. त्यामुळे मानवाच्या सामाजिक जीवनाच्या प्रत्येक घटकांशी संबंधित अशा संस्था समाजामध्ये उदयास आल्या आहेत.

### ४.२.३ सामाजिक संस्थेचे प्रकार :-

समाजातील निरनिराळ्या गरजपूर्तीसाठी संस्था उदयास आल्या आहेत. त्याचे प्रकार पुढीलप्रमाणे :-

१) संस्थेच्या निर्मितीवरून दोन प्रकार आहेत.

**अ) उस्फुर्त :** कुटुंब, विवाह, धर्म या संस्थाची निर्मिती सामाजिक रूढीतून झाली आहे.

**ब) हेतूपूर्वक :** अर्थसंस्था, राज्यसंस्था व शिक्षणसंस्था या हेतूपूर्वक प्रयत्नांनी अस्तित्वात आल्या आहेत.

२) संस्थेच्या कार्याच्या स्वरूपावरून दोन प्रकार आहेत.

**अ) मुलभूत संस्था :** कुटुंब, विवाह, धर्म, राज्य, शिक्षण इत्यादी मुलभूत संस्थेवर समाजाची सुस्थिती अवलंबून असते.

**ब) दुय्यम संस्था :** दुय्यम संस्थांमुळे समाजाची सुव्यवस्था राखली जातेच असे नाही. उदा. मनोरंजन संस्था.

**क) कार्यात्मक संस्था :** कार्यात्मक संस्थांद्वारा विविध गरजपूर्तीची प्रतिमाने कार्यान्वित केली जातात. उदा. कुटुंब किंवा विवाहसंस्थेद्वारे व्यक्तीच्या गरजांची पूर्ती होते.

**ड) नियमनात्मक संस्था :** धर्म व न्याय संस्थेद्वारे व्यक्तींच्या वर्तणुकीचे नियमन होते.

**३) संस्थेच्या व्याप्तीवरून :** संस्थेच्या व्याप्तीवरून जागतिक संस्था व मर्यादित संस्था असे दोन प्रकार आहेत. धर्म ही जागतिक संस्था असून जातीसंस्था भारतापुरतीच मर्यादित आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) सामाजिक संस्थेची वैशिष्ट्ये व प्रकार सांगा.

---

---

---

---

---

### ४.२.४ सामाजिक संस्थेची कार्ये :-

प्रत्येक संस्थेच्या स्थापनेमागे काही विशिष्ट उद्देश असतो. त्याशिवाय संस्थेचा विकास होऊ शकत नाही. संस्था ही व्यक्ती व समाजाच्या गरजांची पूर्तता करते. त्यानुसार संस्थेची विविध कार्ये पुढीलप्रमाणे –

**१) मानवी गरजांची पूर्ती :** मानवाच्या गरजांची पूर्तता कोणताही कलह होऊ न देता संस्था करते. संस्थेचे काही नियम असतात त्याचे पालन व्यक्तींकडून होत असते. त्यामुळे सामाजिक प्रगतीस अनुकूल वातावरण तयार होते.

**२) संस्कृतीचे वहन :** मानवी जीवनामध्ये संस्था महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. संस्था एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होते. संस्थेबरोबर संस्कृतीचे देखील हस्तांतरण त्यावेळी पुढील पिढीकडे गेले. संस्कृती हस्तांतरित झाल्यामुळे मागील पिढीकडील ज्ञानाचा, अनुभवाचा वारसा पुढील पिढीकडे संक्रमित होतो व संस्कृती विकसित होत जाते.

**३) सामाजिक नियंत्रण :** सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीकोनातून संस्था महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडते. प्रत्येक संस्थेचे काही नियम असतात. त्या नियमाचे पालन करीत मानव आपली ध्येये व उद्दीष्टये यांची पूर्ती करतो. त्यामुळे सामाजिक संघर्ष होत नाहीत. समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होते.

munotes.in

**४) अनुकूल परिस्थिती निर्माण करणे :** संस्थेमुळे व्यक्तीला आपल्या गरजांची पूर्ती योग्य रितीने करता येते. संस्थेच्या नियमांच्या चौकटीत राहून गरजांची पूर्ती केल्यामुळे संघर्षाची समस्या निर्माण होत नाही. उद्दीष्टचे प्राप्तीसाठी आवश्यक असणारी अनुरूप परिस्थिती निर्माण होऊन व्यक्तीचा व समाजाचा विकास होतो.

**५) मार्गदर्शन :** मानवी समाजाच्या विकासामध्ये संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. संस्था व्यक्तीला गरजांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने सातत्याने मार्गदर्शन करीत असते. त्यामुळे व्यक्तीला निश्चित दिशा मिळते. मार्गदर्शकाची भूमिका संस्था प्रभावीपणे पार पाडत असल्यामुळे वेळेचा अपव्यय होत नाही.

**६) कर्तव्य निश्चिति :** व्यक्तीला समाजामध्ये अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. उदा. कुटुंबातील सदस्य, समाजाचा घटक इत्यादी प्रत्येक भूमिकेमध्ये सदस्याची कर्तव्य कोणती याची निश्चिती संस्थेकडून होते. कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असणारी अनुकूल परिस्थिती संस्था निर्माण करुन देतात. त्यामुळे समाजाची सुसंघटीत रचना अस्तित्वात येते.

वरील प्रकारची महत्त्वपूर्ण कार्ये सामाजिक संस्था करताना दिसतात.

**आपली प्रगती तपासा.**

१) सामाजिक संस्थेची कार्यपद्धती स्पष्ट करा.

## ४.३ कुटुंब संस्था :-

**प्रस्तावना :** भारतीय संस्कृतीला हजारो वर्षांचा वारसा लाभला आहे. प्राचीन कालखंडात खेडे हेच संस्कृती व समाज जीवनाचे केंद्रबिंदु होते. याच कालखंडात भारतावर अनेक आक्रमणे झाली, अनेक स्थित्यंतरे झाली. परंतु खेडी मात्र अभंग राहीली. कारण प्राचीन भारतीय खेड्यांमध्ये व संस्कृतीमध्ये कुटुंबसंस्था महत्त्वपूर्ण होती व आजदेखील आहे. भारतीय समाजाच्या वैशिष्ट्यांमध्ये ग्रामीण समाज, जातीसंस्था व कुटुंबसंस्था महत्त्वपूर्ण आहेत. सर्व सामाजिक संस्थांमध्ये कुटुंबसंस्था ही मुलभूत व प्राथमिक स्वरूपाची सर्वोच्च सामाजिक संस्था आहे. कुटुंबसंस्थेचे स्वरुप सर्वव्यापक आहे. मानव विकासाच्या सर्वच अवस्थांमध्ये कुटुंबसंस्थेचे अस्तित्व दिसून येते. मानव समाजाच्या विकासाची प्रथम अवस्था म्हणजे कुटुंबसंस्था होय. कुटुंबामुळे समाज सातत्याने टिकून राहीले आहे. म्हणून मानवी समाजाचा इतिहास म्हणजे कुटुंबाचा इतिहास असे म्हटले जाते.

सर्व सामाजिक समुहात कुटुंब हा एक मुलभूत व प्राथमिक स्वरुपाचा सामाजिक समुह आहे. इतर कोणत्याही समुहापेक्षा कुटुंब सर्वव्यापक आहे. प्रत्येक समाजात कुटुंबाचे स्वरुप सारखेच नसून जगातील भिन्न भिन्न देशांत निरनिराळ्या प्रकारची कुटुंबे असल्याची आढळून येतात. मानवी समाजात कुटुंबाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे.

### ४.३.१ कुटुंबाची संकल्पना :-

कुटुंबाला इंग्लिशमध्ये Family असे म्हणतात. Family हा शब्द Famalus या लॅटीन शब्दापासून बनला आहे. कुटुंब म्हणजे असा समूह की, ज्यामध्ये माता-पिता व त्यांची मुले यांचा समावेश होतो. काही कुटुंबात माता-पिता व त्यांची अविवाहीत मुले एकत्र राहताना दिसतात. तर काही कुटुंबात अनेक पिढ्यांपर्यंतचे सदस्य एकत्र व एकाच घरात वास्तव्य करताना दिसून येतात.

मानवी समाजात कुटुंबसंस्थेचे महत्त्व आहे. कारण लैंगिक गरजेची पूर्ती आणि प्रजोत्पादन ही दोन महत्त्वाची कार्ये कुटुंबसंस्थेद्वारे पार पाडली जातात. या दोन कार्यांबरोबर संततीच्या संगोपनाची जबाबदारी हे देखील कुटुंबाचे कार्य आहे. कुटुंब हे स्थायी स्वरुपाचे असते. कुटुंबसंस्था हे समाजीकरणाचे उत्तम साधन आहे. अपत्य जन्माला आल्यानंतर त्याचा विकास होत असताना त्याच्यावर मुल्य-संस्कार केले जातात. तो समाजातील उत्तम सदस्य बनावा या दृष्टीने हे संस्कार महत्त्वपूर्ण असतात. कुटुंबसंस्था समाजाचा आधार आहे. कुटुंबामुळे व्यक्ती समाज सुरक्षित असतो.

आधुनिक काळात औद्योगिक क्रांती व त्यामुळे वाढीस लागलेले औद्योगिकरण, व्यवसायाचे बदलते स्वरुप, वैज्ञानिक प्रगती, वैचारिक बदल होऊ लागले आहेत. मात्र आजदेखील ग्रामीण समाज जीवनात कुटुंबसंस्था महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. कुटुंबामध्ये आप्तसंबंधाच्या बंधनाला महत्त्व आहे. किंबहुना आप्तसंबंध हाच कुटुंबाचा एकमेव आधार आहे.

### ४.३.२ कुटुंबाची व्याख्या :-

कुटुंबाच्या संदर्भात विविध समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे :-

**१) मॅकआयव्हर व पेज :** "प्रजोत्पादन व बालसंवर्धन करण्यासाठी पुरेसा लहान व कायम स्वरुपाच्या लैंगिक संबंधावर आधारलेला असा समूह म्हणजे कुटुंब होय."

**२) डॉ. डी. एन. मुजुमदार :** "एकाच घरात राहणाऱ्या, एकमेकांशी रक्तसंबंधित असणाऱ्या स्थान, हित व परस्परांविषयीच्या कर्तव्याची जाणीव याबद्दल जागरूक असणाऱ्या व्यक्तीच्या समुहाला कुटुंब असे म्हणतात."

**३) रॉबर्ट लुई :** "कुटुंब हा विवाहावर आधारलेला सामाजिक समुह आहे. त्या समुहात माता-पिता व त्यांची मुले यांचा समावेश होतो."

**४) किंबाल यंग :** "ज्या समुहात एक किंवा अधिक पुरुष आपल्या एक किंवा अधिक स्त्रिया व आपल्या अगर दत्तक घेतलेल्या मुलांसहित मुले लहान असे तोपर्यंत तरी एकाच घरी राहतात. अशा सामाजिक समुहाला कुटुंब म्हणतात."

**५) थॉमस :** "कुटुंब म्हणजे माता-पिता आणि अपत्यातील संबंधाची व्यवस्था होय."

**६) सुमनेर आणि केलर :** "कुटुंब एक सामाजिक संघटन आहे. त्यात दोन पिढ्यांचा समावेश होतो. आणि त्याचा आधार रक्त संबंध हाच असतो.

**आपली प्रगती तपासा.**

१) कुटुंबाची संकल्पना आणि व्याख्या सांगा.

---

---

---

---

---

### ४.३.३ कुटुंबाचे स्वरूप :-

समाजशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने कुटुंबसंस्थेच्या अभ्यासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समाजाच्या विकासाची पहिली अवस्था म्हणजे कुटुंबनिर्मिती होय. कुटुंबाची उत्पत्ती समुहात प्रथम झाली. कुटुंबाशिवाय समाजाच्या सातत्याची व निरंतरेची कल्पनाच करता येत नाही. समाजाला योग्य असे नवीन सभासद पुरविण्याचे कार्यदेखील समाजाच्या अधिक सुरूवातीपासून ही संस्था करीत आहे. इतकेच नव्हे तर समाजात आवश्यक समाज सदस्यांचे सुदृढ व निकोप व्यक्तिमत्त्व याच समुहात केले जाते.

प्रत्येक समाजात कुटुंबाचे स्वरुप सारखे आढळून येत नाही. जगातील भिन्न भिन्न देशात विविध प्रकारची कुटुंबे आढळून येतात. काही कुटुंबात माता-पिता व त्यांची अविवाहीत मुले एकत्र राहताना दिसतात तर काही कुटुंबामध्ये अनेक पिढ्यांपर्यंतचे सदस्य एकत्र व एकाच घरात वास्तव्य करीत असल्याचे आढळून येते. आज आपल्या समाजात सत्ता ही पिताच्या हातात केंद्रीत झालेली दिसते व वंश हा पिताच्या नावाने चाललेला दिसतो. पण भारतातील काही समाजामध्ये मात्र कुटुंबाची संपूर्ण सत्ता ही मातेची असते व वंश देखील तिच्याच नावाने चालतो. अशा रितीने कुटुंबाचे वर्गीकरण, सदस्यांची संख्या, कुटुंबाची सत्ता व निवासस्थाने यांच्या आधारावर करता येते.

सदस्यसंख्येच्या आधारावर कुटुंबाचे संयुक्त कुटुंब व विभक्त कुटुंब असे दोन प्रकार पडतात. संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये अनेक पिढ्यांपर्यंतचे सदस्य हे एकाच निवासस्थानी वास्तव्य करतात व एकाच सामायिक मालमत्तेवर आपली उपजीविका करतात. विभक्त कुटुंबात माता-पिता व त्यांची मुले एकत्र राहतात. इतर नातेवाईकांपासून हे कुटुंब मुक्त दिसते. तसेच कुटुंबाची सत्ता किंवा अधिकार, निवासस्थान व वंश नामाची व्यवस्था यांच्या आधारावर कुटुंबाचे मातृसत्ताक कुटुंब व पितृसत्ताक कुटुंब असे दोन प्रकार पडतात. त्याचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे -

### कुटुंब संस्थेचे प्रकार :-

कुटुंबसंस्थेमुळे व्यक्तीच्या जीवनाला आकार प्राप्त झाला आहे. भावनिक संबंध, सहकार्य, समाजीकरण यामुळे व्यक्ती कुटुंबाशी व समाजाशी जोडली गेली आहे.

कुटुंबपद्धतीमुळे आर्थिक लाभ देखील होतात. सामाजिक मूल्यांचा आधारभूत घटक म्हणून कुटुंब संस्थेला ओळखले जाते. ग्रामीण जीवन कुटुंबसंस्थेभोवतीच केंद्रीत झालेले दिसून येते. त्यामुळे ग्रामीण समाजात कुटुंबसंस्था महत्त्वपूर्ण मानली जाते.

मानवी समाजातील कुटुंबसंस्थेचे निरीक्षण केले असता या कुटुंबपद्धतीची काही वैशिष्ट्ये त्यांच्या रचनेच्या आधारावर आढळून येतात. त्या आधारे कुटुंबाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल :-

**१) कुटुंबातील सदस्य संख्या :-** कुटुंबातील सभासदांच्या संख्या आधारावर कुटुंबाचे दोन प्रकार आहेत.

अ) संयुक्त कुटुंब

ब) विभक्त कुटुंब

**२) कुटुंबप्रमुखाच्या लिंगभेदाप्रमाणे कुटुंबाप्रमाणे कुटुंबाचे दोन प्रकार आहेत :-**

अ) मातृसत्ताक कुटुंब

ब) पितृसत्ताक कुटुंब

**१) कुटुंबातील सदस्य संख्या** – कुटुंबातील सदस्य संख्येच्या किंवा आकाराच्या आधारावर होणाऱ्या संयुक्त व विभक्त कुटुंबपद्धतीची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे :-

**अ) संयुक्त कुटुंब :** ग्रामीण जनतेच्या शेती या मुख्य व्यवसायामुळे संयुक्त कुटुंब हे ग्रामीण समाजाचे मुख्य वैशिष्ट्य ठरले आहे. शेती व्यवसायासाठी अधिक श्रमाची आवश्यकता असल्यामुळे या गरजपूर्तीकरिता संयुक्त कुटुंबपद्धत अपरिहार्य होती. 'समाज जीवनाला पोषक' असे वर्णन संयुक्त कुटुंबाचे केले आहे.

संयुक्त कुटुंबाचा अर्थ पुढील व्याख्यांच्या आधारे स्पष्ट होईल :-

**१) इरावती कर्वे :** संयुक्त कुटुंब अशा लोकांचा समुह असतो की, जे एकाच छताखाली राहतात, एकाच चुलीवर शिजवलेले अन्न ग्रहण करतात. ज्यांची संपत्ती सामाईक असते. कुटुंबाने आयोजित सामाईक पूजेत भाग घेतात आणि ते परस्परांशी विशिष्ट नाते संबंधाने जुळलेले असतात.

**२) डॉ. एम. एन. श्रीनिवास :** संयुक्त कुटुंबात पुरुष, त्यांची विवाहीत मुले आणि त्यांच्या पत्नी तसेच त्यांची मुले आणि अविवाहीत मुलींचा समोवश होतो.

संयुक्त कुटुंबाचे वंशीय व भ्रातृ असे दोन प्रकार आहेत. वंशीय कुटुंबात आजी-आजोबा, आई-वडील व नातवंडांचा समावेश होतो. तर भ्रात कुटुंबात विवाहीत भाऊ व त्याचे कुटुंबीय यांचा समावेश होतो. या व्यतिरिक्त संयुक्त कुटुंबात विधवा किंवा परित्यक्त्या बहिण किंवा आत्या व तिची मुले यांचा देखील समावेश होत असे.

munotes.in

**संयुक्त कुटुंबाची वैशिष्ट्ये :-**

**१) कर्ता :** संयुक्त कुटुंबातील प्रमुखाचा कर्ता असे म्हणतात. पितृसत्ताक कुटुंबात पिता व मातृसत्ताक कुटुंबात माता कर्त्याची भूमिकी पार पाडते. कुटुंब प्रमुख कुटुंबावर नियंत्रण व नियमन करतो. श्रमविभागणी, सदस्यांच्या हिताचे निर्णय कर्ता घेतो. त्याचा दर्जा उच्च असलेला दिसून येतो.

**२) सामाईक भोजन :** संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये सर्वांचे जेवण एकाच स्वयंपाक घरात होते. त्यामुळे एस. सी. दुबे व इरावती कर्वे यांनी सामाईक भोजन हे वैशिष्ट्ये मान्य केले आहे. घरात वेगवेगळ्या चुलीवर स्वयंपाक न होता एकाच चुलीवर स्वयंपाक केला जातो व भोजन ग्रहण केले जाते.

**३) सामाईक निवास स्थान :** संयुक्त कुटुंबातील सदस्यांचे निवासस्थान एकच असते. त्यामुळे सामाईक भोजन, सामाईक संपत्ती दिसून येते. एकत्र निवासस्थान असल्यामुळे संघशक्ती व भावनिक जवळीक असते.

**४) सामाईक संपत्ती :** संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये वडिलोपार्जित स्थावर व जंगम संपत्तीवर सर्वांचीच मालकी असते. संपत्तीचा उपभोग घेण्याचा अधिकार सर्व सदस्यांना असतो. प्रत्येक व्यक्ती आपल्या व्यवसायातून संपत्तीमध्ये भर टाकतो. कुटुंबप्रमुखाकडे संपत्तीचे विशेषाधिकार असतात. संपत्तीचा विश्वस्त म्हणून एक प्रकारे कुटुंबाकडेच पाहिले जाते. कुटुंबातील सदस्यांच्या गरजांची पूर्तता करणे व सदस्यांना आर्थिक सुरक्षितता देणे हे या कुटुंबपद्धतीचे वैशिष्ट्ये आहे.

**५) सामाईक पूजा अर्चा :** धार्मिक पूजेमुळे एकात्मतेचे बंध निर्माण होते. संयुक्त कुटुंबात दैनंदिन पूजेबरोबरच उत्सव, सण-समारंभ या प्रसंगी पूजा-अर्चा होते. एक कुलदैवत असते. कुलदेवतेची भक्तीभावाने आराधना केली जाते. पूजेतून भावनात्मक ऐक्य व उत्तरदायित्वाची जोपासना केली जाते.

**६) मोठा आकार :** 'संयुक्त कुटुंबात तीन पिढ्यांपेक्षा जास्त पिढ्यांतील सदस्यांचा समावेश असतो' असा डॉ. देसाई उल्लेख करतात. तर इरावती कर्वेनी संयुक्त कुटुंबाला 'नातेवाईक समुह' असे म्हटले आहे. या कुटुंबातील सदस्य संख्या जास्त असल्यामुळे आकारमानाने मोठे असे हे कुटुंब आहे.

ग्रामीण समाजामध्ये विशेषत्वाने आढळणारी संयुक्त कुटुंबपद्धती अत्यंत फायदेशीर ठरते. यामध्ये संततीचे संगोपन सुलभरीतीने होते. संकटकाळात संरक्षण होऊन उत्तम नागरिकत्वाचा विकास होतो.

**ब) विभक्त कुटुंब :** सामाजिक अर्थव्यवस्थेत झपाट्याने परिवर्तन होऊ लागले. औद्योगिकरण, शहरीकरण, आधुनिकीकरणामुळे कुटुंबपद्धतीचे विघटन होऊन विभक्त कुटुंबपद्धती उदयास आली. विभक्त कुटुंब आकाराने लहान असून पती-पत्नी व मुले इतकीच मर्यादित सदस्य संख्या असते. पती-पत्नी दोघेही कर्ते असल्यामुळे घराची जबाबदारी दोघे सांभाळतात. कुटुंबातील सदस्यांना वैचारिक स्वातंत्र्य असल्यामुळे व्यक्तिमत्व विकासास वाव मिळतो.

**विभक्त कुटुंबपद्धतीची वैशिष्ट्ये :-**

**१) उत्तम कौटुंबिक संबंध :** विभक्त कुटुंबांमध्ये सदस्यसंख्या कमी असते. सदस्यांमधील संबंध अति निकटचे असतात. परस्परांबद्दल प्रेम, जिव्हाळा व आत्मीयता असते. पती-पत्नी व मुले एवढेच सदस्य असल्यामुळे द्वेष, मत्सर आढळत नाही.

**२) आर्थिक स्वातंत्र्य :** संयुक्त कुटुंबात सामाईक मालमत्ता व सामाईक उपभोग हे तत्त्व असल्यामुळे आर्थिक स्वातंत्र्याचा अभाव असतो. विभक्त कुटुंबात मात्र आर्थिक स्वातंत्र्य असते. आर्थिक प्राप्ती, उपभोग, बचत या गोष्टी वैयक्तिक असतात. कमवणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न त्याचाच कुटुंबाकरिता खर्च करता येते. त्यामुळे त्या व्यक्तींमध्ये समाधान असते, आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी कष्ट केले जातात.

**३) व्यक्तिमत्त्वाचा विकास :** विभक्त कुटुंबामध्ये प्रत्येक सदस्यास आपल्या आवडीप्रमाणे शैक्षणिक प्रगती साध्य करता येते. कला, क्रिडा क्षेत्रात सहभागी होता येते. निर्णय स्वातंत्र्य असल्यामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.

**४) मर्यादित आकार :** विभक्त कुटुंब आकाराने लहान असते. प्रौढ विवाह होत असल्यामुळे कालखंड कमी असतो. आर्थिक परिस्थितीनुसार कुटुंबाचा आकार ठरला जातो. 'छोटे कुटुंब, सुखी कुटुंब' ही संकल्पना मान्य झाल्यामुळे या कुटुंबात अपत्यसंख्या कमी असते.

**२) कुटुंबप्रमुखाच्या लिंगभेदाप्रमाणे :** कुटुंबाची औपचारिक सत्ता, निवासस्थान या आधारावर होणाऱ्या पितृसत्ताक व मातृसत्ताक कुटुंबपद्धत तीची माहिती पुढीलप्रमाणे :-

**अ) पितृसत्ताक कुटुंबपद्धत :-** या कुटुंबपद्धतीमध्ये सर्व औपचारिक सत्ता पित्याच्या हातात असते. विवाहानंतर पत्नी पतीच्या घरी राहावयास जाते व ती पतीच्या गोत्रातील होते. वंशावळ पतीच्या बाजूने चालते. संपत्तीचा वारसा पित्याकडून मोठ्या मुलास मिळतो. या कुटुंबपद्धतीमध्ये स्त्रीला गौण स्थान प्राप्त होते. अर्थोत्पादनात पुरुष महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतो. तर स्त्रीने 'चूल आणि मूल' सांभाळावे अशी श्रमविभागणी झालेली दिसते. भारतीय समाजात पितृसत्ताक कुटुंबपद्धती मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. कुटुंबावर पित्याचे नियंत्रण व नियमन असते. मातेच्या नातेवाईकांना गौण स्थान असते.

**ब) मातृसत्ताक कुटुंबपद्धत :-** या कुटुंबपद्धतीमध्ये स्त्रीचे कुटुंबावर वर्चस्व असते. स्त्रीच्या नावाने किंवा गोत्राने कुटुंब ओळखले जाते. संपत्तीचा वारसा आईकडून मुलीला मिळतो. या कुटुंबपद्धतीमध्ये विवाहानंतर पती पत्नीच्या घरी राहावयास जातो. अर्थोत्पादनामध्ये पतीचा सहभाग कमी असतो. पित्याला गौण स्थान असते. सर्व सत्ता मातेकडे केंद्रित झालेली असते. कुटुंबाची वंशावळ मातेच्या बाजूने चालते. मातृसत्ताक कुटुंबपद्धत दक्षिणेकडे नायर जमातीत व काही आदिवासी जमातीत आढळते. पित्याच्या नातेवाईकांना गौण स्थान असते.

मातृसत्ताक कुटुंबपद्धत येण्यामागे वंशाची शुद्धता राखणे, संपत्तीचे हस्तांतर थांबविणे इ. सारखी कारणे सांगितली जातात. आधुनिक काळात ह्या पद्धतीला फारसे महत्त्व नसल्याचे दिसून येते.

munotes.in

**आपली प्रगती तपासा.**

१) कुटुंबाचे स्वरूप सांगा.

### ४.३.४ कुटुंबाची कार्ये :-

कुटुंब संस्थेचे स्थान मानवी समाजात महत्त्वपूर्ण आहे. समाजसातत्य कुटुंब संस्थेमुळे टिकून आहे. काळानुसार कुटुंबसंस्थेच्या कार्यामध्ये बदल होत चाललेला असला तरी कुटुंबाच्या मुळच्या स्वरुपात बदल झालेला दिसून येत नाही. कुटुंबसंस्थेची कार्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील :-

**१)कुटुंबांची जैविक कार्ये :**

**अ) कामतृप्ती :-** कामतृप्ती ही मानवाची महत्त्वाची गरज आहे. कामवृत्तीची पूर्तता कुटुंबामार्फत पूर्ण होत असते. त्याला समाज मान्यता लाभलेली असते. म्हणूनच लैंगिक संबंधावर आधारित समुह असे कुटुंबसंस्थेचे वर्णन केले जाते.

**ब) प्रजोत्पादन :-** प्रजोत्पादन हे कुटुंबसंस्थेचे दुसरे महत्त्वाचे कार्य आहे. लैंगिक संबंधावर आधारित असणाऱ्या कुटुंबसंस्थेत प्रजोत्पादन होत असते. समाज सातत्यासाठी व समाज अस्तित्वासाठी हे कार्य अत्यंत आवश्यक आहे.

**क) संगोपन :-** प्रजोत्पादन करणे एवढेच मर्यादित कार्य कुटुंबसंस्थेचे असते तर कुटुंबाला फारसे महत्त्व लाभले नसते. प्रजोत्पादनाबरोबरच मुलांचे संगोपन, पालन पोषण हे महत्त्वपूर्ण कार्ये कुटुंब संस्था पार पाडते. अपत्य दीर्घकाळापर्यंत संगोपनासाठी इतरांवर अवलंबून असते. त्यांच्या संगोपनामध्ये आई-वडील, कुटुंबातील इतर सदस्य सहभागी झालेले दिसून येतात.

**२) मानसशास्त्रीय कार्ये :** व्यक्तीला कुटुंबामध्ये मानसिक समाधान व सुरक्षितता लाभते. परस्परावरील प्रेम, आदर यामुळे मानसिक समाधान मिळते. कुटुंबामध्ये रूढी, परंपरा, चालीरिती या मानवी करणाऱ्या प्रक्रिया घडून येतात. व्यक्तीमत्वाच्या सर्वांगीण विकास कुटुंबामध्ये होतो. कुटुंबातील शारिरिक व मानसिकदृष्ट्या कमकुवत सदस्यांना सुरक्षितता लाभते. तसेच जीवनातील कठीण समस्यांचा सामना करण्याचे बळ मिळते. त्यामुळे व्यक्ती व्यवस्थितपणे जीवन जगू शकते.

**३) समाजीकरण :** कुटुंबसंस्थेत मुलांना प्रथा, परंपरा व सामाजिक मुल्यांचा परिचय करून दिला जातो. अपत्यांच्या मानसिक, सामाजिक व भाषिक अशा सर्वांगीण विकासाकडे लक्ष केंद्रित करून जीवनात यशस्वी होण्याचे धडे दिले जातात. अशा आकांक्षा निर्माण करून समाजातील

महत्त्वपूर्ण घटक म्हणून जीवन जगण्याची क्षमता निर्माण केली जाते. व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वपूर्ण सामाजिक घटनांवर कुटुंबाचे नियंत्रण असते. सामाजिक संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कुटुंबामुळेच हस्तांतरित होते.

**४) आर्थिक कार्ये :** कुटुंबातील सदस्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी आर्थिक कार्ये महत्त्वपूर्ण आहेत. प्राचीन काळापासून कुटुंबसंस्थेचे आर्थिक कार्य अखंडीतपणे चालू आहे. शेती हा अर्थोत्पादनाचा केंद्रबिंदू आहे. औद्योगिक क्रांतीपूर्वी कुटुंबसंस्था आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होती. आर्थिक उत्पादन, व्यावसायिक शिक्षण यासारख्या सर्व क्रिया कुटुंबातूनच केल्या जात असत.

**५) मनोरंजन :** प्राचीन खेडी वाहतूक व दळणवळणाच्या साधनाच्या अभावामुळे अलग होती. त्यामुळे मनोरंजनाची साधने, पर्याप्त सोयी यांचा अभाव होता. मनोरंजन ही व्यक्तीची सामाजिक गरज असल्यामुळे ग्रामीण कुटुंबामधून ही गरज पूर्ण केली जात असे. गोष्टी, गाणी, विविध खेळ, एकमेकांच्या नकला, वृद्ध लोकांचे अनुभव यासारख्या लहान लहान घटनामधून सदस्यांची मनोरंजनाची गरज पूर्ण केली जात असे.

ग्रामीण कुटुंबासंस्था वरील महत्त्वपूर्ण कार्ये पार पाडते. त्यावरून कुटुंबसंस्थेचे मानवी जीवनातील स्थान स्पष्ट होते. कुटुंबातील सदस्यांचा पूर्ण विकास व मानवीकरण हे केवळ कुटुंबामुळेच होते. काळानुसार कुटुंबसंस्थेच्या स्वरूपामध्ये बदल होत असला, तरी कुटुंबसंस्था आधुनिक काळात देखील महत्त्वपूर्ण आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) कुटुंबाची विविध कार्ये सांगा.

---

---

---

---

---

### ४.३.५ कुटुंबाची वैशिष्ट्ये :-

कुटुंबसंस्था ग्रामीण किंवा शहरी असो. तिची मूळ वैशिष्ट्ये सारखीच असतात. उदा. समान निवास स्थान, रचना, भावनात्मक ऐक्य इत्यादी. तरी देखील ग्रामीण व शहरी कुटुंबसंस्थेमध्ये काही भेद ठळकपणे दिसून येतात. त्याच्या कार्यपद्धती व वैशिष्ट्यांमध्ये ते जाणवते. ग्रामीण कुटुंब संस्थेच्या काही ठळक वैशिष्ट्यांचा येथे विचार करू.

**१) विवाह संबंध :-** स्त्री - पुरूषांच्या विवाह संबंधातून कुटुंबसंस्था निर्माण होते या वैवाहिक संबंधाला समाजाची मान्यता असते. या संबंधातून जन्माला येणारी संतती आपल्या कुटुंबाचा कायमस्वरूपी सभासद होतो. वैवाहिक संबंध हे दीर्घकालीन किंवा अल्पकालीन असू शकतात. घटस्फोट किंवा जोडादाराच्या मृत्युने हे संबंध संपुष्टात येऊ शकतात.

**२) रक्त संबंध :-** कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकमेकांशी रक्त संबंध असतात. आई-वडिल व मुले यांच्यामध्ये जसे रक्तसंबंध असतात. तसेच आई - वडिलांच्या नातेवाईकांशी देखील मुलाचे रक्त संबंध प्रस्थापित होतात.

**३) समान निवास :-** कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र राहतात. त्यामुळे समान निवासस्थान हे ग्रामीण कुटुंबसंस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. सदस्यसंख्या अधिक असल्यामुळे निवासस्थानाचा आकार मोठा असतो. ग्रामीण संयुक्त कुटुंबामध्ये तीन पिढ्या एकत्र वास्तव्य करताना दिसून येतात.

**४) पितृसत्ताक कुटुंबपद्धती :-** ग्रामीण समाजामध्ये पितृसत्ताक कुटुंबपद्धती आढळते. सर्व कुटुंबाचा पिता हा प्रमुख असतो. त्यामुळे महत्त्वाचे निर्णय हे पित्याकडूनच घेतले जातात. कुटुंबप्रमुखाला सर्व सदस्य मान देतात व त्याचा आदर करतात.

**५) संयुक्त कुटुंबपद्धती :-** ग्रामीण कुटुंबपद्धती सयुंक्त आढळते. या कुटुंबाचा आकार मोठा असतो. यामध्ये तीन पिढ्यांचे सदस्य एकत्र राहतात. संपत्तीची मालकी सामायिक असते व संपत्तीचा सामायिक उपभोग घेतला जातो. श्रमविभागणीचे तत्त्व स्वीकारलेले असते.

**६) आर्थिक व्यवस्था :-** ग्रामीण समाजामध्ये संयुक्त कुटुंबपद्धतीमुळे कुटुंबात सदस्य संख्या जास्त असते. त्यांच्या पालनपोषण, चरितार्थ व उदरनिर्वाहाची जबाबदारी कुटुंब प्रमुखाला पार पाडावी लागते. कुटुंब प्रमुखाच्या अर्थोत्पादक कार्यात सर्व सदस्य सहभागी होतात. श्रमविभागणीनुसार प्रत्येक व्यक्ती आर्थिक सहकार्य करून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करतो.

**७) शिस्त व परस्परावलंबन :-** कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्ती कुटुंब प्रमुख असते. तिचे नियंत्रण संपूर्ण कुटुंबावर असते. कुटुंब प्रमुखाच्या आज्ञेचे पालन सदस्य करतात. शिस्त व परस्परावलंबन या कुटुंबात आढळते. आत्मकेंद्रित वृत्तीचा अभाव असतो. कर्तव्यपालन महत्त्वपूर्ण मानले जाते. अनुशासन व सहकार्यामुळे कुटुंब सर्वाचेच ही भावना निर्माण झालेली असते.

**८) परंपरा व संस्कृतीरक्षण :-** आधुनिकीकरणामुळे भारतीय समाजव्यवस्थेत झपाट्याने परिवर्तन होऊ लागले, परंतु ग्रामीण कुटुंबसंस्था या परिवर्तनापासून दूर होती. परंपरा, रूढी, आचारधर्म यांचे रक्षण करून आपली संस्कृती टिकवून ठेवली आहे. वयोवृद्ध व्यक्तींना मान दिला जातो. त्याच्या ज्ञानाचा व अनुभवाचा वापर व्यवसायात केला जातो.

**९) सामाजिकरणाचे माध्यम :-** कुटुंबाला समाजीकरणाचे उत्तम माध्यम मानले जाते. कुटुंब ही व्यक्तीची पहिली शाळा आहे. कुटुंबामध्येच मुलांवर मूल्य संस्कार केले जातात. नैतिक शिकवण देण्याबरोबरच व्यावसायिक शिक्षणाचे धडे व्यक्तीला कुटुंबातच मिळतात. शिस्त, सहकार्याची भावना, वडीलधाऱ्यांचा आदर या सामाजिकरणाच्या गोष्टी कुटुंबातील सर्व सदस्य मुलांना शिकवत असतात.

**१०) कुटुंबाचे प्रभुत्व :-** ग्रामीण समाजात व्यक्तीपेक्षा कुटुंब श्रेष्ठ असते. कुटुंब प्रत्येक घटकाचे प्रतिनीधीत्व करते. गावातील प्रतिष्ठित कुटुंबाना राजकीय दृष्ट्या महत्त्व असते. त्या

संदर्भात कुटुंबाचा सल्ला महत्त्वाचा मानला जातो. प्राचीन काळी महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेत कुटुंबाला सामावून घेतले जात असे.

**११) सर्वव्यापकता :-** कुटुंबसंस्था ही सर्व व्यापक स्वरूपाची आहे. मानवाच्या सर्व अवस्थांमध्ये कुटुंबसंस्था आढळते. समाज विकासाची पहिली अवस्था कुटुंब आहे. या कुटुंबामध्ये प्रत्येकाचे भावनिक संबंध असतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने कुटुंबाला 'घरपण' प्राप्त होते.

ग्रामीण कुटुंबसंस्थेची वैशिष्ट्ये वरीलप्रमाणे आढळून येतात. औद्योगिकरण, शैक्षणिक सुविधा, जागतिकीकरण व आधुनिकीकरणामुळे ग्रामीण कुटुंबसंस्थेत परिवर्तन होत आहे, असे असले तरी आधुनिक काळामध्येदेखील कुटुंबसंस्थेची भूमिका महत्त्वपूर्ण असलेली दिसून येते.

**आपली प्रगती तपासा.**

१) कुटुंबसंस्थेची वैशिष्ट्ये यावर भाष्य करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

### ४.३.६ कुटुंबाचे बदलते प्रतिमान :-

भारतातील कुटुंबसंस्थेत शिक्षण, औद्योगिकरण, नागरीकरण इ. कारणांमुळे परिवर्तन झालेले दिसून येते. ग्रामीण समुदायातील कुटुंबाच्या तुलनेत नागरी समुदायातील कुटुंबामध्ये बरेच परिवर्तन झाले आहे. परंतु ग्रामीण कुटुंबात मात्र विशेष परिवर्तन घडून आले नाही. याचा अर्थ ग्रामीण कुटुंब स्थिर आहे असे नाही. ग्रामीण कुटुंबात देखील बदल होत आहे. या संदर्भात डॉ. देसाई यांनी नमूद केले आहे की, आधुनिक उद्योगांच्या विकासामुळे आवश्यकतांच्या पूर्तीच्या अर्थव्यवस्थेला बाजार अर्थव्यवस्थेत आणून उभे केले आहे. नागरी घटकांच्या वाढत्या दबावामुळे या परिवर्तनाने प्राचीन ग्रामीण कुटुंबात परिवर्तन घडून आले आहे. भारतातील ग्रामीण कुटुंबातील बदलत्या प्रतिमानाचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे –

**१) कुटुंबाचे मर्यादित कार्यक्षेत्र :** प्राचीन ग्रामीण कुटुंबपद्धत ही संयुक्त होती. त्यामुळे ग्रामीण समुदायात कुटुंबाचे विशेष महत्त्व होते. संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये विविध प्रकारची कार्य पार पाडली जातात. आर्थिक, लौकिक शिक्षण, धार्मिक शिक्षण व मनोरंजन इत्यादी विविध प्रकारची कार्ये कुटुंब संस्थेद्वारे पार पाडली जात असत. त्यामुळे सर्व सदस्य हे कुटुंबावर निर्भर असत. परंतु औद्योगिकरण आणि शहरीकरणामुळे कुटुंबाच्या कार्यात बदल घडून आला आहे. ज्या गरजांच्या पूर्तीसाठी सदस्य कुटुंबावर अवलंबून असत. ती कार्ये आता दुय्यम समुहाकडून पार पाडली जातात. ग्रामीण कुटुंबसंस्थेत देखील हा बदल झालेला आढळून येतो.

**२) ग्रामीण कुटुंबाच्या एकजिनसी स्वरूपात बदल :-** प्राचीन ग्रामीण कुटुंबपद्धतीमध्ये सर्व सदस्य आपल्या कुटुंबाशी एकरूप होऊन आपल्या सर्व जबाबदाऱ्या निष्ठापूर्वक पार पाडीत असत. त्यामुळे कुटुंबाविषयी प्रत्येकाला अभिमान वाटत असे. सर्व सदस्यांमध्ये स्नेह, प्रेम आणि आपुलकी असे. प्रत्येक सदस्य कुटंबाच्या हिताचा वापर करीत असे. व्यक्तीच्या मनात कधी व्यक्तीवादाची भावना निर्माण होत नसे. परंतु आधुनिक काळात व्यक्तीवादाचा प्रभाव ग्रामीण कुटुंबातील सदस्यांवर पडला आहे. आता कुटुंब व्यक्ती कुटुंब हिताऐवजी आपल्या स्वार्थाचा अधिक विचार करते. त्यामुळे कौटुंबिक हिताकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी ग्रामीण कुटुंबाच्या एकजिनसी स्वरूपात बदल झालेला दिसून येतो.

**३) कौटुंबिक संबंधात बदल :-** ग्रामीण कुटुंबातील सदस्यांच्या संबंधात बदल घडून येत असलेला दिसून येतो. पूर्वी ग्रामीण भागात कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय शेती असे. कुटुंबातील सर्व सदस्य शेती व्यवसायात व्यस्त असत. त्यांच्यात जिव्हाळा, प्रेम आणि आपुलकी असे. त्यामुळे त्यांचे कौटुंबिक संबंध चांगले असत. परंतु अलिकडील काळात विविध कारणांमुळे ग्रामीण कुटुंबातील संबंध हे औपचारिक व करारात्मक स्वरूपाचे झाले आहे. कुटुंबातील सदस्य हे वेगवेगळे व्यवसाय करू लागले. काही सदस्य शिक्षण घेऊन बाहेरगावी नोकरी करू लागले. सर्व गोष्टींमुळे ग्रामीण कुटुंबातील सदस्यांच्या संबंधात बदल झाला आहे.

**४) कुटुंबाचा प्रभाव कमी झाला :-** ग्रामीण समुदायात कुटुंबाचे महत्त्व होते. आर्थिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात कुटुंबाची महत्त्वाचे कार्य होते व प्रभाव देखील होता. नागरीकरणाच्या प्रक्रियेमुळे कुटुंबाच्या कार्यात बदल झाला. कुटुंबाचा व्यक्तीगत परिवर्तनावरील प्रभाव कमी झाला. तसेच ग्रामीण जीवनावरील कुटुंबाचा प्रभाव कमी झाला.

**५) कुटुंबप्रमुखाचे महत्त्व घटले :-** ग्रामीण कुटुंबसंस्थेत संपूर्ण कुटुंबावर कुटुंबप्रमुखाचे नियंत्रण असे व त्याच्या आज्ञेत कुटुंबातील सर्व सदस्य असायचे. परंतु नागरीकरणाच्या प्रभावामुळे व्यक्तीवाद, वैयक्तिक, स्वातंत्र्य आणि महत्त्वकांक्षा यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कुटुंबप्रमुखाच्या आज्ञेचे उल्लंघन करण्याचे प्रमाण वाढत गेले. याचाच अर्थ आधुनिकीकरण व शहरीकरणामुळे कुटुंबसंस्थेतील प्रमुखाचे महत्त्व घटलेले दिसून येते.

**६) संयुक्त कुटुंबपद्धतीचा ऱ्हास :-** संयुक्त कुटुंबपद्धती हे कुटुंबसंस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये होते. शेती या प्रमुख व्यवसायामुळे ग्रामीण भागात संयुक्त कुटुंबपद्धती उदयास आली.समान व्यवसाय, समान निवासस्थान हे महत्त्वाचे वैशिष्ट्य संयुक्त कुटुंबपद्धतीचे होते. मात्र आधुनिक काळातील नागरीकरण, शिक्षण, नोकरी, व्यक्तीवाद इत्यादी कारणांमुळे विभक्त कुटुंबात राहणे लोक पसंत करू लागले. त्यामुळे केवळ नागरी भागातच नव्हे तर ग्रामीण भागात देखील संयुक्त कुटुंबाचा ऱ्हास होऊन विभक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात येत असलेली दिसून येते.

**७) कुटुंब उपभोगाचे केंद्र बनले :-** ग्रामीण समुदायातील कुटुंब हेच उत्पादनाचे केंद्र होते. कुटुंबातील सर्व सदस्य हे शेती आणि इतर व्यवसायात सहभागी होत असत. त्यामुळे उत्पादनाचा प्रमुख घटक हा कुटुंबच होता. परंतु आता मात्र कुटुंबाच्या स्वरूपात बदल झाला आहे. कुटुंब आता उत्पादनाचे केंद्र न राहता ते उपभोगाचे केंद्र बनले आहे. आपल्या आवश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी विविध वस्तूंची खरेदी करून त्याचा उपभोग कुटुंबात घेतला जातो.

**८) वैवाहिक बंधनात शिथिलता :-** कुटुंबातील सदस्यांचा विवाह हा जातीतच करून देणे हे कुटुंबाचे महत्त्वाचे कार्य होते. विवाहाच्या संदर्भात वैयक्तिक गोष्टीला महत्त्व नव्हेत. रूढी, परंपरांचा विचार करूनच कुटुंबाद्वारे विवाह करून दिला जात असे. परंतु आता मात्र शहरीकरण, आधुनिकीकरण, शिक्षण प्रसार यांच्या प्रभावामुळे वैवाहिक बंधनात परिवर्तन झाले. आंतरजातीय विवाह, प्रेमविवाह यांना मान्यता मिळू लागली. पती-पत्नीची निवड ही व्यक्तिगत गोष्ट मानण्यात येऊ लागली.

वरील प्रकारचे परिवर्तन ग्रामीण समुदायातील कुटुंबसंस्थेमध्ये झालेले दिसून येते. आज प्रत्येक खेडयापर्यंत पक्के रस्ते, वाहतूक व दळणवळणाची साधने उपलब्ध होऊ लागली. ग्रामीण जनतेचा शहरांशी संपर्क येऊ लागला. शहरी जीवन शैलीचे अनुकरण ग्रामीण समुदाय करू लागला. चैनींच्या वस्तूंचा उपभोग ग्रामीण जनता देखील घेऊ लागली. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे ग्रामीण कुटुंबसंस्थेत महत्त्वाचे बदल घडून आलेले दिसून येतात.

**आपली प्रगती तपासा.**

१) कुटुंबसंस्थेचे बदलते प्रतिमान सांगा.

## ४.४ सारांश :-

समाजशास्त्रामध्ये नियमांची बांधणी किंवा चौकट या अर्थाने संस्थेचा अभ्यास केला जातो. मानवाच्या मुलभूत गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने संस्था महत्त्वपूर्ण आहेत. प्रत्येक संस्थेचा अर्थ, वैशिष्ट्ये व कार्ये यांचा अभ्यास संस्थांमध्ये प्रामुख्याने केला जातो. संस्थेचा सखोल अभ्यास केल्यानंतर समाजासाठी संस्थेची उपयुक्तता लक्षात येते. सामाजिक संस्थांमध्ये कुटुंबसंस्था प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. आदिवासी, ग्रामीण व शहरी समुदायामध्ये तिचे स्वरूप भिन्न आहे. एकत्र कुटुंब पद्धती व विभक्त कुटुंबपद्धती हे कुटुंबाचे प्रमुख प्रकार आहेत.

मातृसत्ताक व पितृसत्ताक कुटुंबपद्धती समाजामध्ये पहावयास मिळते. विवाहातून कुटुंबसंस्था निर्माण होते. कुटुंबामुळे समाजसातत्य टिकून राहिले आहे. औद्योगिकरण, शहरीकरण, साक्षरता प्रसार, व्यवसाय निवड स्वातंत्र्य, व्यक्तिवादी दृष्टीकोन यामुळे कुटुंबसंस्थेत परिवर्तन झालेले दिसून येते.

munotes.in

## ४.५ स्वाध्याय :-

१) ग्रामीण सामाजिक संस्थेची कार्यपद्धती स्पष्ट करा.
२) ग्रामीण कुटुंबसंस्थेचे प्रकार सांगा.
३) ग्रामीण कुटुंबसंस्थेची कार्यपद्धती विशद करा.
४) कुटुंबसंस्थेचे बदलते स्वरूप सांगा.
५) टिपा द्या.
    १) सामाजिक संस्थेचे महत्त्व
    २) कुटुंबसंस्थेचे महत्त्व
    ३) संयुक्त कुटुंबपद्धत

## ४.६ संदर्भसूची

१)बोबडे प्रकाश - भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक, श्री मंगेश प्रकाशन - नागपुर
२)आगलावे प्रदिप - भारतीय समाज – संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन - पुणे
३)नाडगोडे गुरुनाथ - ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टीनेन्टल प्रकाशन – पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# घटक -५

## ग्रामीण सामाजिक संस्था - २

- डॉ. स्मिता भोईर

**पाठाची रचना :**

५.० उद्दिष्टे
५.१ प्रस्तावना
५.२ जातीव्यवस्था
५.३ ग्रामीण वर्गरचना
५.४ सारांश
५.५ स्वाध्याय
५.६ संदर्भसूची

## ५.० उदिष्ट्ये

- जातीव्यवस्थेचा अभ्यास करता येईल.
- ग्रामीण वर्गरचना लक्षात येईल.
- जातीसंस्था व वर्गव्यवस्थेतील परिवर्तनाची पद्धत लक्षात येईल.

## ५.१ प्रस्तावना

प्रत्येक मानवी समुहाची विभागणी काही समुहात आलेली आहे. काही बाबींमुळे या समुहांचे वेगळेपण स्पष्टपणे दिसुन येते. समाजामध्ये जात, स्थान, आप्तसंबंध इत्यादी आधारांवर समुह अस्तित्वात येतात. त्या आधाराप्रमाणेच समुहाचे वेगळेपण निश्चित होते. भारतीय समाजाची श्रेणी रचना ही जातीवर आधारित आहे. भारतीय समाजातील विशिष्ट प्रकारची वर्गरचना जातीच्या पायावर उभी आहे. भारतीय समाज लहान-मोठ्या गटांमध्ये जातीमुळेच विभागला आहे. जाती हे भारतीय समाजाचे अद्वितीय वैशिष्ट्य आहे. जात ही व्यापक आणि मुलभूत संस्था आहे.

भारतीय समाज जीवनाला आकार हा जातीनेच दिला आहे. व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनात देखील जातीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. जातीची काही वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे

भारतीय समाजात जातीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. जातीच्या विशिष्ट कार्यपद्धतीने भारतीय समाजजीवन संपूर्णपणे नियंत्रित झाले होते.

## ५.२ जातीची संकल्पना

भारतीय ग्रामीण संरचनेत जातीव्यवस्था महत्त्वाची आहे. जातीच्या आधारावरच समाजामध्ये व्यक्तीला स्थान व दर्जा प्राप्त होत असे. भारतीय समाजाची विभागणी जातीच्या आधारावरच श्रेष्ठ व कनिष्ठ स्तरांमध्ये झालेली आहे. व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंतच्या सर्व समाज घटकांचे नियमन जातीद्वारे होते. आर्थिक जीवन, सामाजिक जीवन, धार्मिक वर्तनाचे आदर्श अशा संपूर्ण जीवनाचे नियंत्रण जाती प्रमाणकांनी केले जाते. जातीच्या संदर्भात अभ्यासकांनी काही भिन्न मते मांडली आहेत. त्याचा उल्लेख थोडक्यात पुढीलप्रमाणे करता येईल.

भारतीय समाजात आढळून येणारे स्तरीकरण म्हणजे भारतीय समाजातील जातीव्यवस्था सामाजिक स्तरीकरणाचे हे स्वरुप सामाजिक संघरचनेचा एक वैशिष्टपूर्ण प्रकार आहे. सामाजिक रचनेचा अभ्यास करणाऱ्या अनेक भारतीय व पाश्चात्य विचारवंताचे लक्ष या संस्थेने आपल्याकडे आकृष्ट केले. प्रा. लिय यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे रचनात्मक दृष्टिकोनातून भारतीय समाजातील जातीव्यवस्था इतर समाजात आढळून येणाऱ्या स्तरीकरणाशी मिळतीजुळती असली तरी सांस्कृतिक दृष्टिकोनातून जातीसंस्थेची इतर सामाजिक स्तरीकरणाशी तुलना करता येत नाही.

भारतीय जातीप्रथेत धार्मिक व धर्मनिरपेक्ष असे दोन्ही प्रकार आढळून येतात. शिक्षण, व्यवसाय व उत्पन्न यावर धर्मनिरपेक्ष प्रकार आधारित आहेत तर धर्माष्ठित प्रकाराने पवित्र व अपवित्र कल्पना जोपासली आहे. जातीप्रथेने धार्मिक विचारसरणीबरोबर आदर्श वर्तनाचे धडे देखील समाजासमोर ठेवले आहे. जातीप्रथेचा मुख्य उद्देश सामाजिक श्रमविभाजन व संघटनेचा आदर्श निर्माण करणे हा होता.

भारतीय समाजात व्यक्तीचा दर्जा हा त्याच्या जातीवरुन निश्चित होत असे. व्यक्तीची ओळख त्याच्या कर्तृत्व गुणांवर न करता जातीवर होत असे. कारण भारतीय समाजजीवनात जातीसंस्थेचा फार मोठा प्रभाव होता. वर्ण व जाती या दोन्ही भिन्न संकल्पना आहेत. वर्णव्यवस्थेमुळे भारतीय समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णात विभाजन झाले होते. तर, जातीसंस्थेमुळे भारतीय समाजाचे शेकडो जाती व उपजातींमध्ये विभाजन झालेले आढळून येते. प्राचीन काळी भारतीय समाजात प्रथम वर्ण व्यवस्था अस्तित्वात आली व त्यानंतर जातीव्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे भारतीय समाजात विषमता निर्माण झाली.

प्राचीन वैदिक वाङ्मयात प्रामुख्याने ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णाचा उल्लेख आढळतो, पण ऋगवेदाच्या पुरुषसुक्तात मात्र ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चारही वर्णांचा उल्लेख आढळतो.

ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्य कृतः।।
उरुस्तदस्थ यद्वैश्यः पदभ्यां शुद्रो ऽ जायत।।

ऋगवेदाच्या पुरुषसुक्तातील वरील उल्लेखानुसार ब्राह्मण हे मुखातून, क्षत्रिय हे बाहुतून, वैश्य हे मांडीतून आणि शुद्र हे पायातून जन्माला आले आहेत. तसेच व्यक्तीला गुण व कर्माने दुसऱ्या वर्णाचे सदस्यत्व मिळत असे. सदस्यत्वाचा आधार जन्म नव्हता. त्या काळात अस्पृश्यता आढळत नव्हती.

उत्तर वैदिक काळात ब्राह्मण यज्ञयाग करु लागले. त्यांना धार्मिक कार्य करण्याच्या अधिकाराबरोबरच उच्च दर्जा मिळाला. क्षत्रिय संरक्षणाचे, वैश्य अन्नधान्य उत्पादन आणि व्यापाराचे कार्य करु लागले. स्थानिक अनार्यांचा समावेश शुद्र वर्णात झाला. या कालखंडात ताठरता नव्हती. पुढे सदस्यत्व जन्माने ठरु लागले आणि विशिष्ट व्यवसाय करणारे आंतर्विवाही गट जाती म्हणून ओळखले जाऊ लागले. मनुस्मृती, याज्ञवल्क स्मृती व इतर स्मृती मधून याचे प्रत्यंतर येते. याच काळात व्यवसाय, विवाह, खानपान, संस्कार, स्पर्शास्पर्शावर बंधने टाकलेली आढळतात. अनुलोम व प्रतिलोम विवाहातुन संकर प्रजा जन्माला येऊन त्यांचा वेगळ्या संज्ञेने उल्लेख केलेला आहे. या प्रक्रियेतून संमिश्र वर्णाची संख्या वाढत जाऊन पुढील काळात त्यातुन जाती व उपजाती जन्मास आल्याचे लक्षात येते.

मध्ययुगात शासक, ब्राह्मण, सावकार, उद्योजक व सेवक असे मुख्य गट पडले. जाती पंचायती प्रबळ बनल्या. जाती सदस्यांच्या वर्तनाचे नियमन व नियंत्रण पंचायतीकडून होऊ लागले. व्यवसाय व प्रादेशिक भिन्नतेतून जाती व उपजातींची संख्या वाढली.

वरील सर्व घटनांवरुन जातीची संकल्पना लक्षात येते. जातीसंस्थेचे अध्ययन करताना जातीचे वैशिष्ट्ये व कार्यपद्धती यांचादेखील अभ्यास महत्त्वाचा असतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) जातीची संकल्पना स्पष्ट करा.

---

---

---

---

---

### ५.२.१ जातीचे स्वरुप :

भारतीय ग्रामीण संरचनेत जातीव्यवस्था अतिशय महत्त्वपूर्ण आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत व्यक्तीच्या जीवनात जातीव्यवस्था महत्त्वाची असलेली दिसुन येते. भारतातील जातीसंस्थेचे अध्ययन प्रामुख्याने प्राच्यविद्याशास्त्रीय (Indological), सामाजिक मानववंशशास्त्रीय (Socio-Anthropological) आणि समाजशास्त्रीय (Sociological) या तीन दृष्टिकोनातून करण्यात आले असे डॉ. आहुजा यांनी या ‘Indian Social System’ या ग्रंथात नमुद केले आहे.

प्राच्यविद्याशास्त्रीय दृष्टिकोन हा धार्मिक स्वरुपाचा असुन या दृष्टिकोनानुसार धर्मग्रंथांमध्ये जातीच्या उत्पत्ती आणि उद्देशांचे वर्णन केले आहे. सामाजिक व मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनानुसार संघटनात्मक, संरचनात्मक - संस्थात्मक आणि संबंधात्मक आधारावर जातीची उत्पत्ती आणि विकास झाला. तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समाजातील सामाजिक स्तरीकरण या अर्थाने जातीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

'जात' हा मराठी शब्द 'जन' या संस्कृत धातुपासून बनला आहे. याचा अर्थ 'जन्म' असा होतो. एक प्रकारे जन्माने प्राप्त होणारा समुह म्हणजे जात होय. जातीला इंग्रजीमध्ये 'caste' असे म्हणतात. 'caste' हा इंग्रजी शब्द पोर्तुगीज 'casta' या शब्दावरुन बनला आहे. 'casta' या पोर्तुगीज शब्दाची व्युत्पत्ती 'castus' या लॅटीन भाषेतील शब्दापासुन झाली. 'castus' या शब्दाचा अर्थ वंशाची शुद्धता असा आहे.

जाती व्यवस्थेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना, समाजशास्त्रातून डॉ. बी. आर. आंबेडकर नमुद करतात की, 'जात हा शब्द समान दर्जाचा नाही. जात ही असमानतेवर आधारित आहे. एक जात दुसऱ्या जातीच्या तुलनेत उच्च किंवा कनिष्ठ आहे आणि मधल्या जाती या उच्च जातीपेक्षा कनिष्ठ व कनिष्ठ जातीपेक्षा उच्च आहेत. जाती पद्धत ही श्रेणी पद्धत असुन त्यात उच्च जातीला अग्रक्रम आणि कनिष्ठ जातीला इतरांपेक्षा न्युनक्रम मिळतो.'

अशाप्रकारे भारतीय समाजाचे वेगवेगळ्या जातींमध्ये विभाजन झाले आहे. समाजाचे वेगवेगळ्या जातीत झालेले विभाजन हे एक प्रकारचे सामाजिक स्तरीकरण आहे. परंतु हे स्तरीकरण व्यक्तीच्या गुण आणि कर्तृत्वाच्या आधारावर नसुन ते व्यक्तीच्या जातीच्या आधारावर आहे. व्यक्तीचा जन्म ज्या जातीत झाला, त्या जातीचा दर्जा व्यक्तीला प्राप्त होतो. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे व्यक्तीला जात बदलता येत नाही. त्यामुळे व्यक्तीचा दर्जा देखील बदलला जात नसे. त्यामुळेच जातीवर आधारित असलेले स्तरीकरण हे बंदिस्त स्वरुपाचे असे.

**आपली प्रगती तपासा :**

१) जातीचे स्वरुप स्पष्ट करा.

---

---

---

---

---

**५.२.२ जातीची व्याख्या :**

**१) डॉ. बी. आर. आंबेडकर :**

आंतर्विवाहाच्या अनुसरणामुळे जाती शतकानुशतके कायम राहिल्या आहेत.

munotes.in

**२) डॉ. मुजूमदार आणि डॉ. मदन :**

जात हा एक बंद वर्ग आहे.

**३) चार्लस कुले :**

जेव्हा वर्ग अनुवंशिकतेच्या तत्त्वावर आधारलेला असतो तेव्हा आपण त्याला जात म्हणू शकतो.

**४) डॉ. इरावती कर्वे :**

एकच सामान्यनाव धारण केलेल्या कुटुंबाचे अथवा गटाचे संकलन म्हणजे जात होय आणि जात म्हणजे विस्तारीत कुटुंब होय.

**५) डॉ. एम्. एन. श्रीनिवास :**

जात हा वंशानुक्रमे मिळणारा आंतर्विवाहीसमुह असुन तो स्थानिक असतो. तसेच त्यांचा एक परंपरागत व्यवसाय असतो. जातीला स्थानिक, सामाजिक संस्तरणात एक विशिष्ट स्थान असते. या व्यवस्थेत व्यक्ती विशिष्ट जातीत जन्म घेते आणि तिला जातीनुसार दर्जा मिळतो व भूमिका पार पाडाव्या लागतात.

वरील व्याख्यांवरुन लक्षात येते की, व्यक्तींचा दर्जा, व्यवसाय, विवाहातील जोडीदार निवड या गोष्टी जन्माने ठरत होत्या व त्यामध्ये बदल करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला नव्हते. जातीव्यवस्थेमुळे जीवनपद्धती, पोषाख, आहार, प्रतिष्ठा निश्चित होत असे. ग्रामीण समाजात जातीव्यवस्था आजदेखील भक्कम आहे. व्यक्तीचे जीवन जातीनेच नियंत्रित झालेले असते.

जातीच्या व्याख्यांवरुन जातीचे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही म्हणून जातीची काही सार्वत्रिक वैशिष्ट्ये, हट्टन, एन. के. दत्त तसेच डॉ. धुर्ये यांनी अधोरेखित केली आहेत. ती पुढीलप्रमाणे -

### ५.२.३ जातीची वैशिष्ट्ये :

**१) समाजाची खंडात्मक विभागणी :**

जातीव्यवस्थेमुळे समाज अनेक गटांमध्ये विभागला गेला आहे. यामुळे या गटांमध्ये व्यवसाय, जीवनपद्धती, रुढी परंपरा यात भिन्नता निर्माण होऊन गटांचे वेगळेपण निर्माण झाले. प्रत्येक जातीची जीवनशैली विकसित झाली. जातीची जीवनशैली एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होताना त्यांना सांस्कृतिक गट असे समाजशास्त्रीय दृष्टिने संबोधले जाते. जातीचे वेगळेपण टिकवून ठेवण्यासाठी “जातपंचायत” स्थापन करण्यात आली. त्यामुळे जाती गटाची बंधने अधिक घट्ट झाली. जातींमधून पोटजाती निर्माण झाल्या व काही काळानंतर त्यांचा वेगळा जातीगट निर्माण झाला म्हणून डॉ. धुर्येनी समाज लहान मोठ्या गटांमध्ये विभाजित झाला असे म्हटले आहे.

**२) श्रेष्ठ - कनिष्ठता :**

जाती संस्थेची रचना उतरंडीसारखी असते वर निमुळती व खाली पसरट असते. वरिष्ठ जातींमध्ये कुटुंबसंख्या कमी असते, मध्यम व कनिष्ठ जातींमध्ये कुटुंबसंख्या वाढलेली असते. वरिष्ठ जातींना सत्ता व विशेषधिकार प्राप्त होतात. अध्ययन अध्यापन - ब्राह्मण, संरक्षण - क्षत्रिय, व्यापार उदीम - वैश्य व सेवाकार्ये करणारे शुद्र अशी भिन्न जाती गटांच्या क्रम निश्चित

करणारी सोपन परंपरा अस्तित्वात आली. जात ही जन्माने ठरली जात असल्यामुळे व्यक्तीला आपली जात व जातीनुसार प्राप्त झालेला दर्जा बदलता येत नसे.

**३) विवाह विषयक बंधने :**

जातीला आंतर्विवाही गट असे संबोधले जाते. विवाहावर प्रतिबंध जातीने घातलेला दिसून येतो. जातीतील प्रत्येक सदस्याने आपल्या जातीशीच विवाह संबंध प्रस्थापित केले पाहिजेत. असा जातीचा नियम असे. जातीबाहेर विवाह संबंध ओडल्यास सदस्यांना जातीतून बहिष्कृत केले जात असे. जातीचे श्रेष्ठत्व जपणे ही भावना त्या मागे दिसून येते. जातीने आंतर्विवाहाने स्वतःची शुद्धता व श्रेष्ठत्व राखण्याचा प्रयत्न केला व बहिर्विवाहावर बंदी घालून उपजातींच्या निर्मितीवर नियंत्रण ठेवल्याचा प्रयत्न केला. विवाहविषयक बंधनामुळे जातीगट परस्परांपासून वेगळे व कायम राहिले.

**४) व्यवसाय निवडीचे निर्बंध :**

प्रत्येक जातीचा व्यवसाय निश्चित होता. व्यवसाय परंपरेने चालत आलेला असल्यामुळे तोच व्यवसाय करणे व्यक्तीला बंधनकारक होते. आपल्या आवडीप्रमाणे व कलागुणांप्रमाणे व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नव्हते. व्यवसायाप्रमाणे व्यक्तीचा समाजातील दर्जा निश्चित होत असे. उत्क्रम रचनेमुळे वरिष्ठ जातीचे व्यवसाय श्रेष्ठ मानले जात असत. व्यवसायावरुन जातींना नावे पडत तसेच व्यवसायाचे कौशल्य आपल्या जातीपुरतेच मर्यादित व गुप्त ठेवले जात असे. शेती व सैनिकी व्यवसाय त्या मानाने सर्वांना मुक्त होते. पण सहसा व्यवसायात बदल केला जात नसे. त्यामुळे व्यवसायाने व्यक्तीला आर्थिक संरक्षण मिळत असे.

**५) खानपान व सामाजिक संबंधविषयक निर्बंध :**

जातीनेच व्यक्तीचे जीवन पूर्णपणे नियंत्रित केलेले होते. जातीचे सामाजिक संबंध व रोटी व्यवहार विषयक कडक निर्बंध होते. कनिष्ठ जातीचा स्पर्श, सावली निषिद्ध मानली जात असे. जातीच्या नियमांमुळे व्यक्तीच्या आचार विचारांवर मर्यादा होत्या. निषिद्ध जातींच्या लोकांकडून अन्न व पाणी स्विकारले जात नसे. जातीसंस्थेच्या खानपान व सामाजिक संबंध विषयक निर्बंधाचे कठोरतेने पालन केले जात असे. तामीळनाडूमध्ये शुद्रांना ब्राह्मणांशी बोलताना काही अंतर ठेवावे लागत असे. ब्राह्मणांशी बोलताना शाणार या शुद्र जातीने २४ पावलांचे अंतर ठेवावे असा नियम होता.

**६) सामाजिक व धार्मिक बंधने :**

जातीच्या उत्क्रम रचनेप्रमाणे जातींना समाजामध्ये स्थान प्राप्त होत होते. त्यामुळे कनिष्ठांना सामाजिक व धार्मिक अधिकारांपासून वंचित राहावे लागले होते. कनिष्ठ जातींना गावात कोठे वास्तव्य करावयाचे, आहार, पोषाख कसा असावा याची कडक बंधन असत. अस्पृश्यांनी खेड्याबाहेर वास्तव्य करावे असा नियम होता. गावाच्या सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्यास कनिष्ठांना बंदी होती. गुजरातमध्ये अस्पृश्यांनी शिंगे जवळ बाळगावी, असा निर्बंध होता. जमिनीवरील आपली पावले पुसून टाकण्यासाठी अस्पृश्यांना कमरेला केरसुणी बांधावी लागत असे.

कनिष्ठ जातीची अयोग्यता धार्मिक बाबतीत विशेषत्वाने दिसून येत असे. शुद्र जातीना वेदांचे अध्ययन, धार्मिक विधी करण्यास मनाई होती. ब्राह्मण हा श्रेष्ठ असल्यामुळे राजाकडून त्याला संरक्षण मिळत असे.

जातीसंस्थेच्या वरील वैशिष्ट्यांमुळे भारतीय समाज जीवनात जातीसंस्था महत्त्वपूर्ण होत्या. काळानुसार जातीसंस्थेच्या वैशिष्ट्यांमध्ये परिवर्तन होत असलेले दिसून येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) जातीची वैशिष्ट्ये सांगा.

### ५.२.४ जातीचे महत्त्व :

भारतीय समाजातील महत्त्वपूर्ण सामाजिक संस्था म्हणून जाती संस्थेला ओळखले जाते. भारतीय संस्कृती दिर्घकाळापर्यंत टिकवून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य जाती संस्थेने केले आहे. जातीचे महत्त्व पुढील मुद्यांवरुन स्पष्ट करता येईल.

१) ग्रामीण सामाजिक संघटनेची आधारशीला जातीसंस्था आहे. जातीच्या आधारे उच्चनीचतेचे स्तरीकरण होऊन समुहाची प्रतिष्ठा निश्चित केली जाते.

२) जातीसंस्थेमुळे उच्चनीच असे स्तरीकरण होत असले तरी पारस्पारिक मदत हे जातीचे मुख्य सुत्र होते. त्या आधारे जजमान आपल्या सेवक जातीना वेळप्रसंगी आर्थिक सहाय्य करीत असत.

३) जातीसंस्थेच्या व्यवसाय निश्चिती या तत्वामुळे प्रत्येक व्यक्तीचा व्यवसाय निश्चित होता. त्यामुळे बेकारीचा प्रश्न निर्माण होत नसे. विभिन्न जातीमध्ये आजसारखी जीवघेणी स्पर्धा नव्हती. रोजगाराची फार मोठी सोय जाती संस्थेने निर्माण केली होती.

४) आंतर्विवाहाची पद्धत जातीसंस्थेमुळे रुढ झाली. जातीला आंतर्विवाही समुह म्हणून ओळखले जाते. त्यामुळे रक्त शुद्धी व परंपरागत जातीगुण कायम राहू शकले.

५) जाती संस्थेमुळे श्रमाचे विशेषीकरण झाले त्यामुळे परंपरागत व्यवसाय कौशल्य राखता आले.

६) ग्रामीण संस्कृतीमध्ये स्थायी मूल्ये निर्माण होण्यास प्रोत्साहन जातीसंस्थेमुळे मिळालेले दिसुन येते. ही मुल्ये आजपर्यंत जातीमुळेच सुरक्षित राहू लागली.

७) प्रत्येक जातीला दुसऱ्या जातीची गरज असल्यामुळे परस्परांना आश्रय देण्याची वृत्ती निर्माण झाली. सेवा व सहकार्य ह्या भावनेमुळे सामाजिक ऐक्य व परस्पर सहानुभूती निर्माण झाली.

८) जातीसंस्थेच्या कडक निर्बंधामुळे जातीमध्ये ऐक्य निर्माण झाले व अनुशासन कायम राहिले.

ग्रामीण समाजामध्ये जातीने अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य पार पाडलेले दिसून येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) जातीचे महत्त्व स्पष्ट करा.

**५.२.५ जातीचे कार्ये :**

जातीसंस्थेमुळे भारतीय समाजरचना अनेक शतके भक्कम व मजबूत राहिली आहे. जातीवरुन व्यक्तीची सामाजिक स्थिती, कार्य लक्षात येते. हट्टन यांच्या मते व्यक्तीवर जन्मापासून ते मृत्यूपर्यंत जातीचे नियंत्रण असते. समाजाच्या स्तरीकरणाचा मुख्य आधार जातीव्यवस्था आहे. सुसंघटीत समाजरचना जातीमुळेच निर्माण झाली. व्यक्तीच्या जीवनाला आकार जातीनेच दिला आहे. जातीसंस्थेची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) आर्थिक कार्ये :**

**अ) व्यवसाय निश्चिती :**

प्रत्येक जातीचा व्यवसाय निश्चित असे व्यवसाय हा परंपरेने चालत आलेला असून त्याचे प्रशिक्षण कुटुंबातच मिळत असे. प्रशिक्षणासाठी स्वतंत्र व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांची गरज भासत नव्हती. व्यवसाय निश्चितीमुळे जीवघेणी स्पर्धा व बेकारी या समस्या भेडसावत नव्हत्या. जातीने आर्थिक स्थैर्य निर्माण केले होते.

**ब) श्रम विभाजन :**

प्रत्येक व्यक्तीला व्यवसायाचे प्रशिक्षण कुटुंबातच मिळत असे. जातींनी आपल्या व्यवसायामध्ये नैपुण्य प्राप्त करुन घेतले होते. व्यवसाय विभागणी जातीमुळे झालेली असल्यामुळे श्रमविभाजन सहजपणे घडून येत होते. कर्मतत्त्वाप्रमाणे प्रत्येक व्यक्ती आपले कार्य करीत होती. त्यामुळे श्रमविभाजनाची व्यवस्था समर्थपणे कार्यरत होती. बलुतेदारी पद्धती हे उत्तम उदाहरण श्रमविभाजनाचे देता येईल.

**क) सामाजिक व आर्थिक सुरक्षितता :**

जातीच्या व्यवसाय निश्चितीमुळे बेरोजगारीची समस्या निर्माण झालेली नव्हती. जातीला व्यावसायिक गट असे म्हटले जात असे. व्यवसाय परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असल्यामुळे लोकांना आर्थिक स्थैर्य व सुरक्षितता प्राप्त झाली होती. व्यक्तीचे सामाजिक स्थान जातीमुळे निश्चित होत असे. त्यामध्ये बदल करण्याचे स्वातंत्र्य नसल्यामुळे द्वेष, मत्सर या भावना निर्माण झाल्या नव्हत्या.

जातीसंस्थेचे वर्णन 'सामाजिक विमा' असे केले आहे. कारण शारिरीक अपंगत्व, वृद्धावस्था व आजारपणात देखील कौटुंबिक व्यवसायामुळे व्यक्तीला आर्थिक व सामाजिक सुरक्षितता लाभते.

**२) जातीची सामाजिक कार्ये :**

**अ) सामाजिक पदाची निश्चिती :**

श्रेष्ठ-कनिष्ठता हा जातीचा स्थायीभाव आहे. त्यामुळे समाजातील दर्जा निश्चिती जातीमुळे होते. जात जन्मावर आधारित असल्यामुळे व्यक्तीचे सामाजिक पद हे स्थितीमुळे निर्माण न होता जातीमुळेच निर्धारित होते.

**ब) विवाहसंस्थेचा आधार :**

आंतरजातीय विवाहास मान्यता असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला जातीतच विवाह करावा लागत असे. जातीला त्यामुळेच विवाह संस्थेचा आधार म्हणून ओळखले जाते. जातींमधील पोटजातींमध्ये देखील या नियमाचे कठोरतेने पालन केले जात असे.

**क) व्यक्ती व्यवहारावर नियंत्रण :**

जातीच्या नियमांनुसारच व्यक्तीला वर्तन करावे लागत असे. त्यामुळे जातीचे व्यक्तीच्या व्यवहारांवर नियंत्रण दिसून येत होते. जातीच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या सदस्याला शासन केले जात असे. त्यामुळे जातीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन सदस्य करत असत. सामाजिक आदान-प्रदान, उचित-अनुचित दंड अशी नियंत्रणात्मक कार्ये जातीसंस्था पार पाडीत असत.

**ड) ग्रामीण नेतृत्व निर्मिती :**

ग्रामीण भागातील नेतृत्व जातीशी संबंधित आहे. प्राचीन काळी व्यक्तीच्या राजकीय जीवनावर जातीचे नियंत्रण होते. प्रभावी जाती गावाचे नेतृत्व करीत असत. त्यांचे मार्गदर्शन ग्रामस्थ खुशीने स्वीकारीत. ग्रामीण राजकीय क्षेत्रात जातीचे वर्चस्व आजही दिसून येते. ग्रामीण नेतृत्व निर्मितीमध्ये जातीसंस्था प्रभावी आहेत.

**इ) समाज व संस्कृती रक्षण :**

जातीसंस्थेमुळे समाज व संस्कृती यांचे रक्षण झाले. भारतावर अनेक आक्रमणे होऊन सुद्धा जातीसंस्था अभंग राहिल्या. काळाच्या ओघात त्या नष्ट झाल्या नाहीत. या मागील मुख्य कारण म्हणजे जातीसंस्थेचे नियंत्रण जातीच्या नियंत्रणामुळे संस्कृती स्थिर राहिली. जातीसंस्थेमुळे लहान गट एक सूत्रात बांधले गेले. समाजाचे रक्षण करणारे कवच म्हणून जातीसंस्थेचे वर्णन केले जाते.

जातीच्या सामाजिक कार्यामुळे व्यवहाराचा साचा निर्माण झाला. तसेच व्यक्तीचे समाजातील स्थान व दर्जा निश्चित झाला.

munotes.in

**३) जातीचे समुदायविषयक कार्ये :**

**१) धार्मिक भावनांचे रक्षण :**

प्रत्येक जातीचे काही कुलाचार असतात. त्याचे पालन व्यक्तीकंडून केले जाते. धर्मभावना त्यातूनच विकसित होण्यास प्रोत्साहन मिळते. नितीमूल्यांचे जतन होऊन व्यक्ती सद्वर्तनी बनते. हा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतो. जातीमुळे धर्मरक्षण झालेले दिसून येते.

**२) रक्त शुद्धी :**

जातीचा आंतर्विवाह हा नियम आहे. त्याचे कठोरतेने पालन केले जाते. आंतर्विवाहामुळे रक्तशुद्धी राहते व सुप्रजानिर्मिती होते.

**३) व्यावसायिक कौशल्य :**

जातीने आपले व्यावसायिक कौशल्य सुरक्षित ठेवले. व्यवसाय निश्चितीमुळे आत्मसात केलेले नैपुण्य पुढील पिढीला दिले जात असे. एकच व्यवसाय व समान नियमांमुळे जातीमध्ये एकरुपता कायम असते.

जातीसंस्थेच्या कार्यामुळे व्यक्तीला मानसिक सुरक्षितता लाभत असे. तसेच समाजाला स्थैर्य प्राप्त झालेले दिसून येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) जातीची विविध कार्ये सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**५.२.६ जातीसंस्थेचे दोष :**

जातीसंस्थेने सामाजिक व आर्थिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली आहे. परंतु बदलत्या काळानुसार जातीव्यवस्थेच्या स्वरुपात परिवर्तन होऊन काही दोष निर्माण झाले ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) आर्थिक दृष्टिने निर्माण झालेले दोष :**

**अ) कार्यतत्परतेला बाधक :**

प्रत्येक जातीचा निश्चित असा व्यवसाय असल्यामुळे जाती बाह्य व्यवसाय कौशल्य असून देखील लोकांना जातीबाह्य व्यवसाय करता येत नसत. म्हणजेच जातीच्या नियमांमुळे

munotes.in

कार्यतत्परतेला बाधा निर्मान होत असे. व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नसणे हा जातीसंस्थेचा मुख्य दोष होता.

**ब) आर्थिक विकासाला बाधक :**

जातीव्यवस्थेमुळे सामुहिक विकासाची भावना लोप पावते. आपल्या जातीच्या विकास कसा होईल याचाच विचार प्रत्येक जात करते. कनिष्ठ जातीच्या आर्थिक विकासात जातीबाधा आणतात. त्यामुळे सहकारी संस्थांचा फायदा देखील उच्च जातीनांच झालेला दिसतो.

**ब) आर्थिक विकासाला बाधक :**

जातीव्यवस्थेमुळे सामुहिक विकासाची भावना लोप पावते. आपल्या जातीचा विकास कसा होईल याचाच विचार प्रत्येक जात करते. कनिष्ठ जातीच्या आर्थिक विकासात वरिष्ठ जाती बाधा आणतात. त्यामुळे सहकारी संस्थांचा फायदा देखील उच्च जातीनांच झालेला दिसतो.

**क) धन व कष्टाची विषम वाटणी:**

जातीव्यवस्थेमुळे कनिष्ठ जातींवर अधिक कष्टाची कामे लादली गेली. कष्टांच्या मानाने मोबदला मात्र कमी मिळते असे. याउलट वरिष्ठ जातींना कमी श्रमाची व अधिक अर्थोत्पादनाची कामे मिळाली. उदा. पुरोहित, शास्त्री, प्रवचनकार इ. कनिष्ठ जातींवर उच्च जाती वर्चस्व गाजवितात व त्यांचे शोषण करतात. शुद्र जातींना त्यामुळे आपल्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता देखील करता येत नसे. अशा रितीने ग्रामीण समाजात संपत्ती व श्रमाचे असमान वितरण झालेले दिसून येते.

**२) सामाजिक दोष :**

**अ) उच्च जातीचे वर्चस्व :**

जातीव्यवस्थेचा विघातक परिणाम म्हणजे उच्च जाती. ह्या कनिष्ठ जातीवर वर्चस्व गाजवू लागल्या. कनिष्ठ जातीचे शोषण करु लागल्या. उच्च जातीय लोक कनिष्ठांकडून बिगारची कामे करवून घेत. त्यांच्यामध्ये भ्रष्टाचार, व्यभिचार, आर्थिक शोषण ह्या प्रवृत्ती त्यामुळे वाढल्या गेल्या.

**ब) अस्पृश्यतेत वाढ :**

जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यतेची निर्मिती झाली. हिंदू धर्मातील काही जाती स्वतःला श्रेष्ठ समजतात व इतर जातींना कनिष्ठ समजतात. वरिष्ठ जातींनी अस्पृश्य जातींवर अनेक निर्बंध घालून त्यांच्यावर अत्याचार केले. त्यामुळे हिंदू धर्मात स्पृश्य-अस्पृश्य अशी तटबंदी पडून तणाव व संघर्ष निर्माण झाले.

**क) व्यक्तीत्वाचा असंतुलित विकास :**

प्रत्येक व्यक्तीच्या क्रियेवर जाती व्यवस्थेचे नियंत्रण असल्यामुळे व्यक्तीला जातीचेच व्यवसाय करावे लागत. तसेच विवाह, शिक्षण याबाबतीत देखील जातीची नियंत्रणे होती. ही नियंत्रणे व्यक्तीत्व विकासाला व कर्तृत्वाला बाधा निर्माण करीत त्यामुळे व्यक्तीत्वाचा संतुलित विकास होऊ शकत नव्हता.

munotes.in

**ड) धर्मांतराला प्रोत्साहन :**

जातीव्यवस्थेमुळे कनिष्ठ जातींना अधिकारापासून वंचित रहावे लागले. वरिष्ठ जाती कनिष्ठ जातींवर अन्याय करुन त्यांचे शोषण करु लागल्या. जातीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंड, शिक्षा, जाती-बहिष्कृत अशी कठोर कारवाई करण्यात येऊ लागली. त्यामुळे कनिष्ठ जातीची धर्मावरील श्रद्धा उडाली.

**इ) सामाजिक ऐक्याला बाधक :**

जातीसंस्थेमुळे समाजाची अनेक गटांमध्ये विभागणी झाली. श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव निर्माण झाला. वरिष्ठ जाती कनिष्ठ जातीचा तिरस्कार करु लागल्या. कनिष्ठांमध्ये वरिष्ठांबद्दल द्वेषाची भावना निर्माण झाली. त्यामुळे सामाजिक ऐक्याला बाधा निर्माण झाली.

**३) इतर सर्वसामान्य दोष :**

**अ) सांस्कृतिक ऐक्याला घातक :**

जातीसंस्थेमुळे श्रेष्ठ-कनिष्ठ अशी भावना निर्माण झाली. त्यामुळे एकमेकांमध्ये देवाण घेवाण करणे अशक्य बनले. प्रत्येक जात स्वत:ला इतरांपासून वेगळी समजत असल्यामुळे एकमेकांचा द्वेष करु लागली. त्यामुळे संपूर्ण समाजाची संस्कृती एकच असून देखील सांस्कृतिमध्ये एकता कायम राहू शकली नाही.

**ब) राष्ट्रीयत्वाला बाधक :**

जातीसंस्थेतील विभेदीकरणामुळे जाती अंतर्गत संघर्ष वाढले. कनिष्ठांमध्ये द्वेषाची भावना निर्माण झाली. या जाती न्याय हक्काबाबत जागरुक होऊन आपल्या हक्काची मागणी करु लागल्या. राजकीय नेतृत्वाने विभेदी भावनांना खत पाणी घातले. ही गोष्ट राष्ट्रीय ऐक्याला मारक ठरली.

**क) जातीवाद :**

जातीच्या विषमतापुर्ण व्यवहारामुळे जातीद्वेषात वाढ झाली. एकाच जातीत घनिष्ठता वाढली व दुसऱ्या जाती विषयी द्वेष वाढला न्याय अन्यायाचा विचार न करता आपल्या जाती बंधना विषयीचा जागृत झालेला दुराग्रह पक्षपात आज हा जातीवाद सर्वत्र निर्माण झाला.

जातीसंस्थेमध्ये वरील काही दोष आढळून येतात. आधुनिक काळात जाती बाह्यार्थाने नष्ट होत असल्यातरी जातीवाद मात्र वाढत असलेले दिसून येतात.

अशाप्रकारचे जातीचे दोष आहेत. जातीव्यवस्थेमुळे अनेक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) जातीचे दोष सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

### ५.२.७ जातीचे बदलते स्वरुप :

आधुनिक काळात भारतातील जातीव्यवस्थेत महत्त्वाचे परिवर्तन झालेले दिसते. पूर्वी लोकांमध्ये जातीय दुरी होती. ती आता कमी झालेली दिसते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राज्यघटना, आधुनिकीकरण, विज्ञान व तंत्रज्ञानामुळे जातीसंस्थेत परिवर्तन झालेले दिसते. जातींमध्ये गतीशीलता वाढत गेली. जातीव्यवस्थेतील परिवर्तनाचे स्वरुप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) व्यवसायात परिवर्तन :**

पूर्वी प्रत्येक जातीचा एक निश्चित व परंपरागत व्यवसाय असे आणि तोच व्यवसाय करणे हे व्यक्तीला बंधनकारक असे. जातीच्या या वैशिष्ट्यांमध्ये आता बरेच परिवर्तन झाले आहे. शिक्षण प्रसार, आधुनिकीकरण, सामाजिक चळवळी व कायदे या कारणांमुळे लोकांच्या व्यवसायांमध्ये परिवर्तन झाले. व्यक्तीने आपल्याच जातीचा व्यवसाय करावा असे बंधन आता राहिले नाही. प्रत्येक व्यक्तीला आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे व्यवसायांमध्ये गतिशीलता आलेली दिसते.

**२) खानपान संबंधांमध्ये परिवर्तन :**

पूर्वी जातीचे खानपान विषयक निर्बंध कठीण होते. कोणत्या जातीच्या लोकांनी कोणत्या जातीच्या लोकांकडून अन्न घ्यावे किंवा घेऊ नये याबाबतीत कडक निर्बंध होते. त्या नियमांचे पालन काटेकोरपणे केले जात असे. परंतु आधुनिक काळात खानपान संबंधांमध्ये बरेच परिवर्तन झाले आहे. सार्वजनिक कार्यक्रम, सण-समारंभ प्रसंगी विविध जाती-धर्माचे लोक एकत्र येतात व स्नेहभोजन करतात. त्यावरुन खानपान संबंधांच्या प्रतिबंधामध्ये शिथीलता आलेली दिसते.

**३) सामाजिक संबंधांमध्ये परिवर्तन :**

भारतीय समाजात सामाजिक संबंधांचे निर्धारण हे जातीच्या आधारवर होत असत. आता मात्र लोकांच्या सामाजिक संबंधांमध्ये आणि व्यवहारात बरेच परिर्वन झाले आहे. शिक्षण, व्यवसाय, स्वभाव यांना प्राधान्य आहे. एक व्यक्ती म्हणून इतर जातीच्या लोकांशी सामाजिक संबंध प्रस्थापित केले जातात.

**४) धार्मिक निर्बंधात शिथीलता :**

प्रत्येक जातीच्या संदर्भात धर्माचे नियम वेगवेगळे होते. जातीनुसार धार्मिक विधी हे ठरले जात असत. जातीव्यवस्थेने कनिष्ठ जातीवर धार्मिक निर्बंध लादले होते. शिक्षण-प्रसार,

कायदे व सामाजिक चळवळी इत्यादी घटकांमुळे धार्मिक बंधनात शिथीलता आली. त्यामुळे जातींमध्ये परिवर्तन झाले.

**५) जात पंचायतीचे कमी महत्त्व :**

प्रत्येक जातीच्या जात पंचायतीचे आपल्या जातीतील लोकांवर नियंत्रण असे. जात पंचायतीचे कडक निर्बंध असत. आधुनिक काळात मात्र जात पंचायतीचे महत्त्व कमी झाले आहे. शासनाच्या विविध कायद्यांद्वारे व्यक्तीचे वर्तन नियंत्रित केले जाते. त्यामुळे जात पंचायतीचे महत्त्व संपुष्टात आले आहे.

**६) जातीपेक्षा व्यक्तीगत गुणांना महत्त्व :**

पूर्वी व्यक्तीगत गुणांना महत्त्व नसे कारण जातीव्यवस्थेत व्यक्तीचे महत्त्व हे त्याच्या जातीच्या दर्जावरुन ठरले जात असे. आधुनिक काळात मात्र हे जातीचे महत्त्व कमी होऊन व्यक्तीगत गुणांना महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षण, बुद्धीमत्ता, योग्यता इत्यादी गुणांच्या आधारे व्यक्तीला समाजात सर्वोच्य दर्जा प्राप्त करता येतो. जातीपेक्षा व्यक्तीगत गुणांना प्राधान्य प्राप्त झाल्यामुळे जातीचे महत्त्व कमी होत आहे.

**७) विवाह संस्थेत परिवर्तन :**

जातीला आंतर्विवाही गट जर असे संबोधले जात असे व्यक्तीने जातीतच विवाह करावा असे निर्बंध जातीसंस्थेचे होते. मात्र शिक्षण प्रसार, आधुनिकीकरण, व्यक्तीस्वातंत्र्य इत्यादी घटकांमुळे व्यक्तींच्या विचारप्रवृत्तीमध्ये परिवर्तन होऊ लागले. त्यामुळे आंतरजातीय विवाहाला आता फारसा विरोध होताना दिसुन येत नाही. आंतरजातीय विवाहामुळे जातीयतेची बंधने सैल झालेली दिसुन येतात.

वरील मुद्यांच्या आधारे जातीच्या परिवर्तनाचे स्वरुप लक्षात येते. श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या भावनेत बदल, व्यवसायात परिवर्तन, सामाजिक संबंधात परिवर्तन, धार्मिक निर्बंधात शिथीलता, जातपंचायतीचे कमी महत्त्व इत्यादी कारणांमुळे जातीसंस्थेत परिवर्तन होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) जातीचे बदलते स्वरुप स्पष्ट करा.

**५.२.८ जातीसंस्थेतील परिवर्तन :**

जातीव्यवस्थेचा विषमता हाच पाया आहे. विषमतेवर आधारित असणारी ही व्यवस्था बदलविण्यासाठी प्राचीन काळापासून प्रयत्न करण्यात आले. जातीव्यवस्थेला सर्वप्रथम विरोध

अडीच हजार वर्षापूर्वी गौतम बुद्ध यांनी केला. सर्व जातीतील लोक सारखे आहेत असा प्रसार अनेक संतांनी केला. ब्रिटिश राजवटीत जातीव्यवस्थेत परिवर्तन घडून येऊ लागले. राजाराममोहन रॉय, केशवचंद्र सेन इ. सुधारकांनी जातीव्यवस्थेला विरोध केला. समाज क्रांतीचे अग्रदूत ज्योतीबा फुलेंनी जाती प्रथेला हादरा देत शुद्रांच्या मुलींची पहिली शाळा पुणे येथे सुरु केली. विषमतेवर आधारित जातीव्यवस्था व अस्पृश्यता नष्ट करण्याच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यघटना तयार झाली आणि जातीव्यवस्थेत खऱ्या अर्थाने परिवर्तन झाले.

जाती व्यवस्थेतील परिवर्तनास पुढील घटक जबाबदार आहेत.

**१) शिक्षण प्रसार :**

आधुनिक काळात शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध झाली. शिक्षणामुळे संकुचित विचार नष्ट झाले. आधुनिक विचारसरणीचा स्वीकार केला. शैक्षणिक संस्थांमध्ये अनेक जातींची मुले शिक्षण घेऊ लागली. त्यामुळे जातीभेदाची भावना नष्ट झाली. शिक्षणाच्या आधारावर व्यक्तीचा समाजातील दर्जा ठरु लागला. शासकीय कार्यालयात विविध जातींचे लोक एकत्रित काम करु लागले. त्यांच्यात परस्पारिक संबंध निर्माण झाले. सामाजिक, धार्मिक व कौटुंबिक कार्यात सर्व जाती धर्माचे लोक सहभागी होऊ लागले. शिक्षण प्रसारामुळे लोकांमधील जातीभेद पाळण्याची वृत्ती कमी झाली.

**२) वैज्ञानिक विचारसरणी :**

शिक्षण प्रसाराबरोबरच वैज्ञानिक ज्ञानाचा आणि वस्तुनिष्ठ विचारांचा प्रसार होऊ लागला. शिक्षणामुळे लोकांची पारंपरिक विचारसरणी बदलू लागली. विविध जातींच्या लोकांशी व्यवहार केल्यामुळे कोणताही अधर्म होत नाही याची जाणीव लोकांना झाली. सामाजिक प्रगती करण्यासाठी अंधश्रद्धा, रुढी परंपरांना छेद देणे आवश्यक आहे. याची जाणीव लोकांना झाली. त्यामुळे जातीसंस्थेत परिवर्तन झालेले दिसते.

**३) औद्योगिकीकरण :**

जातीव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यामध्ये औद्योगिकरणाचे विशेष योगदान आहे. कारखाने, शासकीय कार्यालये याठिकाणी सर्व जातीचे लोक काम करु लागले. आधुनिक काळात जाती प्रथेनुसार श्रमविभाजन करणे अशक्य होते. स्पर्शास्पर्श, खानपानाचे निर्बंध पाळणे त्याठिकाणी शक्य नव्हते. त्यामुळे जातीसंस्थेत परिवर्तन होत गेले.

**४) शहरीकरण :**

भारतामध्ये औद्योगिकरणाची प्रक्रिया ब्रिटिश राजवटीमध्ये सुरु झाली. औद्योगिकरणामुळे पारंपरिक व्यवसाय बंद पडले. औद्योगिकरणामुळे मोठ्या शहरांची निर्मिती झाली. रोजगारासाठी लोक शहरामध्ये स्थलांतर करु लागले. जागेअभावी शहरांमध्ये लोक दाटीवाटीने वास्तव करु लागले. त्याठिकाणी जातीची बंधने पाळणे अशक्य बनले. बाजार व्यवस्था, मनोरंजनाची साधने, हॉटेल्स यामुळे खानपान निर्बंध नष्ट झाले व जातीसंस्थेत परिवर्तन झाले.

**५) नविन व्यवसाय :** पूर्वी भारतात फक्त पारंपरिक व्यवसाय होते व हे व्यवसाय जातीच्या आधारावर निश्चित होते. परंतु औद्योगिकरणामुळे नवीन व्यवसाय निर्माण झाले. त्याठिकाणी जातीपेक्षा गुण-कौशल्य यांना महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे जातीव्यवस्थेत परिवर्तन झाले.

**६) कायदे आणि शासकीय प्रयत्न :**

जातीव्यवस्थेचा सामाजिक जीवनावर परिणाम झालेला दिसून येतो. सामाजिक विषमता दूर करण्यासाठी भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकशाही पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार झाली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांचा स्वीकार करण्यात आला. व्यक्तीला व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यामुळे खऱ्या अर्थाने जातीसंस्थेत परिवर्तन झाले.

जातीसंस्थेतील परिवर्तनास वरील घटक जबाबदार असलेले दिसून येतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) जाती संस्थेच्या परिवर्तनास कोणते घटक जबाबदार आहेत ते सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**५.२.९ जातीचे सिद्धांत :**

फार प्राचीन काळापासून जातीसंस्था भारतीय समाज जीवनात एक समर्थ शक्ती म्हणून उभी आहे. विविध आधारावर विविध समाजात मानवाचे वेगवेगळे समूह पडले आहेत. मानवी समाज हा विविध जातींमध्ये विभागला गेला आहे. सामाजिक स्तरीकरणात जातीव्यवस्थेचे महत्त्वाचे स्थान आहे. जातीव्यवस्थेने भारतीय समाजाचे सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवन व्यापले आहे. जातीसंस्थेच्या वैशिष्ट्यांमुळे देशी-विदेशी विचारवंत जाती संस्थेचा साकल्याने व सखोल अभ्यास करु लागले. भारतीय समाजाचे जीवन व्यापून टाकणाऱ्या जातीसंस्थेच्या उत्पत्ती संबंधी काही सिद्धांत मांडले आहेत. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे -

**१) पारंपारिक सिद्धांत :**

पारंपारिक सिद्धांत हा जातीच्या उत्पत्तीसंबंधी विचार मांडणारा सर्वात प्राचीन असा सिद्धांत आहे. या संबंधीच्या कल्पना प्राचीन वाङ्मयात आढळून येतात. वेद, उपनिषदे, महाकाव्ये व स्मृती वाङ्मयात त्याचे स्पष्टीकरण आढळते. पुरुष-सुक्तात या संबंधीचा सर्वात प्राचीन आधार आढळतो. पुरुष-सुक्ताच्या ऋचेनुसार ब्रह्माच्या मुखातून ब्राह्मण, बाहूमधून क्षत्रिय, जांघेमधून वैश्य व पायापासून शुद्र निर्माण झाले. त्याप्रमाणे प्रत्येक जातीची कामे ठरली गेली. ब्राह्मण हे ब्रह्माच्या मुखातून उत्पन्न झाल्यामुळे त्यांचे कार्य अध्ययन व अध्यापन ठरले. मुख हे

munotes.in

वाणीचे निदर्शक असल्यामुळे ब्राह्मणांचे कार्य वाणी अभिमुख झाले. क्षत्रियांची उत्पत्ती बाहुमधून झाल्यामुळे व बाहू हे शक्तीचे प्रतीक असल्यामुळे समाज-संरक्षणाचे कार्य क्षत्रियांचे ठरले. वैश्यांची उत्पत्ती ही जांघेमधून झाली. जांघांचा संबंध उत्पत्ताशी येत असल्यामुळे शेती व व्यापार उदीम ही वैश्यांची कामे ठरली. शुद्रांची उत्पत्ती ही ब्रह्मांच्या चरणापासून झाल्याने या सर्वांची सेवा करणे हे शुद्रांचे काम निश्चित करण्यात आले. मनुस्मृतीमध्ये देखील जातीच्या उत्पत्तीसंबंधी हेच विचार आहेत. या चारही वर्णांच्या संकरातून इतर जाती निर्माण झाल्या आहेत.

उच्चवर्णीय पुरुष निम्नवर्णीय स्त्रीशी आणि निम्नवर्णीय पुरुष उच्चवर्णीय स्त्रीशी जेव्हा विवाह करतो तेव्हा अनुक्रमे अनुलोम व प्रतिलोम विवाह असे म्हटले जाते. अशा विवाहातूनच अनेक जाती निर्माण झाल्या आहेत असे मनुचे मत आहे. या सिद्धांताला धर्माचा आधार असलेला दिसून येतो. महाभारतात वर्णभेदाच्या निर्मितीचे कारण हे मानवाच्या अंगभूत गुणात आहे असे मानले आहे.

**२) राजनैतिक सिद्धांत :**

प्राचीन युरोपमधील निरीक्षकांच्या मते, समाजाची विभागणी करुन त्यात आपले वर्चस्व सतत टिकून राहण्यासाठी जात ही पुरोहितांची चातुर्यपूर्ण अशी राजनैतिक योजना होती. जातीला धर्माचा आधार देऊन त्यांनी ही प्रथा जनतेत रुजविली. डॉ. धुर्ये यांच्या मते इंडो-आर्यन संस्कृतीतील ब्राह्मणांची निर्मिती म्हणजे भारतातील जाती व्यवस्था होय. गंगा-यमुनेच्या खोऱ्यात जातीसंस्थेचे संगोपन झाले व येथुनच देशाच्या इतर भागात जातीसंस्थेचा प्रसार झाला.

**३) धार्मिक सिद्धांत :**

धर्माचा जातीव्यवस्थेच्या निर्मितीमध्ये मोठा वाटा आहे. समाजामध्ये धर्माला जसे महत्त्वाचे स्थान लाभले, तसे धार्मिक विधीचे पालन करणाऱ्या व्यक्तींची एक जातच समाजामध्ये निर्माण झाली. हाकार्ट आणि सेनार्ट यांनी या सिद्धांताबाबत पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे.

**१) होकार्ट :**

होकार्ट यांच्यामते जातीयतेची निर्मिती धार्मिक प्रथा व कर्मकांडामुळे झाली. कर्मकांडाच्या सोयीसाठीच चातुर्वण्य निर्माण करण्यात आले. प्रत्येक वर्णाचे काम ठरविण्यात आले. प्रत्येक सेवेची समाजातील निर्मिती आर्थिक नसून धार्मिक आहे असा सिद्धांत त्यांनी मांडला. व्यवसायाप्रमाणे समाजामध्ये व्यक्तीचा दर्जा ठरु लागला. समाजात धार्मिक कृत्ये महत्त्वाची असल्यामुळे त्या धार्मिक कृत्यांच्या आधारे श्रेष्ठ व कनिष्ठ अशा जाती पवित्र-अपवित्रतेप्रमाणे निर्माण झाल्या.

**२) सेनार्ट सिद्धांत :**

जाती संस्थेच्या निर्मितीचे कारण धर्म आहे असा सिद्धांत सेनार्ट यांनी मांडला. आर्यांच्या आक्रमणाने भारतात मिश्र समूह निर्माण झाले. त्यामुळे गटाची शुद्धता या कल्पना निर्माण झाल्या व त्या बळावल्या गेल्या. खानपान संबंधीचे नियम आणि निषिद्धे यांना देखील महत्त्व दिले आहे. एकाच कुलदेवतेला मानणारे लोक एकत्र येऊन त्यांचा समूह निर्माण झाला.

munotes.in

**४) व्यावसायिक सिद्धांत :**

नेसफिल्ड यांनी हा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते जातीच्या उत्पत्तीचे मुख्य कारण धर्म, वंश हे नसून व्यवसाय हेच आहे. व्यवसायाच्या स्वरुपावरुन व दर्जावरुन व्यक्तीची जात ठरते. जात हा व्यावसायिक गट असून त्याचा आधार शुद्ध व्यवसाय आहे.

**५) वांशिक सिद्धांत :**

सर हर्बर्ट रिस्ले यांनी हा सिद्धांत मांडला आहे. वांशिक भिन्नता हे जाती संस्थेच्या निर्मितीचे मुख्य कारण आहे. आर्यांनी भारतावर आक्रमण केल्यानंतर प्रतिलोम विवाहाला मान्यता न देता अनुलोम विवाहाचे तत्त्व स्वीकारले. या विवाहामुळे वंश संस्कार शक्य झाला व भिन्न-भिन्न जाती निर्माण झाल्या.

**६) उत्क्रांतीवादी सिद्धांत :**

डेंझिल इबेंट्सन यांनी हा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते जाती संस्थेची निर्मिती उत्क्रांती तत्वाप्रमाणेच झाली आहे. आदिम, पुरोहित, धर्म व व्यावसायिक संच हे तीन घटक जातीसंस्थेच्या निर्मितीस जबाबदार आहेत. मानवाच्या अस्थिर जीवनाला शेती व्यवसायाने स्थिरत्व प्राप्त झाले. अनेक व्यवसाय अस्तित्वात आले. या व्यवसायातूनच जाती निर्माण झाल्या.

**७) डॉ. इरावती कर्वे यांचा सिद्धांत :**

जातिनिर्मिती विषयक वर नमूद केलेले सिद्धांत डॉ. इरावती कर्वेना मान्य नाहीत. त्यांच्या मते वर्ण चा अर्थ रंग नसून वर्ग असा आहे. वर्गाची क्रमपद्धती ही वर्ण या शब्दाने प्राचीन वाङ्मयात सुचविली होती.

भारतात आर्यांनी जातीव्यवस्था आणली नाही तर त्यापूर्वी पासून भारतात जाती पद्धती अस्तित्वात होती. जाती-निर्मिती हे आर्यांचे कार्य नव्हते असे मत डॉ. इरावती कर्वे यांचे आहे. एका विशिष्ट भूभागावर मोठ्या जमातींचा विस्तार झाल्यानंतर या जमातीचे काही भाग स्वतंत्रपणे वास्तव्य करु लागले. हेच विविध गट म्हणजे जाती होय.

वरील सर्व सिद्धांताचा विचार करता असे म्हणता येईल की, जाती संस्थेची उत्पत्ती कोणत्याही एका कारणाने झाली नाही तर त्याला विविध घटक जबाबदार आहेत. उपरिनिदिष्ट सिद्धांतांनी मांडलेल्या अनेक कारणांचा एकत्रित परिपाक म्हणजेच जातींची निर्मिती होय.

**आपली प्रगती तपासा :**

१) जातीचे सिद्धांत सांगा.

munotes.in

## ५.३ ग्रामीण वर्गरचना - वर्गव्यवस्था

**प्रस्तावना :**

मानवी समाजाच्या आरंभापासून तर आतापर्यंत सर्व समाजांमध्ये सामाजिक स्तरीकरण आढळून येते. प्रत्येक काळातील समाज आणि संस्कृतीमध्ये सामाजिक वर्ग आणि सामाजिक स्तरीकरण कोणत्या ना कोणत्या स्वरुपात अस्तित्वात राहिले आहे. भारतातील श्रेणी रचना जातीवर अधिष्ठित होती. हे जातीची व्याख्या व लक्षणे यांचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येते. अशा तऱ्हेची समाजरचना जगामध्ये अनन्यसाधारण आहे. याचा अर्थ जगातील इतर समाजामध्ये किंवा संस्कृतीमध्ये श्रेणीरचना आढळत नाही असे नाही. उलट जगातल्या कोणत्याच संस्कृतीमध्ये वर्गहिन समाज आढळून येत नाही. खुले स्तरीकरण आणि बंद स्तरीकरण असे सामाजिक स्तरीकरणाचे दोन प्रकार आहेत. वर्ण, जाती, समाज श्रेणी यांचा समावेश बंद स्तरीकरणात वर्गव्यवस्थेद्वारे होणारे विभाजन खुल्या स्तरीकरणात समाविष्ट होते.

व्यक्तीचे सामाजिक स्थान कर्तुत्वाद्वारे निश्चित होण्यास प्रारंभ झाला तो १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील औद्योगिकरणामुळे व्यक्तीची शिक्षण, उत्पन्न, सामाजिक प्रतिष्ठा यामुळे ओळख निर्माण झाली. त्यामुळे खऱ्या अर्थाने वर्गव्यवस्थेला प्रारंभ झाला. समान दर्जा असणाऱ्या व्यक्तींच्या समुदायाला वर्ग असे म्हणतात. त्यांच्या वर्तनपद्धती, जीवनमूल्ये व आर्थिक स्थितीमध्ये समानता असते. इतर वर्गांशी तुलना करता एक वर्ग श्रेष्ठ असतो तर दुसरा वर्ग कनिष्ठ असतो. प्रत्येक वर्ग आपली प्रतिष्ठा व दर्जा अबाधित राखण्याचा प्रयत्न करतो.

### ५.३.१ वर्गव्यवस्थेचा इतिहास :

प्राचीन काळापासून सामाजिक स्थिती, संपत्ती, वय, लिंग, सामर्थ्य, रक्तसंबंध, कार्य व्यवसाय इ. विविध आधारांवर वर्गाचे अस्तित्व मानवी समाजात आढळते. वर्गव्यवस्थेत काही वर्ग इतर वर्गाच्या तुलनेत कनिष्ठ असतात. तर काही वर्ग श्रेष्ठ असतात. जगात कुठेही वर्गहिन समाज नाही. प्रत्येक देशात वर्गव्यवस्थेचे स्वरुप वेगळे असू शकते. असे मत प्लेटो, ॲरिस्टॉटल, किंग्जले डेव्हिस यांनी मांडले आहे. समाजाची विभिन्न स्तरात विभागणी हे समाजाचे सार्वत्रिक वैशिष्ट्य आहे. मग तो मानवी समाज प्रगत असो वा अप्रगत, मोठा किंवा लहान, भांडवलशाही किंवा साम्यवादी. सर्व प्रकारच्या समाजात सामाजिक स्तरीकरण आढळून येते.

वर्गव्यवस्था हे नागरी समुदायाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे किंबहुना वर्गव्यवस्था ही नागरी समुदायाची उत्पत्ती आहे. औद्योगिकरण, नागरीकरण, व्यवसायाची विविधता आणि विशिष्टता इ. घटकांच्या परिणामातून वर्गाची उत्पत्ती झाली असे मानले जाते. शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे वर्गव्यवस्थेचा विकास झाला असला तरी शहरांची उत्पत्ती होण्याआधीच ग्रामीण समुदाय व आदिवासी समुदायात कोणत्या ना कोणत्या स्वरुपात वर्गव्यवस्था होती हे देखील वास्तव्य आहे. प्राचीन काळापासूनच राजा, प्रजा, जहांगीरदार, जमिनदार, सामंत, शेतकरी आणि मजूर इ. वर्ग अस्तित्वात होते. याचाच अर्थ शहरी समुदायाच्या पूर्वी वर्गव्यवस्था अस्तित्वात होती. परंतु त्यावेळी मात्र वर्गव्यवस्था तीव्र नव्हती.

ग्रामीण समुदायात देखील वर्गभेद आढळून येतो. ग्रामीण समुदायामधील काही लोकांना विशेष सोयी आणि अधिकार होते. काही लोकांना जास्त प्रमाणात सेवा मिळायची तर काही लोक त्यापासून वंचित राहत असत. अशाप्रकारे ग्रामीण समुदायात वेगवेगळे वर्ग होते ग्रामीण समुदाय हा वर्गांमध्ये विभागला गेला होता. त्याला ग्रामीण सामाजिक वर्ग असे म्हटले जात असे. ग्रामीण समाजातील वर्गव्यवस्थेचा आधार भूमी हा होता. जे लोक अधिक भूमी आणि पशू या संपत्तीचे मालक होते, त्यांना ग्रामीण समाजात इतर लोकांच्या तुलनेने विशेष अधिकार, आदर व दर्जा प्राप्त होत असे. हे लोक आपल्या विशिष्ट अधिकारांच्या आधारावर कार्य आणि व्यवसायांचे विभाजन करीत असत आणि आपल्याकडे फक्त देखरेख करण्याचे काम ठेवत असत. इतर व्यवसाय क्षमता आणि साधनांच्या अनुसारे वितरीत केल्या जात असत. अशा प्रकारची वर्गव्यवस्था ग्रामीण समाजामध्ये आढळून येत असे. या वर्ग वैशिष्ट्यांवर आधारित समाजातील दर्जा निश्चित होत असे. वेगवेगळ्या वर्गातील लोकांच्या व्यवहारांमध्ये फरक असे. आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक स्थितीमध्ये अंतर निर्माण होत असे. त्याचबरोबर मनोवृत्ती व विचारसरणीमध्ये देखील फरक निर्माण होत असे.

ग्रामीण समाजात सामाजिक स्तरीकरण हे जातीव्यवस्थेवर आधारित आहे. त्याचा मुख्य आधार जन्म अर्थात जैविक आहे. जैविक आधारावर प्राचीन समुदाय हा विविध जातींमध्ये विभागला गेला. त्यामुळे विषमता निर्माण झाली. जातीव्यवस्थेमधील विषमता हा वर्गव्यवस्थेच्या विषमतेपेक्षा अमानवी स्वरुपाची होती. वर्गव्यवस्था ही संपत्ती व सत्ता या आधारावर निर्माण झाली. वर्गव्यवस्था ही खुली असते. म्हणजेच व्यक्तीला एका वर्गातून दुसऱ्या वर्गात जाण्याची संधी असते. लोक अधिक परिश्रम करुन आपला सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे कनिष्ठ व्यक्ती उच्च दर्जा प्राप्त करु शकते. यालाच सामाजिक गतिशीलता असे म्हणतात. व्यक्ती आपल्या बुद्धीमत्ता व कौशल्याच्या आधारे खालच्या वर्गातून वरच्या वर्गाकडे जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१) वर्गव्यवस्थेचा इतिहास सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**५.३.२ वर्गाचे स्वरुप :**

भारतातील ग्रामीण समाजात जाती व्यवस्थेचा विशेष प्रभाव आहे. जातीच्या आधारावर वेगवेगळे श्रेष्ठ-कनिष्ठ असे स्तर आढळतात. जातीव्यवस्थेप्रमाणेच ग्रामीण समाजात वर्गव्यवस्था आहे. ग्रामीण समाजातील सर्व लोकांचा व्यवसाय आणि दर्जा सारखा नाही तसेच प्रत्येक व्यक्तीकडे सारख्या प्रमाणात जमीन नाही त्यामुळे व्यवसाय, जमिन आणि संपत्तीच्या आधारावर समाजात वेगवेगळे वर्ग आढळतात.

munotes.in

वर्गाचे स्वरुप स्पष्ट होण्यासाठी समाजशास्त्रज्ञांनी काही व्याख्या केल्या आहेत. त्या आधारावर वर्ग आणि जाती यांमधील फरकही स्पष्ट होतो.

**१) मॅकआयव्हर व पेज :**

"सामाजिक वर्ग म्हणजे सामाजिक दर्जामुळे एक समुदायाचा भाग इतर भागापासून स्पष्टपणे अलग दिसणारा असा समुदायाचा भाग होय."

**२) ऑगबर्न निमकॉफ :**

"एक सामाजिक वर्ग सामाजिक स्थानाच्या दृष्टिने अन्य वर्गाहून श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असणे हे सामाजिक वर्गाचे मूलभूत वैशिष्ट आहे."

**३) गिन्सबर्ग :**

"वर्ग हा अशा व्यक्तींचा समूह आहे की, जो समान वंशपरंपरा, संपत्ती, शिक्षण व व्यवसाय यांच्या आधारावर समान जीवनपद्धती, समान विचारसरणी, समान भावना व प्रवृत्ती जपत असतो व या अगर यातील काही कारणाने हे सदस्य परस्परांना समान भूमिकेवरुन भेटत असतात व परस्परांना आपल्या एकाच समूहाचे सदस्य मानतात."

वरील व्याख्येवरुन वर्गव्यवस्थेची काही वैशिष्ट्ये स्पष्ट होतात ती पुढीलप्रमाणे -

**५.३.३ वर्गव्यवस्थेची वैशिष्ट्ये :**

**१) श्रेष्ठ-कनिष्ठपणाची भावना :**

प्रत्येक समाजामध्ये अनेक गट आढळतात व समान आर्थिक दर्जा असणाऱ्या व्यक्ती एका वर्गात असतात व इतर वर्गाशी तुलना करुन स्वतःला श्रेष्ठ किंवा कनिष्ठ समजतात. वर्ग व्यवस्थेमध्ये श्रेष्ठ कनिष्ठ ही भावना प्रखर स्वरुपाची असते. त्या भावनेमुळे ते इतर वर्गापासून वेगळे असतात. प्रत्येक वर्गाला आपल्या वर्गाबद्दल आत्मीयता वाटते. श्रेष्ठ वर्गातील लोकांचे स्थान उच्च असते तर कनिष्ठ वर्गातील लोकांचे स्थान दुय्यम असते.

**२) वर्गाचा आधार जन्म नसतो :**

व्यक्तीची जात ही जन्माने ठरत असली तरी वर्ग ठरविताना व्यक्तीचा जन्म विचारात घेतला जात नाही. वर्ग व्यवस्थेत स्वकर्तृत्व महत्त्वाचे असल्यामुळे व्यक्तीचा सामाजिक दर्जा जन्मावर अवलंबून नसतो. स्वकर्तृत्वामुळे व्यक्ती आपला समावेश उच्च वर्गात करु शकते. वर्ग व्यवस्थेत गतिशीलता आहे. त्यामुळे कनिष्ठ वर्गातील व्यक्ती उच्च वर्गात स्वपराक्रमाने प्रवेश मिळवू शकते. तर उच्च वर्गातील अपात्र व्यक्ती कनिष्ठ वर्गात कालांतराने समाविष्ट होऊ शकते. याचाच अर्थ गावाचा आधार हा जन्म नसून सामाजिक दर्जा व अर्थ हा आहे.

**३) वर्गाची अस्थिरता :**

गिन्सबर्ग यांच्यामते वर्गव्यवस्थेचा मुख्य आधार शिक्षण, व्यवसाय व संपत्ती आहे. हे घटक परिवर्तनशील असल्यामुळे वर्ग हा अस्थिर स्वरुपाचा समूह आहे. कारण व्यक्तीची शैक्षणिक व आर्थिक स्थिती बदलू शकते. त्यामुळे व्यक्तीच्या दर्जात बदल होऊ शकतो. श्रीमंत व्यक्ती अतिश्रीमंत किंवा गरीब वर्गात समाविष्ट होऊ शकते तर गरीब व्यक्ती मध्यम किंवा श्रीमंत वर्गात समाविष्ट होऊ शकते.

munotes.in

**४) मर्यादित सामाजिक संबंध :**

वर्ग व्यवस्थेमध्ये श्रेष्ठ व कनिष्ठ ही भावना असते. व्यक्तीला आपल्या वर्गाबद्दल आत्मीयतेची भावना असते. त्यामुळे त्यांचे इतर वर्गांशी मर्यादित सामाजिक संबंध असतात. सामाजिक व सांस्कृतिक उत्सव प्रसंगी आपल्याच वर्गातील लोकांना निमंत्रित केले जाते. आपण इतर वर्गाहून वेगळे आहोत ही जाणीव त्यामागे असते.

**५) निश्चित अशी जीवनपद्धती :**

एकाच वर्गातील लोकांची आर्थिक पातळी समान असते. त्यामुळे त्यांच्या जीवनपद्धतीमध्ये सारखेपणा दिसून येतो. उदा. निवासस्थान, पोशाख, आहार, मुलांचे शिक्षण, आवड-निवड, विवाह संबंध, व्यावसायिक संबंध हे आपल्याच वर्गात दृढ करण्याचा प्रयत्न व्यक्ती करते. त्यामुळे वर्गाच्या जीवनपद्धतीला एक निश्चित असा आकार प्राप्त झालेला असतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) वर्गव्यवस्थेची वैशिष्ट्ये सांगा.

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

**५.३.४ जाती व वर्ग यातील भेद :**

जाती व वर्ग यांच्यातील भेद हा त्यांच्या व्याख्यांवरुन स्पष्ट होतो. ज्या सामाजिक वर्गाचा आधार जन्म असतो त्याला जाती असे म्हणतात. तर समान दर्जा असणाऱ्या गटाला वर्ग असे म्हणतात. जाती व वर्ग हे सामाजिक स्तरीकरणाचे दोन प्रकार आहेत. या दोन्ही प्रकारातच काही मूलभूत भेद आहेत.

**१)** भारतीय समाजाचे जातीचे हे वैशिष्ट्य असून जातीचे सदस्यत्व जन्माने प्राप्त होते. तर वर्गव्यवस्था सार्वत्रिक दिसून येते व स्वकर्तृत्वाने वर्गाचे सभासदस्य प्राप्त होते.

**२)** व्यक्तीला जात बदलता येत नाही. जाती आर्थिक आधारावर नसून त्या धार्मिक बाजूंशी निगडित असतात तर वर्ग बदलण्याचे स्वातंत्र्य सर्वांना असते. वर्ग हा आर्थिक आधारावर असून धर्मनिरपेक्ष असे त्याचे स्वरुप असते.

**३)** जातीमध्ये आंतर्विवाहाचे व परंपरागत व्यवसायाचे बंधन असते. तर वर्गामध्ये विवाह विषयक बंधने आढळून येत नाहीत. तसेच व्यक्ती आपल्या आवडीनुसार व्यवसाय निवड करु शकते.

munotes.in

४) जातीमध्ये रोटी-बेटी व्यवहारांवर निर्बंध असून गतिशीलतेचा अभाव हे जातीचे वैशिष्ट आहे. तर वर्गामध्ये रोटी-बेटी व्यवहारांवर बंधने नसतात तर गतिशीलता हे वर्गव्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे.

५) जाती पंचायतीचे जातीवर पूर्ण नियंत्रण असते. जातीचा समावेश बंद स्तरीकरणामध्ये होतो. तर वर्ग व्यवस्थेत अशी यंत्रणा नसते. वर्ग व्यवस्थेचा समावेश खुल्या स्तरीकरणात होतो.

वरील फरक लक्षात घेतल्यानंतर हे स्पष्ट होते की, जात ही जन्माने ठरते तर वर्गामध्ये स्वपराक्रमास महत्त्व असते. जाती संस्थेची वर उल्लेखिलेली वैशिष्ट्ये हळूहळू नामशेष होत आहेत. त्यामुळे जाती संस्थेचे हे सर्व आधार नाहिसे होत असलेले दिसून येतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) जाती व वर्ग यातील भेद सांगा.

___

___

___

___

___

**५.३.५ ग्रामीण समाजातील वर्गव्यवस्था :**

भारतीय ग्रामीण समाजावर जातीचे नियंत्रण असले तरी हा समाज वर्गहिन नाही. ग्रामीण समाजामध्ये सर्वांचा दर्जा व आर्थिक स्थिती सारखी नसते. तसेच प्रत्येक वर्गाची जीवनशैली देखील भिन्न स्वरुपाची असलेली दिसून येते. रितीरिवाज, रुढी परंपरा यामध्ये वेगळेपणा दिसतो. त्याला अनुसरुनच प्रत्येकाचे सामाजिक वर्तन घडते. ग्रामीण समाजात परस्परांमधील संबंध हे श्रेष्ठ-कनिष्ठतेवर अवलंबून असतात. कारण एकाच वर्गातील लोकांची जीवनपद्धती, परंपरा, दुःखे समान असतात त्यामुळे आपल्या वर्गाबद्दल त्यांच्यामध्ये तीव्र जाणीव दिसून येते.

ब्रिटिश राजवटीपूर्वी भारतीय ग्रामीण समाज हा स्वयंपूर्ण व स्वायत्त होता. जातीसंस्था व कुटुंब संस्थेचा प्रभाव ग्रामीण समाजावर होता. ब्रिटिश राजवटीमध्ये स्वयंपूर्णता नष्ट झाली. औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण समाजामध्ये देखील परिवर्तन होऊ लागले. सामाजिक स्तरीकरणावर परिणाम झाला नाही. ग्रामीण जनतेचा मुख्य व्यवसाय शेतीच राहिला. त्यामुळे ग्रामीण समाजातील वर्गव्यवस्था शेती व्यवसायाशी संबंधित असलेली दिसून येते. वरिष्ठ, मध्यम व कनिष्ठ अशी वर्गरचना शहरी समाजाप्रमाणेच ग्रामीण समाजामध्ये आढळून येते. परंतु ग्रामीण स्तरीकरण हे शेतीवर आधारित आहे. ग्रामीण समाजात खालील वर्ग आढळून येतात.

**१) जमीनदार व मोठे शेतकरी :**

जमिनदार व मोठे शेतकरी यांचा समावेश ग्रामीण समाजातील श्रीमंत व सधन वर्गात होतो. एकूण ग्रामीण लोकसंख्येच्या साधारण एक टक्का असलेल्या या वर्गाकडे पन्नास एकरहून अधिक शेतजमीन असते त्यांचा राजकारण अर्थकारण व समाजकारणावर प्रभाव असतो. सत्ता,

संपत्ती व प्रतिष्ठा या वर्गाला प्राप्त झालेली असते. त्यांची जीवनशैली आधुनिक असून शहरी सुख सोयींचा वापर जास्त आढळतो. या वर्गातील काही जमीनदार हे मध्य युगातील वतनदार व इनामदारांचे वारस आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सरकारने जमिन मालकीतील विषमता दूर करण्यासाठी जमिन विषयक कायदे केले. परंतु कायद्यातील त्रुटीमुळे जमीनमालक स्वतःकडे जास्त जमीन ठेवण्यात यशस्वी झाले. त्यामुळे आर्थिक विषमता निर्माण झालेली दिसून येते.

**२) सावकार व व्यापारी :**

खेड्यांमध्ये सावकार व व्यापारी यांचा वर्ग प्रभावी असतो. सावकार शेतकऱ्यांना तारण जमिनीच्या बदल्यात कर्ज देतो. मागताच क्षणी सावकार कर्ज देत असल्यामुळे ग्रामीण जनता या कर्जपुरवठ्यावर अवलंबून असते. कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याला मालाची विक्री सावकाराला करावी लागते. कमी किंमतीमध्ये मालाची खरेदी सावकार करतो व जास्त किंमतीमध्ये स्वतः मालाची विक्री करतो. त्यामुळे सावकार श्रीमंत व शेतकरी गरीब असे चित्र ग्रामीण भागात दिसते. व्यापारी शेतकऱ्यांना हंगामापूर्वी उचल स्वरुपात कर्ज देतो. त्यामुळे हंगाम हाती आल्यानंतर व्यापारी जी किंमत देईल त्या किंमतीला शेतकऱ्यांना मालाची विक्री व्यापाऱ्यांना करावी लागते. ग्रामीण समाजात पतपुरवठा करणारे सावकार व व्यापारी या नवीन वर्गाचे वर्चस्व दिसून येते. ग्रामीण समाजातील आर्थिकदृष्ट्या संपन्न असा हा वर्ग आहे.

**३) मध्यम शेतकरी :**

पाच एकरापेक्षा अधिक जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश या वर्गात होतो. भारतात जवळपास ५० ते ५५ टक्के शेतकरी या वर्गातील आहे. कोरडवाहू जमिनीचे प्रमाण जास्त असल्याने शेती किफायतशीर ठरत नाही. मोठ्या शेतकऱ्यांपेक्षा कमी उत्पन्न या शेतकऱ्यांचे असते. शेतीमधून फार मोठा आर्थिक लाभ होत नसला तरी सर्वसाधारणपणे त्यांची स्थिती बऱ्यापैकी असते.

**४) छोटे शेतकरी :**

पाच एकरापेक्षा कमी जमिन असणाऱ्या शेतकऱ्याच्या समावेश या वर्गात होतो. बहुतांशी शेतकऱ्यांकडे एक एकर किंवा त्यापेक्षा कमी जमीन असते. कमी जमिनीतून अल्प उत्पन्न मिळते. त्यामुळे सावकाराकडून कर्ज घेण्याशिवाय त्यांना पर्याय नसतो. या वर्गातील लोकांचा आर्थिक दर्जा सामान्य असतो. बऱ्याचवेळा दुसऱ्यांच्या शेतात त्यांना मजुरीसाठी जावे लागते. शेती व्यवसायात त्यांचे स्थान व दर्जा निकृष्टच असतो. कर्ज-बाजारीपणाचे प्रमाण या वर्गात जास्त दिसून येते.

**५) भूमिहीन शेतमजूर :**

भूमिहीन शेतमजूर हा ग्रामीण वर्गव्यवस्थेतील शेवटचा वर्ग आहे. ग्रामीण भागात भूमिहीन शेतमजूरांचा मोठा वर्ग आहे. स्वतःच्या मालकीची जमिन नसल्यामुळे हे लोक दुसऱ्यांच्या शेतावर काम करतात. काही शेतमजूर तात्पुरत्या स्वरुपाचे असतात. तर काही शेतमजूर कायमचे जमिनदाराकडे काम करतात. कायमच्या शेतमजुरांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असते. त्यांचे स्थान जवळपास वेठबिगारासारखे असते. तात्पुरत्या स्वरुपाच्या शेतमजुरांची आर्थिक स्थिती हलाखीची असली तरी कायमच्या शेतमजुरांपेक्षा बरी असते. त्यांना रोजगाराचे स्वातंत्र्य असते. ग्रामीण भागातील शेतमजुरांना हंगामातच काम उपलब्ध असते. जर दुष्काळ अवर्षण अशा नैसर्गिक आपत्ती आल्या तर हंगामात देखील काम मिळत नाही. त्यामुळे त्यांची स्थिती फारच

munotes.in

खालावते त्यांचे समाजातील स्थान अगदी सामान्य व खालच्या दर्जाचे असते. अज्ञान, निरक्षरता, बेकारी, उपासमारीने पिडलेला असा हा भूमिहीन शेतमजुरांचा वर्ग ग्रामीण भागात आढळतो.

ग्रामीण भागातील वर्ग व्यवस्थेचे वर वर्णन केले असले तरी आर्थिक स्तरावर आधारित स्तररचनेपेक्षा जातीव्यवस्थेवर आधारित स्तर रचना ग्रामीण भागात प्रभावशाली आहे. वर्ग व्यवस्थेवर देखील जाती व्यवस्थेचा प्रभाव आढळतो. त्यामुळे उच्च वर्गातील लोक हे उच्च जातीय आहेत तर कनिष्ठ वर्गातील लोक हे कनिष्ठ जातीमधील असलेले दिसतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) ग्रामीण समाजातील वर्गव्यवस्था स्पष्ट करा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**५.३.६ वर्गाचे बदलते परिमाण :**

भारतातील सामाजिक स्तरीकरण हे जातीच्या आधारावर झालेले आहे आणि वर्गव्यवस्था विशेष महत्त्वपूर्ण मानली जात नसे. मात्र औद्योगिकरण, नागरीकरण, शिक्षण, नवीन कायदे इत्यादी घटकांमुळे भारतात विशेषतः नागरी समाजात वर्गव्यवस्था अस्तित्वात आली आहे. भारतातील वर्ग व्यवस्था आणि पाश्चिमात्य देशातील वर्गव्यवस्था यात फरक आहे. ग्रामीण भागात जमीनदार, सावकारांचा वर्ग असे वर्ग आढळतात. परंतु या वर्गाचा आधार आर्थिक घटकांपेक्षा जाती हा आढळतो. शहरी भागात वर्गाची संख्या जास्त आहे. व्यावसायिक अधिकारी कर्मचारी, राजकारणी, मजुर असे वर्ग आढळतात.

वर्गव्यवस्थेमध्ये देखील हळुहळु परिवर्तन होऊ लागले आहे. ग्रामीण भागामध्ये देखील शहरी भागासारखा वर्गव्यवस्थेचा प्रभाव काही प्रमाणात पडलेला दिसून येतो. वर्गाचे बदलते स्वरुप पुढील मुद्यांवरुन स्पष्ट होते.

**१) संपादित गुणांना महत्त्व :**

आधुनिक काळात व्यक्तींच्या अनुवंशिक गुणांपेक्षा शिक्षण, कर्तृत्व, योग्यता, क्षमता या गुणांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण व शहरी भागात संपादित गुणांना महत्त्व आल्यामुळे वर्गीय भावना निर्माण होत नाही उलट त्या व्यक्तीच्या वर्गीय भावनेमध्ये परिवर्तन घडून येते.

**२) वर्गीय जाणीवांचा अभाव :**

भारतीय समाजातील लोकांमध्ये जातीय जाणीवा आहेत मात्र वर्गीय जाणीव आढळून येत नाही. प्रत्येक वर्गाची मुल्ये, अभिवृत्ती, वर्तन प्रतिमान हे सारखे आढळून येत नाहीत त्यामुळे वर्ग जाणीव निर्माण झालेली दिसत नाही.

### ३) विशिष्ट जीवनशैली नाही :

प्रत्येक वर्गातील रितीरिवाज, रुढी, परंपरा, व्यवहार आणि तत्वज्ञान इत्यादी गोष्टी विशिष्ट पद्धतीच्या असतात. परंतु भारतातील वर्गाच जीवनशैली विशिष्ट प्रकारची नाही. प्रत्येक वर्गाची जीवनशैली ही जवळपास सारखी आहे. त्यामध्ये विशेष फरक आढळत नाही.

### ४) प्रत्येक वर्गाचा आधार आर्थिक नाही :

भारतीय समाजात विविध वर्ग आहेत. वरचेवर पाहता प्रत्येक वर्गाचा आधार हा आर्थिक वाटत असला तरी तो आर्थिक आधार नसतो. काही वर्गाची निर्मिती ही विशिष्ट उद्देशाने झालेली असते. त्या उद्देशांची पूर्ती झाली की त्या वर्गाचे किंवा संघटनेचे महत्त्व फारसे राहत नाही.

### ५) विविध संघटना :

भारतामध्ये विविध संघटना आढळून येतात. या संघटनांची निर्मिती ही विशिष्ट उद्दिष्टांनी झालेली दिसते. उद्दिष्ट संपले की त्या संघटनेचे महत्त्व राहत नाही. काही संघटना ह्या नाममात्र असतात. या संघटनांचा उद्देश संघर्षाचा लढा उभारणे हा नसतो.

### ६) कायद्यामुळे संघर्षावर नियंत्रण :

वेगवेगळ्या समुहातील लोकांच्या हिताचे संरक्षण होण्यासाठी शासनाने कायदे केले आहेत. या कायद्यामुळे समुहाच्या हिताचे संरक्षण होते. त्यामुळे देशात संघर्षाची भावना आढळून येत नाही. मजुर आणि मालक यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला तर त्यांच्यात शासनामार्फत तडजोड केली जाते.

### ७) मानवाधिकार :

आधुनिक काळात मानवाधिकारांना विशेष महत्त्व आहे. कुणालाही शोषणाचे अधिकार देण्यात आले नाहीत. जर व्यक्तीचे कुणी आर्थिक, सामाजिक, मानसिक शोषण करीत असेल तर संबंधित व्यक्ती मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करु शकते व संबंधित व्यक्तीला न्याय मिळतो.

अशाप्रकारे भारतीय समाजात व्यवस्थेचे स्वरुप बदलत चाललेले दिसून येते. भारतात पाश्चिमात्य समाजातील वर्गव्यवस्थेप्रमाणे व्यवस्था नाही. शासनाने विविध कायदे केल्यामुळे समाजातील विविध समूहांच्या हिताचे संरक्षण झाले आहे.

### आपली प्रगती तपासा :

१) भारतातील वर्गव्यवस्थेचे बदलते परिणाम स्पष्ट करा.

munotes.in

## ५.४ सारांश

जातीव्यवस्था हा ग्रामीण समाजाचा मुलाधार आहे. वर्णव्यवस्थेचे रुपांतर जातीव्यवस्थेत झाल्यावर समाजाची अनेक गटांमध्ये विभागणी झाली. श्रेष्ठ-कनिष्ठ अशी श्रेणी रचना जातीसंस्थेमुळे अस्तित्वात आली. वरिष्ठ जातींनी कनिष्ठ जातींचे शोषण केले असे असले तरी जातीसंस्थेचे सामाजिक व आर्थिक कार्य महत्त्वपूर्ण होते. समाज जीवनाला आकार हा जातीसंस्थेमुळेच आला आहे. औद्योगिकरण व शिक्षण प्रसारामुळे जातीसंस्थेत परिवर्तन होऊ लागले आहे. जाती संस्थेचे बंदिस्त स्तरीकरण कालबाह्य ठरत असले तरी जातीसंस्था ग्रामीण भागात आज देखील महत्त्वपूर्ण आहेत.

वर्गव्यवस्था हा मुक्त स्तरीकरणाचा प्रकार आहे. वर्गव्यवस्थेमुळे समाज वरिष्ठ, मध्यम व कनिष्ठ वर्गात विभागला जातो. वर्गरचना ही आर्थिक, स्थिती, शिक्षण व कर्तृत्वावर आधारित आहे. वर्ग हा गतीशिल असतो त्यामुळे सामाजिक अभिसरणास वाव असतो. कनिष्ठ वर्गातील व्यक्ती स्वकर्तृत्वाने वरिष्ठ वर्गात जाऊ शकतात. ग्रामीण भागात शेती व्यवसायानुसार वर्गव्यवस्था आढळते. मोठे शेतकरी, मध्यम शेतकरी, लहान शेतकरी, भूमीहीन शेतमजूर अशी वर्गव्यवस्था आढळते परंतु ही वर्गव्यवस्था जातीशी निगडीत असलेली दिसून येते. जातीव्यवस्था व वर्गव्यवस्था यामध्ये मूलभूत स्वरुपाचे भेद आहेत जातीसंस्था बंदिस्त व वर्ग मुक्त स्तरीकरणावर आधारित आहे.

munotes.in

## ५.५ स्वाध्याय

१) जातीची संकल्पना व स्वरुप स्पष्ट करा.
२) जातीचे बदलते स्वरुप सांगा.
३) जातीविषयक सिद्धांतावर, चर्चा करा.
४) जातीची विविध कार्ये सांगा.
५) ग्रामीण समाजातील वर्गव्यवस्था स्पष्ट करा.
६) टिपा लिहा.
   १) जातीचे महत्त्व
   २) जातीचे दोष
   ३) वर्गाचा इतिहास
   ४) वर्गाचे बदलते परिणाम

## ५.६ संदर्भ सूची

१) आगलावे प्रदिप : भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन - नागपुर
२) बोबडे प्रकाश : भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक, श्री. मंगेश प्रकाशन - नागपुर
३) नाडगोंडे गुरुनाथ : ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टीनेन्टल प्रकाशन - पुणे
४) आगलावे प्रदिप : ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन - नागपुर

❖❖❖❖

# घटक -६

## सामाजिक परिवर्तन

- डॉ. क्लेमेन्टाईन ज्यु. रिबेलो

**घटक संरचना :**

६.० पाठाची उद्धिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ सामाजिक परिवर्तनाच्या व्याख्या
६.३ सामाजिक परिवर्तनाचे स्वरुप
६.४ सामाजिक परिवर्तनास कारणीभूत घटक
६.५ सामाजिक परिवर्तनातील अडथळे
६.६ सारांश
६.७ स्वाध्याय

## ६.० उद्धिष्ट्ये (Objectives)

- सामाजिक बदलाची संकल्पना समजून घेणे.
- सामाजिक बदलास कारणीभूत असणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
- सामाजिक बदलातील अडथळ्यांचा अभ्यास करणे.

## ६.१ प्रस्तावना (Introduction)

मानवी समाजाचा इतिहास हेच सांगतो की, मानवी समाज हा सतत बदलत असतो. नित्य परिवर्तन हा मानवी समाजाचा जणू स्थायीभाव आहे. जणुकाही समाज जीवन हे एखाद्या नदीप्रमाणे लहान लहान वळणे घेत पुढे पुढे जात असते. आपल्या गरजेप्रमाणे / आवश्यकतेप्रमाणे वा सोयीप्रमाणे त्यामध्ये फेरबदल करुन हे बदलणारे समाज जीवन स्विकारले जात असते. मात्र हे लहान लहान बदल पटकन आपल्या लक्षात येत नाहीत. त्यामुळे कित्येक वेळा समाजामध्ये परिवर्तन होत आहे. ह्याची सहज जाणीवही आपल्याला होत नसते. अगदी लहान लहान बदल आपल्यामध्ये चटकन अस्थिरताही निर्माण करीत नाहीत. मात्र ह्याचे प्रमाण वाढले तर मात्र आपल्याला विशिष्ट परिवर्तन होत आहे हे जाणवायला लागते.

त्याचबरोबर समाजात डोळ्यात भरण्याजोगेही बदल घडून येतात. मानवाचे रीतीरिवाज, आचारविचार, रुढी-परंपरा, सामाजिक संस्था, संघटना, इत्यादींमध्येही मोठ्या प्रमाणात अमुलाग्र स्वरुपाचे बदल घडतांना आपणांस दिसतात. ह्या सर्वांचा परिणाम ह्यालाच आपण समाजात बदल होत आहे असे आपण म्हणतो.

## ६.२ समाजपरिवर्तनाच्या व्याख्या

समाज परिवर्तनाच्या विचारवंतांनी केलेल्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**हॅरी जॉन्सन** - "सामाजिक परिवर्तन म्हणजे मूलभूत अर्थाने समाजरचनेतील बदल होय."

**किंग्जले डेव्हीस** - "समाज रचनेत व कार्यात म्हणजेच सामाजिक संघटनेत होणारा बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. "

**गिन्स बर्ग** - "समाजाचा आकार, सामाजिक संघटना प्रकार व समाजातील विविध भागातील संतुलन यात होणाऱ्या बदलाला म्हणजेच समाज व्यवस्थेतील बदलाला सामाजिक परिवर्तन असे म्हणतात."

**मॅक आयव्हर व पेज** - "सामाजिक संबंधातील बदलास सामाजिक परिवर्तन असे म्हणतात."

**के डेव्हीस** - "सामाजिक संघटनात अर्थात समाज संरचना व कार्यात झालेले बदल होय."

**गिलिन आणि गिलीन** - "स्विकृत जीवन प्रणालीतील परिवर्तन म्हणजे सामजिक परिवर्तन होय. मग हे परिवर्तन भौगोलिक परिस्थिती, सांस्कृतिक घटक, लोकसंख्येची रचना किंवा विचारप्रणाली प्रसरण किंवा आविष्कार रीतीने आणलेली असो."

वरील व्याख्यांचा साकल्याने विचार केला असता सामाजिक परिवर्तन म्हणजे -

१) सामाजिक संरचनेत झालेले बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.
२) समाजामध्ये असलेल्या संघटन संबंधातील बदल म्हणजे समाज परिवर्तन होय.
३) समाजाच्या जीवन जगण्याच्या पध्दतीतील बदल म्हणजे समाज परिवर्तन होय.
४) अभिवृध्दी आणि श्रध्दा यातील बदल म्हणजे समाज परिवर्तन होय.

## ६.३ सामाजिक परिवर्तनाचे स्वरुप

समाज हा मानवापासून निर्माण झालेला असल्यामुळे मानवाच्या रितीरिवाज, आचार-विचार, रुढी-परंपरा निर्माण केलेल्या सामाजिक संस्था यांच्या संबंधामध्ये ज्यावेळी बदल घडून येत असतात त्यावेळी समाजाच्या रचनेमध्ये बदल घडून येत असतात. व्यक्तीसमूह यांच्या ज्या समस्या असतात. त्या विविध वैशिष्ट्यपूर्ण व स्थिर स्वरुपाच्या अशा असतात. या अवस्थेला समाजाची रचना असे संबोधिले जाते.

प्राचीन भारतीय समाजामध्ये काळाच्या ओघात समाजाचे स्वरुप व रचनेमध्ये बदल घडून येत आहेत. या बदलामुळे समाज नवे रुप धारण करीत असतो. भारतीय ग्रामीण भागात परंपरागत जुन्या संस्था, जुन्या पध्दती, जुनी मूल्ये अस्तित्वात होती. त्यामध्ये आता बदल झाला असून नवीन संस्था, नवीन मूल्ये व नवीन जीवन पध्दती निर्माण झाल्या आहेत. समाजामध्ये परिवर्तनाची प्रक्रिया सातत्याने चालू आहे. पूर्वीची स्वयंपूर्ण असलेली खेडी आता त्याच स्थितीत राहिली नाहीत. प्रचंड प्रमाणात आज ह्यामध्ये बदल होतांना दिसत आहे.

ब्रिटीश भारतात आल्यावर भारतीय खेड्यांची स्वयंपूर्ण संकल्पना ही मोडकळीस आणण्यास पध्दतशीर प्रयत्न झाले. त्यांनी राबविलेल्या विविध धोरणांमुळे प्रथम नागरी व नंतर ग्रामीण जीवनात अमुलाग्र बदल झाले. त्यामुळे ग्रामीण जीवन तळागाळापासून ढवळून निघाले. आजच्या स्थितीत ग्रामीण भागात अमुलाग्र बदल दिसून येत आहे.

समाज परिवर्तन ही संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी काही मुद्दे सविस्ताराने पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१) सामाजिक संस्थामधील बदल -**

समाज हा अनेक संस्था, संघटना मिळून बनलेला असतो. समाजामध्ये कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था, अर्थसंस्था, संघटना, जातीसंस्था अस्तित्वात असतात. त्याचा प्रभाव समाजावर असतो. या संस्थांमध्ये परिवर्तन घडून आल्याने त्याचा परिणाम कामगारावरती पडत असतो. यातून सामाजिक परिवर्तन होतांना दिसते. उदा. फक्त कुटुंबपध्दतीचा ऱ्हास होवून विभक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात येताना दिसते. जातीसंस्थामधून व्यवसाय निश्चितीमध्ये बदल होताना दिसत आहे. म्हणजेच समाजामध्ये असलेल्या अनेक संघटना एकमेकांशी संबंधित असतात. आणि ह्या संघटनात होणारा बदल हा इतर संस्था संघटनावरतीही होत असतो.

**२) सामाजिक संबंधातील बदल -**

समाजामध्ये व्यक्ती, संस्था, संघटना असतात. याचा मिळून समाज बनलेला असतो. ह्यांचा परस्पर संबंध व्यक्ती व्यक्तीमध्ये, व्यक्ती व समूहामध्ये तसेच समूह समूहामध्ये असतो. अशा सर्वच प्रकारच्या संबंधामध्ये परिवर्तनामध्ये बदल झालेला दिसतो.

**३) सामाजिक मूल्यातील बदल -**

समाजाच्या ऐक्यासाठी मूल्ये ही आवश्यक असतात. मुल्यामुळेच समाज टिकून राहतो. समाजात शांती प्रस्थापित होते. शिस्तबध्द समाज व्यवस्थेमुळे समाजाची प्रगती होत असते. मूल्यामधील होणारे बदल हे समाजाच्या संरचनेतील बदल असतात. मूल्य म्हणजे योग्य-अयोग्य, चांगले-वाईट, चूक-बरोबर हे ठरविण्यासाठी समाजातील लोकांनी मान्य केलेले आदर्श आहेत. मूल्यामध्ये होणारे बदल हे समाजाच्या संरचनेमध्ये बदल घडून आणतात. त्याचा समाजावर दूरगामी परिणाम होतो. समता, न्याय, लोकशाही ह्यासारखी मूल्ये समाजामध्ये मूलगामी परिवर्तन घडवीत असतात.

**४) अभिवृत्ती व श्रध्दांमधील परिवर्तन -**

अभिवृत्ती व श्रध्दा हे दोन घटक मानवी जीवनामध्ये महत्वाची भूमिका पार पाडतात. व्यक्तीचे व्यक्तीमत्व घडविण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. अभिवृत्ती, श्रध्दा व मूल्यात होणारा बदल हा संरचनात्मक काटेकोर परिवर्तन नसले तरी संरचनात्मक बदल घडवून येत असतो. अभिवृत्तीत मूल्यात बदल घडून आला तर भूमिका वर्तनावर त्याचा प्रभाव पडतो. त्याचा परिणाम परात्मतेची भावना अभिव्यक्ती कामगार संघटनावर होवून संस्थात्मक परिवर्तन घडून येवू शकतात.

दर्जा, भूमिका सामाजिक समूह, त्यांचे उपसमूह, सांस्कृतिक मूल्ये, सामाजिक नियमने हे समाजरचनेचे घटक आहेत. त्या घटनांमध्ये होणारे बदल हे सामाजिक परिवर्तन आहे.

मानवाने निर्माण केलेल्या सर्व भौतिक आणि अभौतिक गोष्टींचा समावेश हा संस्कृतीमध्ये होत असतो. ह्याचाच परिणाम संस्कृती बदलात होत असतो. मात्र सांस्कृतिक बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन नव्हे. संस्कृतीचे अनेक घटक आहेत. जे श्रध्दा, मूल्ये, नियमने, ज्ञान यात बदल झाला तरच सामाजिक परिवर्तन घडून येते. सांस्कृतिक परिवर्तन सामाजिक परिवर्तनाला कारणीभूत ठरु शकते.

परिवर्तन हे चांगले किंवा वाईट असू शकते. परिवर्तन ही तटस्थ संकल्पना आहे. सर्वच समाजामध्ये परिवर्तन होत असते. त्याची गती मात्र भिन्न असू शकते. परिवर्तन होत असतांना आपल्या डोळ्यांना दिसत नाही. सामाजिक परिवर्तनाविषयी आपल्याला १०० % भविष्य कथन करता येणार नाही. असे काही अंशी सांगता येऊ शकते. त्याचबरोबर सामाजिक परिवर्तन हे थांबविता येत नाही. ती अपरिहार्य अशा स्वरुपाची बाब आहे. मात्र परिवर्तनाची तुलना करता येणे. तसेच परिवर्तन एक दिशा मात्र असते. ती प्रगतीची किंवा अधोगतीचीही असू शकते.

**आपली प्रगती तपासा.**

१) सामाजिक परिवर्तन म्हणजे काय ?

२) सामाजिक परिवर्तनाचे स्वरुप सांगा.

## ६.४ सामाजिक परिवर्तनास कारणीभूत घटक

समाजामध्ये सातत्याने घडून येणारे परिवर्तनामुळे समाज टिकून राहत असतो. बदलत्या स्थितीला सामारे जात असतो. ही बदलती स्थिती विशिष्ट एकाच कारणामुळे तयार होत नाही. तर ती तयार होण्यास अनेक घटक कारणीभूत ठरतात. ही नेमकी कारणे दाखविणे खूपच गुंतागुंतीचे असते. सामाजिक परिवर्तनाच्या बाबतीत बहुकारणवादी दृष्टीकोन स्विकारावा लागतो. समाजामध्ये घडणारी घटना ही अनेक कारणांनी घडून अलेली असते.

समाजपरिवर्तनाच्या कारणांचा विचार वेगवेगळ्या विचारवंतांनी वेगवेगळा केलेला दिसतो. कार्लमाक्साने आर्थिक कारणांचा, ऑगबर्न तांत्रिक घटकांचा, गिलीन आणि गिलीन यांनी भौगोलिक परिस्थिती, लोकसंख्या रचना, सांस्कृतिक घटक, विचार प्रभावी कारकांचा इत्यादी तर मॅक्सवेबर सांस्कृतिक घटकांचा विचार करतात. सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत ठरणाऱ्या सर्वच घटकांचा सातत्याने अभ्यास करतांना आपणांस तो पुढीलप्रमाणे करता येईल.

ग्रामीण समाजाच्या परिवर्तनाची कारणे

ह्या कारणांचे स्थूलमानाने तीन वर्ग पडतात.

अ) राजकीय कारणे

ब) आर्थिक कारणे

क) सामाजिक व सांस्कृतिक कारणे

ड) चेतन कारणे

इ) अचेतन कारणे

फ) तांत्रिक कारणे

### ६.४.१ राजकीय कारणे :

**१) जमिनीच्या स्वामीत्वासंबंधी कारणे -**

ब्रिटीश राजवटीपूर्वी भारतीय शेतकरी हा आपल्या भूमिका स्वामी होता. पण त्याचे स्वामीत्व ब्रिटीशांनी पध्दतशीरपणे उडवून लावले. शेतकरी व शासन ह्यामध्ये जमीनदार, इनामदार, मालगुजार ह्यांच्या रुपाने एक मध्यस्त वर्ग अस्तित्वात आला, हा वर्ग शेतकऱ्यांकडून महसूल वसूल करु लागला. ह्या वर्गाने शेतकऱ्यांचे शोषण केले. ग्रामीण समाजात शोषक आणि शोषित असे दोन वर्ग निर्माण झाले. ह्या संघर्षातूनच ग्रामीण जीवनातील सामुदायिक ऐक्य नष्ट झाले.

**२) नवी न्यायव्यवस्था -**

पूर्वी खेड्यामध्ये न्यायदान करण्यासाठी ग्रामपंचायती अस्तित्वात होत्या. गावातील न्यायदान गावातच पंचाच्या साह्याने होई. ते गावातील दोन्ही पक्षकारांना मान्य असे. ब्रिटीश राजवटीमध्ये न्यायदानासाठी न्यायप्रशासनाची सुरुवात झाली. गावातील भांडणे सरकारी न्यायालयात जावू लागली. ही भांडणे कायद्याच्या आधारे सोडविली जावू लागली. त्यातून वकील वर्ग तयार झाला. खर्च वाढला, लाचलुचपत, भ्रष्टाचार, भांडणे, गटबाजी ह्यामध्येही वाढ झाली. लोकांच्या मानसिकतेतही बदल झाला.

**३) पंचायतीचे अधिकार -**

पूर्वी ग्रामपंचायतींना जे अधिकार होते ते ब्रिटीश काळात संपुष्टात आले. ग्रामीण जीवनाचा कणा असलेली ग्रामपंचायत नष्ट झाली.

स्वातंत्र्योत्तर काळात पुन्हा पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली. मात्र पंचायत राजयंत्रणेमार्फत विकास योजनांवर अधिक भर दिलेला दिसून येतो. तसेच विकास साधत असतांना ७३ व्या घटनादुरुस्तीने राखीव पद व ग्रामसभा ह्यांना महत्वाचे स्थान दिल्याने गावाकडे पुन्हा एकदा नव्या रुपाने राजकारणामध्ये नवीन रंग येवू लागल्याचे दिसतात. राजकीय जीवन परिवर्तनात पंचायतीचे अधिकार महत्वपूर्ण आहेत.

**४) राजकीय पक्ष -**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात लोकशाही राज्य आले. सर्वांना मतदान हक्क मिळाला. सत्ता काबीज करण्यासाठी भारतात राजकीय पक्षाचे पीक तयार झाले. लोकांत नवे विचार, नवे चैतन्य निर्माण झाले आणि वेगवेगळ्या पक्षांमुळे पक्षांतर्गत कलह व स्पर्धा निर्माण झाली.

## ६.४.२ आर्थिक कारणे

### १) औद्योगिकीकरण -

शेती हा प्रमुख व्यवसाय भारतीयांचा होता. आणि आजही आहे. शेती व संबंधित इतर व्यवसाय हा कुटुंबामार्फत स्वातंत्र्यपूर्व कालखंडात केला जाई. ब्रिटीश कालखंडात औद्योगिकीकरणाला प्रचंड वेग होता. त्यामुळे कारखाना केंद्रित उत्पादनपध्दती अस्तित्वात आली. ह्याचा परिणाम मोठ्या प्रमाणात ग्रामीण जीवनावर झाला. औद्योगिकीकरणामुळे प्रचंड उत्पादन शक्य झाल्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांसाठी उत्पादन हे उत्पादन लक्ष्य राहिले. त्यामुळे गावाकडे असलेली शेती व्यवसाय व बलुतेदारी पध्दतीचा ह्यामध्ये मोठा बदल झाला. औद्योगिकीकरणामुळे जातीव्यवस्थेचा ठराविक व्यवसाय, कामाची अपरिवर्तनीय विभागणी, शेती व इतर हस्त व्यवसाय ह्यामध्ये परिवर्तन घडून आले.

### २) नागरीकरण -

शहरांची प्रचंड वाढ व तेथील झगझगीत जीवनाने खेड्यातील लोकांना भुरळ घातली. जनता शहराकडे धावू लागली. गावे आस पडू लागली. शेतमजुरांच्या शहराकडे ओढ्यामुळे शेतकऱ्यांना शेतात काम करावे लागले. शेतकऱ्यांची मुले कचेरीत बाबू (साहेब) बनण्याची इच्छा व्यक्त करु लागले. शेतीची प्रतिष्ठा कमी होवू लागली. नागरीय लोकांच्या अनुकरणाने ग्रामीण लोकही व्यक्तीवादी, स्वार्थी व स्वयंकेद्रित बनले. शहराच्या संपर्कामुळे खेड्यातही फॅशन वेड, व्यसने, वेश्या व्यवसाय, जुगार, मद्यपान, गुन्हेगारी वृत्तीत वाढ होवू लागली. धार्मिक बंधने सैल झाली. संयुक्त कुटुंब पध्दती नष्ट होवू लागली. खेड्यात विघटन होवू लागले. ग्रामीण जनता नियंत्रणशुन्य बनली.

### ३) दळणवळण व संचार साधनांची वाढ -

दळणवळण व वाहतुकीच्या साधनात वाढ झाल्यामुळे ग्रामीण भाग व नागरी भाग ह्यांचा संपर्क वाढला. रेल्वे, मोटर वगैरे साधनांनी खेडी शहराशी जोडली गेली. टेलीफोन व मोबाईलचाही वापर वाढला. ह्यामुळे व्यापार वाढला. पण त्याच बरोबर प्रत्येक बाबतीत नागरी जीवनाचे अनुकरण करण्याचे प्रमाण वाढून ग्रामीण जीवन पध्दतीत अमुलाग्र बदल झाला.

### ४) व्यापारात वाढ -

औद्योगिकीकरणामुळे व्यापार वाढला, उत्पादन वाढले व उत्पादनाच्या विक्रीसाठी खेड्यांच्या बाजारपेठांचा उपयोग होवू लागला. खेडे व शहर ह्यांचा संपर्क मोठ्या प्रमाणात होवू लागल्याने आर्थिक जीवनात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होवू लागले.

### ५) शासकीय योजना -

तळागाळातील लोकांचा आर्थिक विकास करण्यासाठी शासनाने पंचवार्षिक योजना, पायलट प्रकल्प व इतर विकास योजना मोठ्या प्रमाणात सुरु केल्या. त्याचा परिणाम हा समाज परिवर्तन प्रक्रियेमध्ये होवू लागला.

## ६.४.३ सामाजिक कारणे

ग्रामीण समाजपरिवर्तनात सामाजिक कारण हे महत्वपूर्ण आहे. जातीसंस्था, कुटुंबसंस्था व प्राचीन ग्रामपंचायती ह्यावरती ग्रामीण भागातील समाजव्यवस्था भक्कम पायावर

उभी होती. ब्रिटीश धोरणामुळे ह्या कुटुंबसंस्थेत, जातीसंस्थेमध्ये व ग्रामपंचायत कार्यप्रणालीमध्ये अमुलाग्र बदल होतच राहिले. तसेच सतीप्रथा, बालविवाह, विधवा विवाह, स्त्रियांचे कुटुंबातील व समाजातील स्थान ह्यासारख्या बाबींमध्येही परिवर्तन होवू लागले.

### ६.४.४ सांस्कृतिक कारणे

ग्रामीण समाजपरिवर्तन घडवून आणण्यात सांस्कृतिक व्यवस्थेचा मोठा सहभाग आहे. संस्कृती ही परिवर्तनशीलच असते. सांस्कृतिक मूल्यातील बदल हा कालानुरुप होतच असतो. याचा प्रभाव त्या-त्या काळातील सामाजिक जीवनावर पडत असतो. प्राचीन ग्रामीण जीवनाकडे पाहिल्यास सामुहिक भावना हा ग्रामीण समाजाचा स्थायी भाव असलेला दिसून येतो.

मात्र ब्रिटीश काळात व्यक्तीवादी प्रवृत्तीला प्रोत्साहन देणारी शिक्षणपध्दतीमुळे सामुहिक भावनेवर आधारलेले प्राचीन खेड्यातील सामाजिक जीवन उद्ध्वस्त झाले. पाश्चात्य संस्कृती व शिक्षणाने ग्रामवासियांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलून गेला. आजही तीच स्थिती आहे.

### ६.४.५ चेतन कारणे (Concious Resources)

ग्रामीण समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी जाणून बुजून जे प्रयत्न केले जातात त्यांचा समावेश यात करण्यात येतो. हे प्रयत्न पूर्ण विचार करुन नियोजनबध्दरित्या केले जातात. ज्या तऱ्हेचा बदल अपेक्षित आहे, त्या दिशेने या प्रयत्नांची वाटचाल होत असते. अशा तऱ्हेचे प्रयत्न खालील पध्दतीचे आहेत.

#### १) अनुनयात्मक पध्दती - (Resuasive Method)

या पध्दतीत जीवनाच्या सर्व क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रचाराचे माध्यम वापरले जाते. ग्रामीण समाजाची पुर्नबांधणी सर्वांगदृष्टीने होण्यासाठी विविध सुधारणा ग्रावासियांच्या गळी उतरविण्यासाठी प्रयत्न केले जातात. उदा. दारुबंदी, संततीनियमन, साक्षरता, अधिक धान्य पिकवा मोहिम, रासायनिक खतांचा वापर, स्वच्छता अभियान, वगैरे, ग्रामीण पुर्नरचनेसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याचे काम या प्रचाराने साध्य केले जाते.

#### २) प्रात्यक्षिक पध्दती - (Demonstration Method)

ह्या पध्दतीत प्रचार तंत्राच्या वापराबरोबर प्रात्यक्षिकावर जास्त भर असतो. ग्रामीण समाज जीवनात परिणामकारक व प्रभावीपणे कार्य करण्यास हे तंत्र यशस्वी होतांना दिसत आहे. उत्तम बी-बियाणे, चांगली जनावरे, मशागतीच्या विविध पध्दती व तंत्रे महिला बचत गटांची उत्पादनासाठी प्रोत्साहन शैक्षणिक व आरोग्य केंद्रे गावात उभी करुन शिक्षण व स्वच्छता यांचा प्रसार केला जातो.

#### ३) अनिवार्य पध्दती - (Compulsory Method)

या पध्दतीत लोकांच्या इच्छेला मान न देता काही बाबी सक्तीच्या केल्या जातात. शासन काही बाबतीत पुढाकार घेवून आवश्यक ते कायदे करुन परिवर्तन घडवून आणते. सतीपध्दती, बालविवाह पध्दती, विधवा विषयक कायदा, अस्पृश्यतेसंबंधी कायदा ग्रामीण समाज परिवर्तन करण्याचे जोरकस प्रयत्न शासकीय पातळीवरुन चालू आहेत.

### ४) सामाजिक दबाव पध्दती - (Method of Socoal Pressure)

राज्यकर्त्यावर अगर संबंधित व्यक्तीवर सामाजिक दबाव आणून अपेक्षित परिवर्तन घडवून आणले जाते. मोर्चा, सामुहिक सत्याग्रह, उपोषण, हरताळ, दहशत ह्याचा अवलंब केला जातो. समाजातील वाईट प्रवृतीविरुध्द समाज एकत्र येवून ह्या पध्दतीचा अवलंब करुन ती वाईट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला जातो.

### ५) संपर्क व शैक्षणिक पध्दती - (Contact and Educational Method)

संपर्क क्षेत्र मोठ्या प्रमाणात विकसीत झाल्यामुळे गावातील लोकांच्या आचार-विचार, पोशाख, जीवनविषयक दृष्टिकोनातअमुलाग्र बदल घडून येत आहे.

ग्रामीण भागात शाळा, महाविद्यालये ह्यांच्या स्थापनेमुळे लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोना विकसित होत आहे. भारतीय ग्रामीण भागात होणारे हे परिवर्तन निश्चित स्वागतार्ह आहे.

### ६.४.६ अचेतन कारणे (Unconscious Method)

ह्यामध्ये अशा घटकांचा समावेश होतो. जे घटक अत्यंत नैसर्गिक अगर स्वाभाविक आहेत. हे बदल आपोआप घडून येत असतात. यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात नाहीत.

### १) नैसर्गिक अगर भैगोलिक परिस्थिती -

भौतिक पर्यावरणात होत असलेले बदल मानवी जीवनावर सतत परिणाम करीत असतात. पूर, भूकंप, दुष्काळ, वादळ, ज्वालामुखी ह्यामुळे आकस्मिक स्वरुपाचे बदल घडून येत असतात. अशी स्थिती निर्माण झाली किंवा वारंवार होत असेल. त्यावेळी मनुष्य स्वभावाप्रमाणे या बदलत्या परिस्थितीनुसार समाज जुळवून घेत असतो. दुष्काळ स्थितीत पाझर तलाव बांधणे, ताली बांधणे, विहिर खोदणे, पाण्यचा वापर योग्य पध्दतीने करणे, अर्थजनासाठी शहराकडे स्थलांतर करणे. वगैरे.

### ६.४.७ तांत्रिक कारणे

मानव आपले जीवन सुखावह होण्यासाठी विविध नवनवीन साधनांचा शोध लावत असतो. मोटारगाडी, रेडिओ, टि.व्ही, मोबाईल, इंटरनेट, आरोग्यशास्त्रातील प्रगती, अद्यावत हॉस्पीटल्स, औद्योगिकीकरण, शेतीतील अभियांत्रिकी, विविध प्रकारचे तंत्रज्ञान, यंत्रज्ञान, यंत्रमानव वगैरे ह्यातून अपल्याला तांत्रिक प्रगतीची प्रचिती येते. ह्या सर्व बाबींमुळे भारतीय ग्रामीण समाजात झपाट्याने बदल घडून येत आहेत. ह्यामुळे केवळ आर्थिक प्रगती साध्या झाली नाही तर मूल्ये व आचार यामध्येही परिवर्तन होत असल्याचे दिसते.

वरील सर्व मुद्यांच्या साहाय्याने परिवर्तन कारणीभूत ठरलेले घटक स्पष्ट करता येतील. तसेच समाजातील प्रभावशाली व्यक्तीमत्वे सुध्दा समाज परिवर्तन प्रक्रियेत महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. जागतिक पातळीवर कार्लमार्क्स, महात्मा गांधी, बेंजामीन फ्रँक्लीन, भारताचा विचार करता महात्मा गांधी, राजाराम मोहनरॉय, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज ह्यांची समाज परिवर्तनात महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. विशिष्ट सामाजिक स्थितीमुळे व्यक्तीमत्वात बदल घडतो. त्यामुळे त्या व्यक्तीचे व्यक्तित्व समाजपरिवर्तनात महत्वपूर्ण भूमिका पार पाडते.

munotes.in

**आपली प्रगती तपासा.**

१) समाज परिवर्तनातील राजकीय कारणे सांगा.

२) समाज परिवर्तनातील आर्थिक कारणे सांगा.

३) समाज परिवर्तनातील चेतन कारणे सांगा.

## ६.५ सामाजिक परिवर्तनातील अडथळे

सामाजिक परिवर्तन ही सतत चालू असलेली प्रक्रिया आहे. कोणताही समाज हा परिवर्तनशील असतोच. तो त्यांचा स्थायीभाव आहे. समाज परिवर्तनास जेवढे जास्त घटक अनुकूल असतात. तेवढे समाज परिवर्तन लवकर घडून येते. प्रतिकूल घटकांचे प्रमाण जास्त असल्यास समाज परिवर्तनाचा वेग हा मंद असतो. समाज परिवर्तनाची प्रक्रिया मंद गतीने होण्यास किंवा समाज परिवर्तनामध्ये अडथळे जे येतात. त्या घटकांचा थोडक्यात परामर्श पुढीलप्रमाणे.

### १) ग्रामवासियांची मनोवृत्ती परिवर्तनवादी नाही.

भारतीयांचे मन हे सनातनी व परंपरावादी आहे. परंपरेने चालत आलेले आचार-विचार, रुढी-परंपरा यामधील बदल भारतीयांना रुचत नाहीत. त्यातल्या त्यात ग्रामवासीय हे विशिष्ट परिस्थितीमुळे अधिक धार्मिक व रुढीप्रिय आहेत. ग्रामवासीय पारलौकिक सुखाला जास्त महत्व देत असल्यामुळे भौतिक परिवर्तनाला जास्त महत्व देत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागात अपेक्षित वेग परिवर्तनास मिळत नाही. म्हणजेच जोपर्यंत ग्रामवासियांच्या मनोवृत्तीत बदल होत नाही. तोपर्यंत ग्रामीण परिवर्तनास अपोक्षित वेग प्राप्त होणार नाही.

### २) बुध्दीवादाचा अस्विकार -

भारतीय आपल्या नित्य जीवनात बुध्दीवादाचा स्विकार करीत नाहीत. त्यामुळे परिवर्तन प्रक्रियेची चिकित्साच ते करु शकत नाहीत. ठेविले अनंते तैसेचि राहावे ! या विचाराने ग्रमवासियांना जणू झपाटले आहे. त्यामुळे आजसुध्दा ग्रामीण लोक विकास कार्य वा परिवर्तन कार्यात अपेक्षित सहभाग घेत नाही. वा तटस्थेने ते पाहातात. प्रवाह पतित व परंपराप्रिय ग्रामवासियांच्यामार्फत शिक्षणाचे लोण नेवून त्यांना विज्ञानवादी बनविल्याविना या बदलाचे स्वागत ग्रामवासीय करु शकणार नाहीत.

### ३) ग्रामीण दारिद्रय

सामाजिक परिवर्तन मोठा अडथळा म्हणजे ग्रामीण दारिद्र्ये आहे. शेतकऱ्यांकडे असणारी अपुरी जमीन क्षेत्र, भूमीहिन शेतमजुरांची संख्या, पारंपारिक पध्दतीने व्यवसाय करणारे

कारागिर ह्यासारखे घटक पैशाअभावी आपल्या व्यवसायात प्रगती करु शकत नाही. प्रमुख व्यवसाय करतांना जोड व्यवसायाचे महत्त्व जरी कळत असले तरी पैशाअभावी नवीन व्यवसाय करण्यास त्यांना शक्य नाही. आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात असल्यामुळे परिवर्तन कार्यक्रमाला अनुकूल वातावरण निर्माण होत नाही.

### ४) सामाजिक संस्थाचे प्राबल्य

ग्रामीण समाज आजही पारंपारिक पगड्यांतून मुक्त झालेला नाही. जातीसंस्था, कुटुंबसंस्था आजही आपले प्रभुत्व टिकवून आहेत. ग्रामीण पुर्नरचनेत सामाजिक संस्थाच्या परिवर्तनाला महत्व देणे अगत्याचे आहे.

### ५) आत्मकेंद्री मन -

सामाजिक परिवर्तनाला खरा अडथळा भारतीय मनाचाच आहे. साऱ्या क्रियांचा व विचारांचा केंद्रबिंदू व्यक्ती होती समाज नाही. सारे विचार हे स्वत:पुरतेच मर्यादित होते. पाप-पुण्य, मोक्षप्राप्ती, पुर्नजन्म हे सर्व विचार स्वत:पुरतेच Deepe विज्ञानाचा प्रसार मोठ्या प्रमाणात होत असला तरी ही आत्मकेंद्री वृत्ती कमी झाली आहे. असे म्हणता येणार नाही. P. Spratt यांनी Hindu Culture and Personality या ग्रंथात भारतीय व्यक्तित्व आत्मपूजक आहे. असे वर्णन केले आहे हे सर्व अर्थाने खरे आहे.

### ६) संशोधनातील अपुरेपणा -

नव्याने लाभलेल्या शोधांचा वापर प्रत्यक्ष जेव्हा केला जातो, त्यावेळी त्यांच्या वापरासाठी लागणारे कौशल्य आपल्याजवळ असत नाही. काळाच्या ओघात समस्यांवर उपाय सापडतात. वा कौशल्य विकसित होतात. परंतु त्यासाठी लागणाऱ्या कामामध्ये शांतता, सहकार्य, सहानुभूती बाळगली पाहिजे. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. प्रत्यक्ष शेतकऱ्याने राबविलेला प्रयोग इतर शेतकऱ्यांनी पाहिल्याशिवाय ते ज्ञान वा कौशल्य इतर शेतकरी आत्मसात करीत नाही.

### ७) शासकीय उणिवा -

ग्रामीण सामाजिक परिवर्तनाला वेग येवू शकत नाही. याचे कारण शासकीय उणिवातही दिसून येते. सामाजिक परिवर्तन व्हावे म्हणून पंचवार्षिक योजना आखल्या गेल्या. अनेक कायदे झाले. प्रसार माध्यमांचा वापर करण्यात आला. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी फारसे लक्ष दिले नाही. नियोजन हे नेहमी मजबूत व निर्दोष असायला हवे आणि ते असतेही मात्र त्याची कार्यवाही योग्य तऱ्हेने होतेच असे नाही. कागदोपत्री कटकटींना लोकही कंटाळतात. त्यामुळे ग्रामीण सामजिक परिवर्तन अपेक्षितपणे होतेच असे नाही. शासकीय कर्मचाऱ्यांची उदासिनता हा एक मोठा अडसर असलेला दिसतो.

### ८) निरपेक्ष लोकसेवकांचा अभाव -

निरपेक्ष लोकसेवकांचा समाज परिवर्तनात मोठा सहभाग आहे. विविध स्वयंसेवी संस्थामार्फत किंवा स्वतंत्र्यरित्या व्यक्ती ह्या समाज परिवर्तन प्रक्रियेत सहभागी होतात. सामान्यतः समाजाला स्वयंप्रेरित करणे, स्वतंत्रपणे विचार करण्याच्या वृत्तीत वाढ करणे, प्राप्त स्थितीत होणाऱ्या बदलांचा विचार करण्यास लावणे, गरज असल्यास समाज जागृतीचे कार्य करणे ही कामे लोकसेवक करीत असतात. मात्र आजच्या आत्मकेद्री, व्यक्तीकेंद्री युगात ह्या सर्व

बाबीत कार्य करणारे कार्यकर्ते दुर्मिळ झाले आहेत. लोकजागृतीचे काम करणारे निरपेक्ष व निस्वार्थी लोकसेवक पुढे येत नाहीत. तोपर्यंत ग्रामीण समाज परिवर्तनाला वेग येणे अशक्य आहे.

## ६.६ सारांश

स्वातंत्र्योत्तर काळात नव्या जीवनाच्या आकांक्षा वाढल्या. रुढीग्रस्त व मागासलेल्या भारतीय समाजाला समृध्दीकडे नेण्याचा प्रयत्न सुरु झाला. आर्थिक जीवनात स्थैर्य व सुस्थिती निर्माण करण्यासाठी पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम आखला. पण या कार्यक्रमामुळे समाजाचे बाह्य रुप बदलण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली. मात्र ही गती संथ आहे. चांगल्या प्रगतीच्या बाबत परिवर्तन होण्यासाठी लोकसहकार्याची गरज आहे. म्हणजेच या नवसमाज निर्मातीच्या कार्याला योग्य वळण व नवीन तेज, नवीन रुप प्राप्त होण्यासाठी तळागाळातील सर्वसामान्य माणसात वैचारिक परिवर्तन घडून आलेच पाहिजे. ते आवश्यकच आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) समाज परिवर्तन प्रक्रियेतील अडथळे स्पष्ट करा.

ग्रामीण सामाजिक बदल / परिवर्तनाचा अधिक अभ्यास करण्यासाठी विविध ग्रामीण भागात भेटी देवून त्या ठिकाणच्या स्थानिक लोकांशी चर्चा करुन तसेच निरिक्षण नोंदी घेवून आपणांस सखोल अभ्यास करता येईल. तसेच ग्रामीण समाज परिवर्तनावरील विविध पुस्तकांचे वाचन करुन आपल्या ग्रामीण सामाजिक परिवर्तनातील ज्ञानात भर टाकता येऊ शकते.

## ६.७ स्वाध्याय

१) सामाजिक परिवर्तनाच्या व्याख्या सांगून सामाजिक परिवर्तनाचे स्वरुप स्पष्ट करा.
२) ग्रामीण सामाजिक परिवर्तन कारणीभूत ठरलेल्या विविध घटकांची चर्चा करा.
३) ग्रामीण सामाजिक परिवर्तनातील अडथळे सांगा.

**संदर्भ सूची :**

१) ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास, प्रा. रा. ना. घाटोळे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर - ४४००१०

२) ग्रामीण समाजशास्त्र, प्रा. डॉ. गुरुनाथ द. नाडगोंडे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे -३०

३) महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या दिशा, पानसे रमेश, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई १९८९.

munotes.in

४) Social change in India, B Kuppuswamy, Vikas Public House, year - 2007

५) Rural Economy and Rural Society towards, Gopal Lal Jain, Mangaldeep Publication, Jaipur, year - 2000

६) 'गावपाडा ', त्र. ना. अत्रे.

७) महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना, व.म.दांडेकर.

8) Caste, Class and Ocupation, Ghurye G.S

❖❖❖❖

munotes.in

# घटक -७

## सामाजिक परिवर्तनातील लोकसहभाग

- डॉ. क्लेमेन्टाईन ज्यु. रिबेलो

**पाठाची रुपरेषा :**

७.० पाठाची उद्धिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ स्वयंसेवी संस्था संकल्पना व व्याख्या
७.३ स्वयंसेवी कार्याच्या व्याख्या
७.४ महाराष्ट्रातील स्वयंसेवी क्षेत्राचे कार्य
७.५ स्वयंसेवी संस्थांची समाज परिवर्तनातील भूमिका
७.६ सामाजिक परिवर्तनात लोकसहभागाची गरज
७.७ सारांश
७.८ मार्गदर्शक सूचना
७.९ स्वाध्याय

### ७.० उद्धिष्ट्ये (OBJECTIVES)

१. स्वयंसेवी संस्था व स्वयंसेवी संस्थाची कार्ये ह्यांची संकल्पना समजन घेणे.
२. ग्रामीण सामाजिक परिवर्तनात स्वयंसेवी क्षेत्राची भूमिका समजून घेणे.
३. सामाजिक परिवरितनात लोकसहभागाची गरज अभ्यासणे.

### ७.१ प्रस्तावना (Introduction)

भारत देश हा खेडयांचा देश ओळखला जातो. आजही देशाचा विकास हा खेड्यांच्या विकासात दडलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून अनेक संतांनी लोकांना नानविध मार्गांनी जागृत करण्याचे कार्य केले. हे कार्य वैयक्तिक पातळीवरील होते.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर देशाच्या विकासाची जबाबदारी शासन व्यवस्थेवर येवून पडली. मात्र शासनास म्हणावे तसे अपेक्षित यश प्राप्त होईना. यातूनच पुढे विकासाची जबाबदारी स्वयंसेवी संस्थानी स्विकारलेली दिसून येते. शासनाबरोबर आजही अनेक स्वयंसेवी संस्था कार्यरत आहे.

## ७.२ स्वयंसेवी संस्था संकल्पना व व्याख्या

स्वयंसेवी संस्था ही संकल्पना कार्य आणि कार्यकर्ता यांच्याशी निगडीत आहे.

### ७.२.१ स्वयंसेवक

स्वयंसेवक किंवा स्वयंसेवी कार्यकर्ता म्हणजे स्वतःच्या आत्मप्रेरणेने समाज उपयोगी कार्य करणारा कार्यकर्ता होय. असा कार्यकर्ता हा स्वइच्छेने कार्य करणारा असतो. अशा कार्यकर्त्यावर कार्यासाठी कोणतेही बंधन नसते. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करणारा हा कार्यकर्ता असतो. कोणत्याही प्रकारचा जात, धर्म, वर्ण यांना ना मानणारा हा असा असतो. केवळ समाजाच्या विकासाची ओढ ह्या कार्यकर्त्याला असते. समाजाची सेवा हेच त्याचे उद्दिष्ट असते. अशा कार्यकर्त्याला उदरनिर्वाहासाठी मानधन दिले जाते. हे मानधन ह्याचा उदरनिर्वाह व्हावा हाच विचार करुन तो स्विकारत असतो. अशा प्रकारच्या कुठल्याही अपेक्षा न बाळगता समाजउपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तीस स्वयंसेवक असे म्हणतात.

### ७.२.२ स्वयंसेवी संघटना

स्वयंसेवक जेव्हा आपल्या वैयक्तिक पातळीवर समाज विकासाचे कार्य करतो त्यावेळी त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे विकास कार्यात अनेक अडचणी निर्माण होतात. हे लक्षात आल्यानेच अधिक प्रभावीरित्या सामाजिक कार्य करणाऱ्या अशा कार्यकर्त्यांनी एकत्रित येवून स्थापन केलेल्या संस्थेस स्वयंसेवी संघटना म्हणतात. अशा सर्व स्वयंसेवी संघटना विशिष्ट वैशिष्टयांनी एकत्रित. परंतु वैयक्तिक पातळीवर कार्य करतात. अशा संस्थाचा समूह म्हणजे स्वयंसेवी क्षेत्र होय. भारतातील बहुसंख्य स्वयंसेवी संस्था ग्रामीण भागात ग्रामीण विकासाचे काम करीत आहेत. स्वयंसेवी संस्था आज शासनाला पूरक म्हणूनही कार्य करत आहेत. शासनाच्या विविध योजना स्वयंसेवी क्षेत्रामुळे शक्य झाल्या आहेत.

### ७.२.३ व्याख्या

स्वयंसेवी संस्थेच्या अनेक अभ्यासकांनी व्याख्या केल्या आहेत त्यातील काही पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**प्रा.स.ह.देशपांडे -**

"सर्व सामान्य जनतेचे विशेषतः अती गरीब, गरजू आणि मागासलेल्या वर्गाचे निकडीचे प्रश्न हातात घेवून ते सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या शासकीय किंवा निमशासकीय क्षेत्राबाहेरच्या नफा हेतू नसलेल्या म्हणजेच समाजसेवा हा प्रधान हेतू असलेल्या आणि बाह्य नियमावलीच्या अधीन नसलेल्या संस्था म्हणजे स्वयंस्फूर्त संस्था होय."

**लॉर्ड बेव्हरीज -**

ज्या संघटनेचे कामगार स्वावलंबी तत्वाने काम करतात ते मोबदला, वेतन किंवा मानधन घेतील अथवा न घेतील हे त्यांच्या इच्छेवर अवलंबून असते व अशी संघटना स्वतःच्या सभासदांनी स्थापन केलेली व तिच्यावर बाहेरील कुणाचेही नियंत्रण नसते. अशा संघटनेला स्वयंसेवी संस्था असे म्हणतात.

थोडक्यात, स्वयंसेवी संस्था ह्या स्वायत्ता आहेत. त्या स्वतःचा निर्णय स्वत घेऊ शकतात. स्वतःच्या कार्यपध्दतीने कार्य करु शकतात. म्हणूनच त्यांच्यामुळे विकासाला चालना मिळाली आहे. शासनाने सुध्दा स्वयंसेवी संस्थाची विकास कार्यात मदत घेतलेली दिसून येते. स्वयंसेवी कार्याच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## ७.३ स्वयंसेवी कार्याच्या व्याख्या

### १) एण्डरसन -

"ज्याचा उपयोग वैयक्तिक आणि सामुदायिक साहाय्य करणे आहे. जेणेकरुन ते आपल्या विशिष्ट इच्छा व योग्यतेनुसार व सामाजिक इच्छा व योग्यतेनुरुप समाधानकारक जीवन प्राप्त करु शकतील."

### २) भारतीय समाजकार्य संमेलन -

"स्वयंसेवी कार्य ही एक कल्याणकारी क्रिया आहे. याच्या आधारे मानवहित, तत्वज्ञान, शास्त्रीय ज्ञान आणि तांत्रिक कौशल्यावर आहे. आणि त्यांचा उद्देश व्यक्ती समूह आणि समाजाचा विकास करणे आहे. ज्यामुळे ते सुखी व संपूर्ण जीवन व्यतीत करु शकतील."

### ३) प्रा. पी. वाय थोटे -

"समस्याग्रस्त व्यक्तीला किंवा समाजाला निर्माण झालेली समस्या सोडविण्याकरता उपाय सुचविणे किंवा मार्गदर्शन करणे म्हणजेच स्वयंसेवी कार्य होय."

### ४) संयुक्त राष्ट्रसंघ - (तज्ञ समिती १९५९)

"स्वयंसेवी कार्य ही संघटित क्रिया आहे. जिचे उद्दिष्ट विशिष्ट तंत्र आणि पध्दतीचा वापर करुन साध्य केले जाते. याद्वारे व्यक्ती समूह व समाज यांच्या गरजा आणि त्यांच्या समस्या सोडविल्या जातात."

### ५) अँलीस चेन -

"स्वयंसेवी कार्य हे उस्फूर्त आहे. ज्यामध्ये शास्त्रीय ज्ञान व शास्त्रीय पध्दतीचा उत्स्फूर्त अवलंब करुन सामाजिक लाभ मिळवून देण्याचा व सामाजिक संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला जातो.

थोडक्यात स्वयंसेवी कार्य हे मदत करणारी क्रिया आहे. ह्या कार्याव्दारे व्यक्ती समूहाला कायम स्वरुपात मदत करण्यात येते.

**आपली प्रगती तपासा.**

१) स्वयंसेवी संस्थांची संकल्पना सांगा.

२) स्वयंसेवी कार्याच्या व्याख्या द्या.

## ७.४ महाराष्ट्रात स्वयंसेवी क्षेत्राचे कार्य

स्वयंसेवी क्षेत्रांच्या व कार्याच्या व्याख्या समजून घेतल्यावर आपल्या नक्कीच लक्षात आले असेल की सामाजिक परिवर्तनात स्वयंसेवी क्षेत्राची भूमिका ही फारच मोठी आहे.

भारतात व विशेषतः महाराष्ट्रात स्वयंसेवी संस्थाचे कार्य आपण थोडक्यात पाहू या.

भारतामध्ये परोपकारी संघटित कार्याचा फार दीर्घ काळचा वारसा आहे. पश्चाताप, दानधर्म, यासारख्या पारलौकिक उद्दिष्टांसाठी किंवा पूर, भूकंप, साथीचे आजार, नैसर्गिक संकटातील आपादग्रस्त लोकांसाठी सर्व स्तरातील लोक जात, धर्म, भाषा, पंथ, वर्ग यासारख्या कक्षा ओलांडून मदतकार्य करीत असत. १९ व्या शतकामध्ये सामाजिक कार्याची प्रेरणा काहीशी बदलली. समाजरचनेतील जाचक निर्बंधामुळे पिडीत अशा समाजघटकाची स्थिती बदलणे. हा परिवर्तनाचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून विविध स्वयंसेवी संस्था उदयास आल्या. विकासवादी दिशा व मार्ग देणाऱ्या संस्था आजही आपल्या देशात आहेत. त्यामध्ये जामखेडचे डॉ. आरोळे, उरळी कांचनचे मणीभाई देसाई, गुजरातच्या श्रीमती इला भट, राजस्थानचे बंकर रॉय व नरेंद्रपूर, प. बंगालचे रामकृष्ण मिशन यांचा समावेश होतो. म.गांधीच्या तत्वांपासून प्रेरणा घेवून भूमिहीन शेतमजूर, बेघर मुले, बालकामगार, असंघटित कामगार, स्त्रिया, स्वच्छता, तरुण-तरुणींसाठी कार्य करणाऱ्या अनेक स्वयंसेवा संस्था आजही कार्यरत आहेत. देशाच्या विविध भागात सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अधिकृत संस्थाची संख्या २००० हून अधिक आहे.

महाराष्ट्रात ही संख्या २०० हून अधिक आहे. वनसंरक्षण, आदिवासी विकास, ग्रामीण विकास ह्यासाठी विविध संघटना आपले विशिष्ट उद्देश व कार्य लक्षात घेवून कार्य करतांना दिसून येतात. ह्यामध्ये मा. श्री. ठाकर बाप्पा (अमृत विठ्ठलदास ठक्कर), श्रीमती अनुताई वाघ, धनाजीनाना चौधरी, शंकर विनायक ठाकर, नारायण सिंहजी उईळे, गुलाम भगवान, दादासाहेब बिडकर, श्रीमती गोदुताई परुळेकर, अण्णासाहेब वर्तक, पंढरीनाथ चौधरी, श्रमजीवी संघटनेचे विवेक पंडीत व त्यांच्या पत्नी, भाऊसाहेब धामणकर, दत्ताजी ताम्हाणे, डॉ. शामराव परुळेकर, प्राचार्य शहूराजा, नानासाहेब दिक्षीत, बाळासाहेब देशपांडे, जनार्दन महाराज वळवी, ह्यासारख्या समाज धुरी यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

आदिवासी भागासाठी महाराष्ट्रात कार्य करणाऱ्या काही प्रमुख संस्था पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) डॉ. अभय बंग व राणी बंग यांची गडचिरोलीतील सर्च संघटना आरोग्यावर कार्य करते. डॉ. अविनाश सावजी यांची अमरावती परिसरातील प्रयास ही संघटना, डॉ. सतीश गोगुळवार ह्यांची आम्ही आमच्या आरोग्यासाठी कुरखेडा - गडचिरोली येथील संघटना तर रायगड मधील शांतीवन ही संघटनाआरोग्यावर कार्य करतांना दिसतात.

२) **परिवर्तनवादी संघटना -**

छोटे शेतकरी, भूमीहीन व कुळ हक्कासाठी तसेच आदिवासी हक्क रक्षणासाठी कष्टकरी संघटना, श्रमीक मुक्ती संघटना, एकलव्य कष्टकरी संघटना, भूमीसेना, श्रमजीवी संघटना कार्य करतांना दिसत आहेत.

**३) शैक्षणिक विकासासाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था -**

ग्रामीण भागातील मुले-मुली तसेच आदिवासी भागातील मुले-मुली शाळेत येण्यास तयार नसतात. अशा ठिकाणी अनेक संस्थांनी प्रभावीपणे कार्य करुन समाज परिवर्तन घडवून आणण्यात मोलाची कामगिरी केली आहे. उदा. नगर जिल्ह्यातील राजूर येथील सत्यनिकेतन, सानेगुरुजी शिक्षण प्रसार मंडळ, आदिवासी सेवा समिती, गोखले एज्युकेशन सोसायटी, ग्राममंगल, भारतीय समाजोन्नती मंडळ, रयत शिक्षण संस्था, छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटी.

**४) इतर संस्था -**

शिक्षणाशिवाय इतर विषयघेवून सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून बायफ, रुरल कॅम्युन्स, प्रगती प्रतिष्ठान, पी.व्ही मांडलिक ट्रस्ट, सामाजिक व शैक्षणिक संस्था, एज्युकेशन हेल्थ आणि अॅग्रीतल्चर असोसिएशन, माँ साहेब शैक्षणिक व सामाजिक संस्था, नॅशनल रुरल रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट असोसिएशन, ग्रामीण आदिवासी सेवा संस्था, महिला ग्रामीण विकास संस्था, एज्युकेशन अॅन्ड सोशल वेल्फेअर सोसायटी, निर्मिती युथ फाऊंडेशन (चांदिप), यशस्वीनी फाऊंडेशन, वगैरे स्वयंसेवी संस्था तळागाळात आपली कार्य करुन विविध क्षेत्रात आपल्या परीने समाजपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

थोडक्यात, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक,आरोग्य, युथ- महिला विकास, आदिवासी विकास, अनुसुचित जातींचा विकास, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्र विकासात स्वयंसेवी क्षेत्र हे कार्य करतांना दिसते.

## ७.५ स्वयंसेवी संस्थांची समाज परिवर्तनातील भूमिका

दिवसेंदिवस स्वयंसेवी संस्थाचे महत्व वाढत आहे. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये लोकांना फार मोठ्या प्रमाणावर विकास प्रवाहात समावून घेण्यासाठी फारच जागृततेने हालचाली कराव्या लागतात. त्यामुळे मोठ्या अपेक्षाही संस्थाकडून क्रियाशील

कार्यासाठी केल्या जातात. सरकारची उणीव स्वयंसेवी संस्थाकडून दूर होवू शकते. ह्याबाबत स्वयंसेवी संस्थाची समाज परिवर्तनातील भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### १) विकास प्रक्रियेत लोकसहभाग -

स्वयंसेवी कार्यामुळे लोकांचा सहभाग मिळविण्यास मदत होते. जगात आज जी विकसित राष्ट्रे आहेत त्यांचा जलद विकास होण्यास स्वयंसेवी संघटनेचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. विकसनशील राष्ट्रांना देखील स्वयंसेवी क्रिया करण्याची गरज आहे. लोकांना विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांची अंधश्रध्दा दूर करण्यासाठी, विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन यंत्रणा अपुरी पडत आहे. त्यासाठी स्वयंसेवी संस्था आवश्यक आहेत. अशा स्वयंसेवी संस्थावर लोकांचा सहभाग मिळविण्यासाठी जर जबाबदारी टाकली तर विकसनशील देशात जलद गतीने विकास होण्यास मदत होते. परिणामी योग्य रितीने समाज परिवर्तनास दिशा मिळण्यास मदत होते.

### २) ग्रामीण विकास -

विकसनशील देशात ग्रामीण विकास जलद होण्याची आवश्यकता असते. त्यासाठी स्वयंसेवी संस्था पुढे येतात. सरकारने जर अशावेळी संस्थाना प्रोत्साहन दिले तर त्या स्वयंसेवी संस्था सक्रिय होवून ग्रामीण भागातील लोकांना स्वावलंबी बनण्यास मदत करतात. त्यामुळे ग्रामीण भागातील मागासलेपणा झटकून देण्याची प्रेरणा मिळून ग्रामीण भागातील समाजात सकारात्मक बदल होण्यास मोठी मदत होते.

### ३) लोकशाहीची जोपासना -

लोकांना नैतिक मूल्ये, राष्ट्रीय अस्मिता, राष्ट्रीयत्व शिकविण्याची योग्य जबाबदारी स्वयंसेवी संस्था पार पाडू शकतात. त्यांचा मूळ हेतू राष्ट्र हित जोपासण्याचा असतो. त्यामुळे लोकशाही मूल्यांचे योग्य जतन करण्यास मदत होवून खऱ्या अर्थाने देशात लोकशाही टिकवण्यास मदत होते. परिणामी राष्ट्रीय एकात्मता वाढून विषमता मोठ्या प्रमाणात कमी करण्याची महत्वपूर्ण भूमिका ह्या स्वयंसेवी संस्थाकडून बजावली जाते.

### ४) कल्याणकारी राज्याच्या स्थापनेत सहाय्यक कार्य -

आधुनिक काळात कल्याणकारी राज्याच्या जबाबदाऱ्या वाढत आहेत. सर्वच जबाबदाऱ्या ह्या राज्याला पार पाडता येत नाहीत. अशावेळी राज्याने ह्या जबाबदाऱ्या पार पाडताना स्वयंसेवी संस्थाचा आधार घेतल्यास शिक्षण, आरोग्य, अंधश्रध्दा निर्मुलन, स्वंयरोजगार, कुंटुबनियोजन ह्यासारख्या विषयात व प्रभावी कार्य करता येऊ शकते. ह्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणात बदल घडून येत असतो.

### ५) कार्याची नवी क्षितीजे -

स्वयंसेवी संस्थाच्या कार्याचा व्याप जसजसा वाढत जातो. तशा जनतेच्या अनेक तक्रारी कमी होतात. कारण या संस्थाच्या कामामुळे शासनावरील कामाचा ताण कमी होतो. स्वयंसेवी संस्थाचे कार्य समाजात चांगले चालते. त्यावेळी संस्थाकडे बुध्दीमान लोकही येतात. यामुळे समाजात अशा संस्थाबाबत विश्वास निर्माण होतो. ह्यामुळे सामाजिक परिवर्तन व विकासाची इतर कार्ये इत्यादीबाबत त्या आणखी कामे करु लागतात.

**६) शहरे आणि खेडी यांच्या विकासातले अंतर कमी -**

सर्व सुविधांनी संपन्नता शहरांतून केंद्रित करीत असतानाच कमी दर्जाच्या सुविधा, शिक्षण, आरोग्य, रस्ते, बंधने इ खेडयासाठी राखतात. परिणामतः खेडी हा दुर्मिळ व शहरे ही सबळ अशी विभागणी आता देशात मोठ्या प्रमाणात स्थिर होतांना दिसत आहेत. अशा स्वरुपाची शहरे व खेडी अंतर कमी करण्यास स्वयंसेवी संस्था आपली महत्वाची कार्ये बजावतांना दिसतात.

**७)** दुर्गम भागात सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तनाच्या दृष्टीने विचार करता आजची परिस्थिती अतिशय निराशाजनक आहे. समाजातील अनेकजण सामाजिक प्रगतीविषयी उदासीन आहेत. आर्थिक, सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने शासन आणि राजकीय पक्ष ठोस पावले नजीकच्या काळात उचलतील, असे दिसत नाही. सुदैवाने उपेक्षित समाजात पाय रोवून अत्याचाराविरुध्द आवाज उठविणाऱ्या स्वयंसेवी संस्था ह्यामध्ये महत्वाचे कार्य करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नातून सामाजिक परिवर्तनाच्या क्रियेला तळापासून गती मिळत आहे.

**८)** पारंपारिक भारतीय समाजात असलेला संप्रदायपणाचा पगडा ह्यांचे भांडवल करुन दारिद्रय, विषमता, आर्थिक शोषण यासारख्या मूलभूत समस्येपासून सर्वसमान्य लोकांचे काही पक्ष वा संघटना लक्ष विचलित करतात. अशा संप्रदायवादी पक्ष आणि संघटनांच्या प्रभावाविरुध्द आवाज उठवून सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतील मोठा अडसर दूर करण्याचा प्रयत्न त्या स्वयंसेवी संस्थाकडून केला जातो.

**९)** शासनाच्या अनुदानावर चालणाऱ्या सेवाभावी संस्था स्वतंत्र नसतात. प्रकल्पाची उद्दिष्ट्ये, स्वरुप, व्याप्ती, खर्च ह्याबाबत नोकरशाहीचे आदेश असतात. त्यामुळे सेवाभावी संस्था शासनाचे विस्तारक घटक बनत आहेत. महत्वपूर्ण समाजपरिवर्तनाची क्रिया स्वयंसेवी संस्था करतांना दिसत आहे.

**१०) सामाजिक परिवर्तन -**

भारतासारख्या विकसनशील देशात आधुनिकता व सामाजिक परिवर्तन ह्यांची फारच आवश्यकता असते. त्यासाठी स्वयंसेवी संस्था ही अतिशय महत्वाचे साधन आहे. भारतामध्ये भारतीय सेवक समाज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र सेवा दल, युवक क्रांतीदल, भूदान संघ, महत्वाची भूमिका बजावत आहेत. त्यांचे दृष्टीकोन वेगवेगळे असले तरी ते आपआपल्यापरीने सामाजिक परिवर्तनाचे काम करीत असतात. शासन या संस्थाच्या मदतीने व सहकार्याने विकास कार्यक्रम पार पाडू शकते. विद्यापीठे, महाविद्यालये इतर शिक्षणसंस्था याही आपापल्या परीने विकास कार्यक्रम हाती घेवू शकतात. त्यांच्याकडून प्रौढ शिक्षण, ग्रामीण वृक्षरोपण, रक्तदान, कुटुंब नियोजन यासारखे महत्वाचे कार्यक्रम हाती घेतली जातात. ह्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना महत्वपूर्ण भूमिका बजावते. स्वयंसेवी संस्था राष्ट्रीय सेवा योजना मार्फत करुणांच्या सहाय्याने समाज परिवर्तन प्रक्रियेत महत्वपूर्ण भूमिका बजावते.

munotes.in

## ७.५ स्वयंसेवी संस्थांची समाज परिवर्तनातील भूमिका

स्वयंस्फूर्तीने कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था ह्या आज समाजसुधारणेचे महत्वपूर्ण कार्य करीत आहेत. वेगवेगळ्या विषयांच्या माध्यमातून ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आरोग्यात्मक, पर्यावरणात्मक सांस्कृतिक, पर्यावरण संरक्षण, कौटुंबिक दर्जा उंचविण्यासाठी तसेच महिला सक्षमीकरण, तरुण-तरुणांना योग्य दिशादर्शक, म्हणून विविध स्वयंसेवी संस्था आज देशाच्या कानाकोपऱ्यात समाज उन्नतीचे कार्य करतांना दिसत आहेत. ह्यामुळे ग्रामीण भागात खूप वेगाने स्थित्यंतरे होत आहेत. योग्य दिशेने होणारे समाज परिवर्तन हे दोशाच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. ह्यामध्ये स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्वपूर्ण आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) सामाजिक परिवर्तनात स्वयंसेवी क्षेत्राची भूमिका स्पष्ट करा.

## ७.६ सामाजिक परिवर्तनात लोकसहभागाची गरज

सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संबंधातील बदलास सामाजिक परिवर्तन असे म्हटले जाते. बदल म्हणजे त्या त्या काळातील आधुनिकीकरणच असते. निर्माण झालेल्या समस्या त्यावर उपाय किंवा नवा वैचारिक बदल जो जनमानसात होतो व जो स्पष्ट रुपात जाणवतो. त्यावेळेस, विशिष्ट बाबतीत सामाजिक बदल झाला आहे. असे आपण म्हणत असतो. शासनास समाजाच्या दृष्टीने हितवाह एखादा बदल घडवून आणावयाचा असतो. त्यावेळेचे कार्य हे खूपच कठीण असते. शासन व स्वयंसेवी क्षेत्र जरी ह्याबाबत कार्य करीत असले तरी ते लोकसहकार्याशिवाय शक्य होतच नाही. समाजपरिवर्तनात लोकसहभागाची गरज थोडक्यात पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### १) मागासलेल्या भागाचे प्रश्न खऱ्या अरेथोने सोडविण्यासाठी -

दुर्गम भागात सर्व सोयी पोहचत नाही. दारिद्र्य अनारोग्य व्यसनाचे अधिक प्रमाण, बेरोजगारी, स्त्रियांचे प्रश्न,शिक्षण वगैरे बाबींबाबत मोठ्या प्रमाणात उदासिनता दिसून येते. हे सर्व प्रश्न जटील व गुंतागुंतीचे असतात. एक वेळच्या अन्नाची भ्रांत, रस्त्याची असुविधा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अनंत अडचणी समोर असतात. अशावेळी स्वयंसेवी संस्था वा शासन ह्या अडचणीवर मात करण्यासाठी विविध उपाय-योजना आखत असतात. मात्र त्या लोकांच्या सहकार्याशिवाय पुढे पूर्ण होवू शकत नाही.

## २) लोक सहकार्यातून नवसमाज निर्मिती -

नानाविध असलेल्या समस्या सोडवितांना लोकांना त्याचा फायदा लक्षात आला तर हळूहळू का होईना पण लोकांमध्ये जनजागृती होवून गावातील समस्या समंजस्याने सोडविण्यास लोक एकत्र येवून पुढाकार घेतात. ह्यातूनच पुढे नवसमाज निर्मिती झालेली दिसून येते. अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार हे ह्याचे उत्तम उदाहरण सांगता येईल.

## ३) सर्वांगीण विकास -

समाजामध्ये समस्यांचे निराकरण एकत्र येवून करता येते. ही बाब लोकांच्या मनावर बिंबली की, समाजातील अनिष्ट प्रवृत्तीचा ऱ्हास व्हावयास लागतो. आर्थिक बाबीत नवीन विचार, नवीन प्रयोग शक्य होतात. उदा ग्रामीण भागात मुख्य व्यवसाय शेती, शेतीसाठी पाणी अत्यंत महत्वाचा घटक आहे. ह्याच घटकाचा विचार होवून "पाणी अडवा पाणी जिरवा" ह्यासारख्या मोहीमा लोकसहकार्यतूनच शक्य होतात. पाण्यावर विविध पिके घेतली जातात. थेंबाथेंबाचा विचार होवून ठिंबक सिंचन पध्दती, तुषार सिंचन पध्दतीचा पिकांना पाणी देण्यासाठी वापर केला जातो. नवीन पध्दतीने शेती करतांना पॉली हाऊस, ग्रीन हाऊसचा वापर केला जातो. कृषी शेतीबरोबर शेतीपुरक व्यवसायाचा विचार केला जात आहे. ग्रामीण भागात तयार होणारा माल शहरीभागात आणून विकला जात आहे. ही स्तुत्य बाब आहे. तसेच इतर कारागिरी व्यवसाय मशीनच्या साह्याने केले जात असल्याने ग्रामीण भागाचा कायापालट होण्यास मदत होत आहे. हे केवळ लोक सहकार्यातूनचा शक्य होतांना दिसते.

## ४) राष्ट्राबाबत प्रेम आपुलकीचा भावना निर्मिती -

शासनाकडून अनेक विकास योजना राबविल्या जातात. परंतु लोकांपर्यंत त्या किती पोहचवतात. हा चिंतनाचा विषय आहे. सरकारी नोकर वर्गाची उदासीनता ह्या कार्याबाबत मोठ्या प्रमाणात दिसते. म्हणूनच अजून ग्रामीण भाग मागासलेले आहेत असे म्हणावे लागते. ही दुर्देवाची गोष्ट आहे. एखाद्या योजनेमध्ये गावपातळीवरील अपेक्षित फलश्रुती हवी असल्यास लोकांना विश्वासात घेवून लोकसहकार्याने ती पूर्णत्वास नेता येते. अर्थात लोकांना शासनाविषयी, शासकीय कर्मचाऱ्याविषयी प्रेम /आपुलकीची भावना निर्माण होते. एक दुसऱ्याबद्दल लोकांमध्येही समंजस्यपणा, प्रेम, आपुलकीची भावना निर्माण होते. हीच स्थिती सर्व राष्ट्राबाबत दिसते. त्यावेळी राष्ट्रप्रेम जागृत झालेले दिसून येते. आपल्या राष्ट्राबाबत आदरभाव निर्माण होतो. ह्यासाठी लोकसहकार्याची गरज मात्र असते.

## ५) वैचारिक परिवर्तन -

तळागाळात एखाद्या गोष्टीबाबत जनजागृती होत असेल तर नवीन ज्ञान, तंत्रज्ञान, ह्याचा स्विकार केला जातो. मानव हा मोठ्या प्रमाणात इतरांचे अनुकरण करतात. विशेषतः मोठ्या किंवा उच्च वर्गाचे निम्म वर्ग हा अनुकरण करण्याचा प्रयत्न करतो. एखाद्या अनुकरणाने जर फायदा होत असेल. तर नवीन ज्ञान, तंत्रज्ञान ह्याचा स्विकार लगेचच मोठ्या प्रमाणात स्विकारले जाते. अर्थात मोठ्या प्रमाणात समाज परिवर्तन झालेले दिसून येते.

वैचारिक परिवर्तन करण्यात समाजसुधारकांचा मोठा सहभाग असतो. उदा. समाज सुधारक उदा. अण्णा हजारे ह्यांचे विविध चांगल्या कार्यासाठी उदाहरण म्हणून देता येईल. माहितीचा अधिकार कायदा त्यांच्या मुळेच शक्य झाला.

जैन इरिगेशन सिस्टम ह्यामुळे पाणी बचत करुन शेती करता येते. हे शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम जैन इरिगेन्शन सिस्टमने केले आहे.

अशी अनेक उदाहरणे आपणांस देता येतील ज्यामुळे आज आर्थिक, सामाजिक परिवर्तन होतांना दिसत आहे.

महिला सबलिकरणासाठी स्वयंसहाय्यता बचत गट निर्मिती करुन योग्य मार्गदर्शनाने महिलांच्या सर्वांगीण प्रगतीत लोकसहकार्य महत्वपूर्ण आहे.

**६) व्यवसाय निर्मिती** -

केवळ नोकरी आणि त्यासाठी शिक्षण ह्या विचारात बदल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. म्हणूनच इंदिरा गांधींनी ट्रायसेम योजना तर मोदी सरकारने स्किल इंडिया ह्यासारख्या योजना युवक-युवती, स्त्रिया ह्यांसाठी मोठ्या प्रमाणात राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. आपल्याला आवड असलेल्या क्षेत्रात प्रशिक्षण घेवून नवीन पध्दतीने व्यवसाय करुन संपन्नता मिळवावी. जेणे करुन अनेक रोजगार देशामध्येच तळागाळात निर्माण होवून सर्वांना रोजगार संधी प्राप्त होईल. पण ह्यासाठी लोकसहभाग अत्यावश्यक आहेच ना.

**७) नवीन संकल्पनांचा स्विकार** -

गावपातळीवर शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. शेतातून मिळविलेल्या पैशातून कुटुंब निर्वाहा इतका पैसा बाजूला ठेवून शेतीत उर्वरीत पैसा गुंतवला तर मोठी प्रगती शेतीत साधता येते. पॉली हाऊस, ग्रीन हाऊस मधील शेती, शेतीपुरक व्यवसायांचा विकास होण्यास मदत होते. ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुण ह्या पध्दतीने शेती करु लागले आहेत. ही स्तुत्यबाब आहे. तसेच गावातील कारागीर हे नवीन यंत्राच्या साहाय्याने आपले व्यवसाय करीत आहेत. उच्च शिक्षित तसेच काहीतरी चांगले करण्याची भावना असलेले तरुण शेतमालात प्रक्रिया केंद्र स्थापन करीत आहेत. शेतकऱ्यांना आपल्या प्रक्रिया केंद्राशी संलग्न करुन प्रक्रिया केंद्रास हवा असलेला शेतमाल योग्य मार्गदर्शनाने तयार करुन घेत आहे. उदा. नाशिक जवळील सह्याद्री फूड प्रोसेसिंग केंद्र.

**८) विज्ञानविषयक दृष्टीकोनाचा विकास** -

ग्रामीण भागात नैसर्गिक आपत्ती तसेच सततचे आजारपण येत असेल तर तो देवाचा प्रकोप झाला आहे असे मोठ्या प्रमाणात मानण्यात येते. धर्माचे पालन हे शांतीसाठी हवेच. शांतीतून विकास, विकासाकडून समृध्दीकडे वाटचाल ही होत असते. धर्माचे श्रध्देने पालन व्हावयास हवे मात्र ह्यामध्ये आम्ही अती करतो. देवाच्या नावाने भिती दाखवून घाबरवणाऱ्यांची संख्या कमी नाही. ह्यातूनच अंधश्रध्देची जोपासना होत असते. अंधश्रध्दा निर्मुलन करणाऱ्या अनेक संघटना आहेत. समाजात जावून विविध प्रयोगाव्दारे ते जनजागृती करुन लोकांमध्ये विज्ञान विषयक दृष्टीकोन विकसीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

प्रसार माध्यमे, मोबाईल द्वारेही मोठ्या प्रमाणात विज्ञानविषयक दृष्टीकोन विकसीत करण्याचा प्रयत्न सर्व स्तरातून होताना दिसून येत आहे. आजारपण हे कोणी जादू करुन येत नाही तर त्यासाठी स्वच्छता योग्य आहार, व्यायाम, योगा अनेक आजाराची माहिती त्यांची कारणे ह्याविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जातो. हे सर्व खरे असले तरी आम्ही अंधश्रध्देवर

मात करुन विज्ञानाचा स्विकार तेव्हा करू जेव्हा आम्ही विज्ञानविषयक स्विकार करण्यासाठी मोठ्या संख्येने ह्या जनजागृतीच्या मोहिमेत सामील होवू. आनंद असा की लोक मोठ्या प्रमाणात विज्ञानविषयक दृषिटीकोनाचा स्विकार करीत आहेत.

**९) शासनासह लोक -**

पंचायत राज यंत्रणेने देशात लोकांच्या हाती खऱ्या अर्थाने तळागाळात सत्ता आली आहे. गावातील लोकांना अपेक्षित असलेला विकास ग्रामसभेच्या साह्यायाने शक्य होत आहे. सर्वांबरोबरच अनुसूचित जाती-जमाती, महिला ह्यांच्या हाती सुध्दा सत्ता ही जात आहे. त्यामुळे सर्व विकास योजनांची माहिती तळागाळात झालेली दिसून येते. राजकीय जनजागृतीचा मोठा परिचय ह्यामुळे झालेला आहे. देशात अनेक उदाहरणे आहेत. चांगले कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना विविध पुरस्कार दिले जात आहेत. गावचे रुप पालटणाऱ्या ग्रामपंचायतींना तालुका, जिल्हा, राज्य इतकेच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार दिले जात आहेत. सरकारची 'डिझीटल इंडिया' ह्यासारख्या संकल्पनांचा गावपातळीवर स्विकार झालेला दिसून येत आहे. ऑन लाईन सर्व पैशाचा डायरेक्ट व्यवहार शिकण्याचा प्रयत्न गावाकडेही होतांना दिसून येत आहे. अर्थात हे शक्य होत आहे. केवळ आणि केवळ लोकसहकार्यामुळे, लोकसहभागामुळेच. देशाच्या सर्वांगीण प्रगतीची जाणीव खऱ्या अर्थाने लोकसहभागानेच शक्य आहे.

**१०) खऱ्या प्रगतीची फलश्रृती -**

सर्वार्थाने सर्वांगीण आणि सर्वसमावेक्षक विकास साध्य व्हावयाचा असेल तळागाळातही प्रगतीची कास धरुन बदल घडवून आणवयाचा असेल तर लोकसहभाग सकारात्मक विकासात अपेक्षितच आहे. ह्यासाठी आधुनिक शेती, शेती संलग्न व्यवसायावर भर, स्थानिक शेतमाल प्रक्रिया केंद्र निर्मितीवर भर, आधुनिक पध्दतीने कारागीर व्यवसायाचा विकास, उत्तम रस्ते व मार्ग, वाहतुकीची साधने, वीज, शुध्द पाणी पुरवठा, शिक्षणांच्या सोयी, दवाखाने, दळण-वळण क्षेत्राचा ग्रामीण भागात विकास, पर्यावरण संरक्षण, समाज विघातक, पर्यावरण विघातक गोष्टींना अटकाव ह्यासारख्या गोष्टींचा विचार करुन मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागाच्या पर्यायाने देशाच्या सर्वसमावेक्षक सर्वांगीण प्रगतीसाठीचा विचार नक्कीच होईल. सामाजिक परिवर्तन प्रक्रियेत तळागाळातील लोक सक्रिय उत्साहाने सहभागी होवून विधायक सामाजिक परिवर्तन प्रक्रिया लोकसहभागाने शक्य तर होईलच त्याचबरोबर देशप्रेमही जागृत होवून आपुलकीच्या जाणीवेतून देश मोठी प्रगती साध्य करु शकेल.

## ७.७ सारांश -

देश स्वातंत्र्य झाल्यावर समाजाकडून अनेक अपेक्षा वाढल्या आहेत. मागासलेल्या समाजाला ऊर्जीतावस्थेमध्ये नेण्यासाठी समाजात चांगले बदल होण्यासाठी अनेक प्रयत्न चालू आहेत. समाजाचे अंतर्गत व बाह्यरुप बदलू लागले आहे. मात्र हा वेग संथ आहे. यासाठी समाजात वैचारिक परिवर्तन प्रक्रिया घडली पाहिजे. समाज परिवर्तनासाठी लोकसहभाग हा अपेक्षितच आहे. अनेक स्वयंसेवी संस्थाही ह्यासाठी सक्रिय आहेत. पण स्वयंसेवी संस्थानाही अपेक्षित फलदायी कार्य करण्यासाठी लोकसहकार्यच अपेक्षित आहे. आणि म्हणूनच भारत देशाच्या सर्वसमावेक्षक सर्वांगीण प्रगतीसाठी लोकसहभाग गरजेचाच आहे.

## ७.८ सूचना -

ह्या विषयाचा अधिक अभ्यास करण्यासाठी विविध स्वयंसेवी संस्थाना आपण प्रत्यक्ष भेट देवून त्यांच्या कार्याची माहिती मिळवून आपल्या ज्ञानात भर टाकू शकता. स्वयंसेवी संस्थावर असलेली विविध पुस्तकांचे वाचन करुन ह्या विषयाचा अभ्यास करु शकता.

## ७.९ स्वाध्याय -

१) स्वयंसेवी संस्था व स्वयंसेवी संस्थांच्या कार्याची संकल्पना सांगा.
२) ग्रामीण सामाजिक परिवर्तनात स्वयंसेवी संस्थांची भूमिका स्पष्ट करा.
३) सामाजिक परिवर्तनात लोक सहभागाची गरज सांगा.
४) महाराष्ट्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाविषयी थोडक्यात माहिती द्या.

❖❖❖❖

munotes.in

## प्रथम वर्ष कला शाखेतील **ग्रामीण विकास** अभ्यासक्रमांसाठी २०२०-२०१२ पासून सत्रांती परीक्षेसाठी प्रश्नपत्रिकेचा सुधारित नमुना

परीक्षेचा कालावधी = ३ तास एकूण गुण = १०० (प्रती सत्र)

सर्व 5 प्रश्नांना 20 गुण आहेत आणि सर्व प्रश अनिवार्य आहेत.

प्रत्येक प्रश्नात अंतर्गत निवड असेल.

प्र. १. कोणतेही दोन प्रश्न सोडवा (प्रकरण १)
२० गुण
अ
ब
क

प्र. २. कोणतेही दोन प्रश्न सोडवा (प्रकरण २)
२० गुण
अ
ब
क

प्र. ३. कोणतेही दोन प्रश्न सोडवा (प्रकरण ३)
२० गुण
अ
ब
क

प्र. ४. कोणतेही दोन प्रश्न सोडवा (प्रकरण ४)
२० गुण
अ
ब
क

प्र. ५. कोणतेही दोन प्रश्न सोडवा (प्रकरण १, २, ४, ४. प्रत्येक प्रकरणातून एक प्रश्न)
२० गुण
अ
ब
क
ड

munotes.in